सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, १६ जानेवारी २०२६ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४२ वे अंक ५१। पाने १२ । किंमत रु. ६/-

|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com




## विचारपुष्प



आज भारत प्रजासत्ताक म्हणून ओळखला जातो. आपल्या गुणांमुळे समाजात सर्वांच्या श्रद्धेस पात्र ठरलेले गजमुख गणपतीचा आदर्श आज आपल्या समोर राहिला तरच भारत पूर्वीसारखा कर्तव्यनिष्ठ बनून, तपस्येच्या बळावर पुन्हा एकदा जगद्गुरू म्हणून ओळखला जाईल.

**- बाबासाहेब आपटे**
रा. स्व. संघाचे प्रथम प्रचारक

# धडपड संपली, आता धडधड

## • आज ठरणार महानगरांचे कारभारी • सरासरी ५२ टक्के मतदानाचा अंदाज

◆ **मुंबई, १५ जानेवारी**

राज्यातील २९ महानगरपालिकांमधील २८६९ नगरसेवक निवडून देण्यासाठी गुरूवारी मोठ्या उत्साहात मतदान झाले. राज्यात जवळपास ५२ टक्क्याच्या आसपास मतदान झाल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. शुक्रवारी सकाळी प्रथम टपाल मतपत्रिकांची मोजणी होईल. त्यानंतर दहा वाजता मतदारयंत्र मतमोजणीला प्रारंभ होणार आहे. महानगरी मुंबईसह पुणे, नागपूर आणि नाशिक मनपा निकालाकडे राज्याचे लक्ष लागून आहे. तसेच इतर २५ महानगरपालिकांवर कुणाची सत्ता येणार हे उद्या दुपारपर्यंत ठरणार आहे.

गुरुवारी राज्यातील २९ मनपाच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी घेण्यात आलेले मतदान संध्याकाळी ५.३० वाजता संपल्यानंतर राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी मतदानाची टक्केवारी ४६ ते ५० टक्के दरम्यान असल्याचे स्पष्ट केले. मात्र अचूक आकडेवारी नंतर जाहीर करण्यात येणार असल्याचे आयोगाकडून यावेळी सांगण्यात आले. २०१७ रोजी झालेल्या निवडणुकांच्या तुलनेत यंदा मतदानात घट दिसत असून जालना आणि इचलकरंजी मनपासाठी पहिल्यांदाच मतदान घेण्यात आले.

### मुंबई मनपाकडे सर्वांचे लक्ष

**देशातील सर्वात मोठी आणि श्रीमंत महानगरपालिका असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या (बीएमसी) निवडणुकीकडे यावेळी संपूर्ण देशाचे लक्ष लागले होते. ७४,४०० कोटी रुपयांहून अधिक अर्थसंकल्प, २२७ जागा आणि तब्बल १,७०० उमेदवार यामुळे ही निवडणूक राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. नऊ वर्षांनंतर आणि चार वर्षांच्या विलंबानंतर झालेल्या या निवडणुकांसाठी मुंबईत २५ हजारांहून अधिक पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले होते.**

मुंबई मनपाची झालेला सत्तासंघर्ष,मतदानाच्या टक्केवारीत घट, पुणे येथे इव्हीएम मशिनमध्ये झालेला बिघाड तर धुळे येथे निवडणूक हिंसाचार घडल्याची नोंद झाली.

### ठाकरे बंधूंचा आयोगावर हल्लाबोल

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी निवडणुकांमध्ये गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप करत ही लोकशाहीची हत्या असल्याचे म्हटले.

राज्य निवडणूक आयुक्तांच्या निलंबनाची मागणी करत आयोग व सरकारमध्ये संगनमत असल्याचा आरोपही त्यांनी केला. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही बोटावरील शाई, तसेच 'पाडू' प्रणाली आणि प्रचार कालावधी वाढवण्यावरून आयोगावर गंभीर प्रश्न उपस्थित केले.

### मुंबई महापालिका निवडणूक एक्झिट पोल-२०२६

जागा २२७ | बहुमत ११४

| सर्वेक्षण संस्था | भाजपा+ | शिवसेना(उबाठा)+ | काँग्रेस+ | एनसीपी | अन्य |
|---|---|---|---|---|---|
| ॲक्सिस माय इंडिया | १३१-१५१ | ५८-६८ | १२-१६ | - | ६-१२ |
| डीव्ही रिसर्च | १०७-१२२ | ६८-८३ | १८-२५ | २-४ | ८-१५ |
| जेव्हीसी | १३८ | ५९ | २३ | - | ७ |
| लोकशाही मराठी/रुद्र | ११५-१३० | ६७-८२ | २२-२७ | - | १०-१५ |
| जनमत | १३८ | ६२ | २० | - | ७ |
| जेडीएस | १२७-१५५ | ४४-६४ | १६-२५ | १-४ | - |
| पोल मित्रा | १६५-१७५ | ४५-५५ | ९-१४ | - | ७-१२ |
| साम टीव्ही | ११९ | ७५ | २५ | - | ३ |

मागील निकाल: शिवसेना-८४ | भाजपा-८२ | काँग्रेस-३१ | एनसीपी-९ | अन्य-१४

### शाईवरून वाद, आरोप-प्रत्यारोप

मतदान सुरू होताच सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडीओंमध्ये ॲसिटोन किंवा सॅनिटायझर वापरून बोटावरील शाई पुसली जात असल्याचे दिसून आले. यामुळे निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. मात्र, राज्य निवडणूक आयोगाने हे आरोप फेटाळून लावत, अफवा पसरवणाऱ्यांविरोधात कठोर कारवाईचा इशारा दिला.

### जळगावमध्ये हवेत गोळीबार

जळगाव महानगर पालिकेच्या निवडणुकीसाठी सकाळपासून शहरात मतदान प्रक्रिया शांततेत सुरू असतानाच पिंप्राळा परिसरातून एक धक्कादायक घटना समोर आली. मतदानाच्या दिवशीच हवेत गोळीबार झाल्याची बातमी पसरताच शहरात खळबळ उडाली.



# सोलापुरात अंदाजे सरासरी ५४ टक्के मतदान

## किरकोळ प्रकार वगळता शांततेत मतदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ जानेवारी-**

सोलापूर महापालिकेसाठी गुरुवारी सकाळी खूप संथगतीने मतदान झाल्याचे चित्र होते. अनेक मतदान केंद्रांवर मशिन बंद, चार मशिनऐवजी तीन मशिन लावल्या, मतदार यादीत नाव सापडत नाही, दुबार मतदार, मतदान करण्यापूर्वीच कोणीतरी दुसऱ्यानेच मतदान केले, कुटुंबातील सदस्यांची नावे वेगवेगळ्या मतदान केंद्रांवर, पती-पत्नीचे नाव वेगवेगळ्या मतदान केंद्रात आल्याने संताप अशा प्रकारच्या तक्रारी सकाळीपासूनच सुरु होत्या. रात्री उशिरापर्यंत महापालिकेकडून मतदानाची अंतिम आकडेवारी उपलब्ध झाली नव्हती. दरम्यान सोलापूर महापालिकेसाठी अंदाजे सरासरी ५४ टक्के इतके मतदान झाल्याचे सांगण्यात आले.

सकाळच्या सत्रात कमी मतदानामुळे धास्तावलेल्या उमेदवारांनी मतदारांना घरातून बाहेर काढण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. अनेक ठिकाणी वाहनातून मतदारांना आणण्यात येत होते. महापालिकेकडून मतदार यादीत प्रचंड गोंधळ घालण्यात आल्याचीही ओरड उमेदवारांसह नागरिकही करीत होते. शहरातील काही मतदान केंद्रांवर मतदार नसल्यामुळे बरोबर साडेपाच वाजता केंद्र बंद करण्यात आली. तर काही मतदान केंद्रांवर उशीरापर्यंत रांगा लागल्याचे चित्र होते.

एकूणच काय तर राजकीय राजरंग पाहून मतदार मतदानाला बाहेर पडले नाहीत, त्यांच्यातील उत्साह कमी झाल्याचे दिसून आले.

## महत्त्वाचे

### इराणवर कारवाईची तयारी

**वॉशिंग्टन :** इराणमध्ये सुरू असलेल्या सरकारविरोधी निदर्शनाच्या पृष्ठभूमीवर अमेरिकेने तेहरानच्या आसपास आपली लष्करी उपस्थिती वाढवण्याची तयारी वेगात सुरू केली. बुधवारी अमेरिकन नौदलाची यूएसएस अब्राहम लिंकन विमानवाहू युद्धनौका बुधवारी दक्षिण चीन समुद्रातून इराणच्या दिशेने रवाना झाली. इराणवर हवाई आणि सागरी मार्गाने हल्ला करण्याची योजना अमेरिकेने आखल्याची शक्यता आहे. यूएसएस अब्राहम लिंकन ही अमेरिकेच्या नौदलाचे एक अणुशक्तीवर चालणारी, गातील सर्वात मोठ्या तसेच, शक्तिशाली विमानवाहू युद्धनौकांपैकी एक आहे. इराणची हवाई हद्द बंद झाल्यानंतर अमेरिकेने ही युद्धनौका दक्षिण समुद्रातून हलवली. अमेरिकन नौदलाने याच युद्धनौकेवरून १२ जानेवारी रोजी दक्षिण चीन सागरात सराव केला होता. दक्षिण चीन समुद्रातून युद्धनौका काही दिवसातच इराणची राजधानी तेहरानजवळ पोहोचेल. यूएसएस अब्राहम लिंकनसोबत २१ युद्धनौका आहेत आणि आता इराणच्या सत्ताधीशांना कोणीही वाचवू शकणार नाही, त्यांचा अंत जवळ आला आहे.'' गेल्या वर्षी भारत ८५ व्या स्थानावर होता.

### ५५ देशांमध्ये भारतीयांना व्हिसा-मुक्त प्रवेश

**नवी दिल्ली :** भारताच्या पासपोर्टने आणखी प्रगती केली आहे. जागतिक स्तरावर पासपोर्टच्या शक्तीमध्ये लक्षणीय बदल झाले आहेत. या वर्षी आशियाई देशांचे वर्चस्व कायम असून सिंगापूरचा पासपोर्ट जगातील सर्वात शक्तिशाली ठरला आहे. हा १९२ देशांमध्ये व्हिसा, मुक्त प्रवास करण्याची परवानगी देतो. त्यानंतर जपान आणि दक्षिण कोरियाचे आहेत. दरम्यान, संयुक्त अरब अमिरातीचा पासपोर्ट जगात पाचव्या स्थानावर पोहचला आहे. भारताच्या पासपोर्ट रँकिंगमध्येही सुधारणा झाली आहे. भारताने पाच स्थानांनी प्रगती करत अल्जेरियाशी बरोबरी करत ८० व्या स्थानावर पोहोचला आहे. भारतीय नागरिक आता ५५ देशांमध्ये पूर्व व्हिसाशिवाय प्रवास करू शकतात.



रा. स्व. संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी महाल येथील नागपूर नाईट हायस्कूलमध्ये सकाळी साडेसात वाजता मतदान केले. त्यांच्यासमवेत महानगर संघचालक राजेश लोया, सुभाष पारधी, त्या प्रभागातील भाजपाचे उमेदवार श्रीकांत आगलावे आणि प्रमोद पेंडके उपस्थित होते

# बिजापुरात ५२ माओवादी शरण

## भामरागड एरिया कमिटीतील सदस्यांचा समावेश

◆ **बिजापूर, १५ जानेवारी**

छत्तीसगडमधील बिजापूर येथे ५१ माओवाद्यांनी गुरुवारी शरणागती पत्करली. त्यापैकी ४९ जणांच्या शिरावर एकूण १.४१ कोटी रुपयांचे बक्षीस होते, अशी माहिती पोलिस अधिकाऱ्याने दिली.

शरण आलेल्या माओवाद्यांमध्ये २१ महिलांचा समावेश आहे. हे माओवादी दंडकारण्य स्पेशल झोनल कमिटी (डीकेएसझेडसी), आंध्र-ओडिशा बॉर्डर डिव्हिजन आणि भामरागड एरिआ कमिटीत (महाराष्ट्र)चे सदस्य आहेत.

शरण आलेल्यांपैकी विभागीय समितीचा सदस्य लक्खू उर्फ अनिल, प्लाटून पार्टी कमिटी सदस्य लक्ष्मी मडावी आणि चिन्नी सोधी उर्फ शांतीवर प्रत्येकी आठ लाख रुपयांचे बक्षीस होते. १३ इतर माओवाद्यांवर प्रत्येकी पाच लाख रुपये, १९ माओवाद्यांवर प्रत्येकी दोन लाख आणि १४ माओवाद्यांवर प्रत्येकी एक लाख रुपयांचे बक्षीस होते, असे बिजापूरचे पोलिस अधीक्षक जितेंद्र कुमार यादव यांनी सांगितले.

*(वृत्तसंस्था)*

# भारतात शासनव्यवस्थेच्या केंद्रस्थानी जनता

## • पंतप्रधान मोदी यांचे प्रतिपादन • राष्ट्रकुलच्या सभापती, पीठासीन अधिकाऱ्यांच्या परिषदेचे उद्घाटन

◆ **नवी दिल्ली, १५ जानेवारी**



भारताने विविधतेला आपल्या लोकशाहीची ताकद बनवली आहे आणि लोकशाही संस्था व प्रक्रिया विकासाला स्थिरता, गती आणि व्यापकता देतात हे जगाला दाखवले आहे. येथे शासनव्यवस्थेच्या केंद्रस्थानी जनता असल्याचे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी केले.

भारतात लोकशाहीने परिणामकारक कामगिरी केली आहे. कारण, देशातील जनता प्रशासनाच्या केंद्रस्थानी आहे, असे नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रकुलच्या सभापती आणि पीठासीन अधिकाऱ्यांच्या २८ व्या परिषदेचे उद्घाटन करताना सांगितले. भारतात लोकशाहीचा अर्थ शेवटच्या घटकांपर्यंत सेवा पोहोचवणे हा आहे. सरकारने लोककल्याणाच्या भावनेने हाती घेतलेल्या कल्याणकारी योजना कोणत्याही भेदभावाशिवाय प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचतात, असे त्यांनी स्पष्ट केले.

या कल्याणकारी भावनेमुळे अलिकडच्या वर्षांत २५ कोटी लोक गरिबीतून बाहेर आले आहेत. भारतात लोकशाही परिणामकारक ठरते, असे मोदी म्हणाले. भारताला स्वातंत्र्य मिळाले, तेव्हा देशातील विविधतेमध्ये लोकशाही टिकू शकेल की नाही, याबद्दल अनेकांना शंका होती. तथापि, हीच विविधता भारतीय लोकशाहीची ताकद बनली असल्याचे ते म्हणाले. *(वृत्तसंस्था)*

### भारत दुसरा मोठा पोलाद उत्पादक

भारत हा जगातील दुसरा सर्वात मोठा पोलाद उत्पादक देश आहे. येथे तिसरी सर्वात मोठी स्टार्टअप परिसंस्था आहे, तिसरी सर्वात मोठी विमान वाहतूक बाजारपेठ आहे, चौथे सर्वात मोठे रेल्वेजाळे आहे आणि तिसरे सर्वात मोठे मेट्रो रेल्वे जाळे आहे. भारत हा दुधाचा सर्वात मोठा उत्पादक आणि तांदळाचा दुसरा मोठा सर्वात मोठा उत्पादक देश आहे, असे नरेंद्र मोदी म्हणाले.



# जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचा रणसंग्राम सुरु

## आजपासून अर्ज भरण्यास सुरुवात

**तभा वृत्तसेवा । अरुण बळप**
**बार्शी, दि. १५ जानेवारी -**

वीस महिन्यांपूर्वी लोकसभा, पंधरा महिन्यांपूर्वी विधानसभा, सव्वा महिन्यापूर्वी बाजार समिती व नगरपालिका निवडणुकीनंतर आता जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीची रणधुमाळी सुरु झाली आहे. बार्शी तालुक्यात परंपरेप्रमाणे या निवडणुकीतही माजी मंत्री तथा विद्यमान आमदार दिलीप सोपल व माजी आमदार राजेंद्र राऊत यांचेच उमेदवार आमने-सामने असणार आहेत.





लोकसभेच्या विजयाचा विधानसभा निवडणुकीवर प्रभाव दिसला आणि सोपल यांनी विधानसभा काबीज केली. विधानसभेतील हा पराभव मान्य करत राऊत यांनी पुढील निवडणुकीची तयारी सुरु केली. विधानसभेतील झालेल्या चुकांची पुनरावृत्ती त्यांनी बार्शी बाजार समिती व नगरपालिका या दोन्ही निवडणुकीत होऊ दिली नाही. याचा परिणाम दोन्ही निवडणुकीत राऊत यांनी सोपल गटाचा पराभव केला. यानंतर आता लगेच जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूक सोपल-राऊत गटांमध्येच लढत होणार निश्चित.

बार्शी पंचायत समिती व जिल्हा परिषद जागांच्या आरक्षणासंदर्भात यंदा आरक्षणाची जी स्थिती आहे, त्यानुसार उपळाई (ठों) (ओबीसी), पांगरी (सर्वसाधारण महिला), उपळे दुमाला गण सर्वसाधारणसाठी तर पानगाव (सर्वसाधारण), मालवंडी (सर्वसाधारण महिला) असे सहा जिल्हा परिषद गटाचे आरक्षण आहे. तसेच शेळगाव (आर) नवीन जि. प. गट झाला आहे. पंचायत समितीसाठी उपळाई (ठों) (महिला), पांगरी (अनुसूचित जाती), आगळगाव (ओबीसी), कारी (ओबीसी), उपळे (दु) (ओबीसी महिला), गौडगाव (सर्वसाधारण), पानगाव (सर्वसाधारण), बाबी (सर्वसाधारण), मालवंडी (सर्वसाधारण महिला), सासुरे (सर्वसाधारण), मानेगाव (सर्वसाधारण महिला), शेळगाव (आर) (अनुसूचित जाती महिला) असे आरक्षण जाहीर झाले आहे. तसेच पंचायत समिती सभापती आरक्षण सर्वसाधारण महिला राखीव आहे.

वैराग नगरपंचायत झाल्यामुळे वैरागमधील गट आणि गण आता सध्या अस्तित्वात नसल्यामुळे नव्याने शेळगाव (आर) हा गट तयार झाला. त्या गटात शेळगाव आर आणि मानेगाव हे दोन गण नव्याने निर्माण झाले आहेत.

या दोन्ही स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी सोपल व राऊत या दोन्ही मातब्बर नेत्यांनी जय्यत तयारी केली आहे. या दोन्ही निवडणुकांमध्ये कोण बाजी मारणार हेच आता पाहावे लागेल. त्या दृष्टीने आज दोन्ही नेत्यांनी आपआपल्या गटाचे बार्शीत मेळावे घेतले आहेत.

# दुधाच्या टँकरची पिकअपला जोराची धडक; दोघांचा मृत्यू, १० जण गंभीर जखमी

## सांगोला वेळापूर रोडवरील फळवणी-आवताडे वस्तीवरील घटना

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.१५ जानेवारी-**

सांगोला-वेळापूर रोडवरील निरा कालव्या रोडजवळ पिकअपला धडक देत दुधाचा टँकर १५ ते २० जणांच्या जमावात घुसल्याने मोठा अपघात झाला. त्यामध्ये दोन जणांचा मृत्यू झाला असून दहा जण गंभीर जखमी झाले आहेत. किसन चंद्रकांत सूर्यवंशी (रा. भिगवन ता. इंदापूर) व चेतन विलास पवार (रा. आसू ता. फलटण जि. सातारा) असे मृत्यू झालेल्यांचे नावे आहेत.




अधिक वृत्त असे की, फळवणी-वेळापूर रोडवर फळवणी निरा कालवा आवताडेवस्तीजवळ पिकअप व जड ऊस वाहतुक ट्रॉक्टरचा मागून धडक दिली याचा जोराचा आवाज झाला. तेथे राहणारे भाग्यवंत अवताडे, हनुमंत अवताडे, रत्नाजीत अवताडे, समाधान आवताडे व स्थानिक ग्रामस्थ जमले. सर्वांनी मिळून ड्रायव्हरला पिकअप मधून बाहेर काढले. दोन्ही वाहनांच्या अपघाताचा वाद रोडलगत जमाव मिटवत असतानाच अचानक रात्री १०:१५ च्या सुमारास सांगोल्याकडून तेलंगणा येथील असलेला सांगोला ते पुणे दुधाची वाहतूक करणारा टँकर टीएन२८ बीसी ९१७८ हा येत होता. या ठिकाणी १५ ते २० जणांचा जमाव दोन्ही वाहनांमधील भांडणे मिटवत असताना अचानक वेगाने सांगोल्याकडून वेगाने आलेला दुधाचा टँकर पिकअपला जोरदार धडक देऊन पिकअपसमोर उभे असलेल्या जमावात घुसला. त्यामध्ये जण १० जण गंभीर तर अनेकजण किरकोळ जखमी झाले आहेत. तसेच हनुमंत आवताडे (वय ५५) यांना डोक्याला जबर मार लागला. सदर घटनेची माहीती वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी भाऊसाहेब गोसावी यांना मिळताच ते स्वतः तातडीने पोलीस उपनिरीक्षक आकाश शेळके, पोलीस उपनिरीक्षक प्रणित कांबळे, कर्मचारी नितीन लिंगडे, संदीप पाटील, गणेश माळी, तानाजी लिंगडे, नितीन माळी, कर्मचाऱ्यासह अपघातस्थळी पोहचले. पोलीस कर्मचारी समवेत मदत करून वाहनांची व्यवस्था करून जखमींना अकलूज येथे पंढरपूर येथे लाईफ लाईन येथे कॉटेज पंढरपूर येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. सोलापूर सिव्हिल हॉस्पिटल येथे काही जणांना दाखल करण्यात आले. त्यापैकी दोघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे.

या अपघातामध्ये ओंकार आवताडे, प्रमोद आवताडे, समाधान ढेकळे, दत्तात्रय ढेकळे, शंकर हिरवे, रोहित आवताडे, अभिजीत आवताडे (सर्व रा. फळवणी) तसेच शिंदेवाडी ता. माळशिरस येथील अभिषेक शिंदे, चंद्रकांत जाधव, सोनू मसगुडे हेही जखमी झाले आहेत. वेळापूर पोलीस स्टेशनमध्ये दूध टँकर चालका विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याचा अधिक तपास भाऊसाहेब गोसावी हे करीत आहेत.


# जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी पंढरपूर प्रशासन सज्ज : तहसीलदार सचिन लंगुटे

## ८ जिल्हा परिषद गट व १६ पंचायत समिती गणासाठी निवडणूक, ३०९ मतदान केंद्रे

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१५ जानेवारी -**

पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषद ८ गट व पंचायत समितीच्या १६ गणाच्या निवडणुकीच्या अनुषंगाने आचारसंहिता लागू झाली आहे. आदर्श आचार संहिता अंमलबजावणी व निवडणुका पारदर्शक व शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज झाले असल्याची माहिती सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुक -२०२६ चा निवडणुक कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्याअनुषंगाने जिल्हा परिषद, पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुक आदर्श आचार संहिता लागू झाली आहे. पंढरपूर तालुक्यामध्ये जिल्हा परिषद गट एकूण ८, पंचायत समिती गण एकूण -१६ आहेत.



पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषद गट वाखरी, करकंब, भोसे, गोपाळपूर, टाकळी, कासेगाव, रोपळे, भाळवणी हे ८ जि.प. गट आहेत. तर पंचायत समिती गण उंबरे, करकंब, भोसे, गुरसाळे, रोपळे, सुस्ते, पुळूज, गोपाळपूर, वाखरी, पटवर्धन कुरोली, भाळवणी, पळशी, टाकळी, खर्डी, कासेगाव, सरकोली हे १६ गण आहेत. यासाठी ३०९ मतदान केंद्रावर मतदान होणार आहे.

नामनिर्देशन अर्ज, त्यासोबत जोडावयाचे प्रपत्रे, छाननी, उमेदवार माघार, निवडणुक चिन्ह वाटप, मतदान दिवशी घ्यावयाची खबरदारी, अनामत रक्कम, मतमोजणी आदर्श आचार संहितेचे पालन करण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. ८ जिल्हा परिषद गटासाठी ८ कर्मचारी तर १६ पंचायत समिती गणासाठी १६ कर्मचारी फॉर्म तपासणीसाठी नियुक्त करण्यांत आले आहेत. तसेच आचारसंहिता कक्ष तयार करण्यात आला असून यामध्ये गटविकास अधिकारी त्यांचे नोडल अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत. हे आचार संहिता कक्ष पंचायत समिती, शेतकी भवन येथे असणार आहे. या कक्षात एक खिडकी कक्ष असणार असून येथे प्रचार संबधित सर्व परवानग्या दिल्या जाणार आहेत. तसेच एफएसटी, एसएसटी, व्हिएसटी पथकाव्दारे आचारसंहिता नियंत्रण केले जाणार असल्याचे सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार सचिन लंगुटे यांनी सांगीतले.

> निवडणूक कार्यक्रमाची सुचना प्रसिध्द करण्याचा दि.१६ जानेवारी, नामनिर्देशन पत्र भरण्याचा कालावधी दि. १६ ते २१, नामनिर्देशनपत्र छाणनी दि.२२ रोजी तर याच दिवशी यादी प्रसिध्द होणार, दि. २३ ते २७ उमेदवारी अर्ज माघार, दि. २७ रोजी अंतिम उमेदवारांची यादी व चिन्ह वाटप, मतदान दि.५ फेब्रुवारी रोजी सकाळी ७.३० ते ५.३० वा. पर्यंत, मतमोजणी दि. ७ रोजी करण्यात येणार आहे.

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग; नातेवाईकाविरुध्द पोक्सोअंतर्गत गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१५ जानेवारी-**

मकर संक्रांतीच्या दिवशी बार्शी शहरात घडलेल्या एका धक्कादायक घटनेत अल्पवयीन मुलीचा विनयभंग झाल्याचा प्रकार उघडकीस आला असून, याप्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात नातेवाईक असलेल्या तरुणाविरुद्ध पोक्सो कायद्यासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पीडिता ही १४ वर्षे ५ महिने वयाची असून बार्शी शहरात आपल्या आई व भावंडांसह वास्तव्यास आहे. ती सध्या इयत्ता नववीत शिक्षण घेत आहे. मकर संक्रांतीच्या दिवशी दुपारी सणानिमित्त घराबाहेर थांबलेली असताना शेजारी राहणाऱ्या तिच्या नातेवाईकाने तिच्याशी गैरवर्तन केल्याचा आरोप केला आहे.

संशयित आरोपीने पीडितेच्या डोक्यावरं हाताने मारहाण केली, अश्लील वर्तन करत वाईट नजरेने पाहून हात धरल्यांचा आरोप तक्रारीत नमूद करण्यात आला आहे. पीडितेने विरोध करत मोठ्याने ओरडताच तिची आई बाहेर आली. यावेळी संशयित आरोपीने पीडितेच्या आईलाही अश्लील शिवीगाळ केल्याचे तक्रारीत नमूद आहे. तसेच पोलिसांत तक्रार दिल्यास आत्महत्या करण्याची धमकी दिल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

घटनेनंतर पीडिता व तिच्या आईने तात्काळ बार्शी शहर पोलीस ठाण्यात हजर राहून लेखी तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी संबंधित संशयित आरोपीविरुद्ध अल्पवयीन मुलीचा विनयभंग, अश्लील वर्तन, छेडछाड, शिवीगाळ, धमकी तसेच पोक्सो कायदाअंतर्गत गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास बार्शी शहर पोलीस करत असून, पीडितेला कायद्यानुसार संरक्षण व समुपदेशन देण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

# सिध्दापुरच्या श्री मातुर्लिंग गणपतीची आमदार आवताडेंनी केली पूजा

**तभा वृतसेवा**
**मंगळवेढा दि. १५ जानेवारी**

सिद्धापूर गावचे ग्रामदैवत तसेच महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्रप्रदेशातील लाखो भाविकांचे आराध्य दैवत असलेल्या स्वयंभू श्री मातुर्लिंग गणपती यात्रेनिमित्त आपल्या मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्या हस्ते विधिवत महापूजा संपन्न झाली.



यावेळी आमदार आवताडे यांनी श्री गणरायाच्या चरणी नतमस्तक होत सर्वांच्या सुख-समृद्धी, आरोग्य आणि समाधानासाठी प्रार्थना केली. यासोबतच स्वयंभू श्री मातुर्लिंग गणपतीच्या कृपेने सदैव शांतता, भक्तिभाव आणि एकतेची भावना नांदावी, हीच सदिच्छा व्यक्त केली. धनश्री परिवाराचे संस्थापक प्रा. शिवाजीराव काळुंगे, युवक नेते प्रणव परिचारक पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरिगिड्डे, माजी जिल्हा परिषद सदस्य बापूराया चौगुले, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य प्रदीप खांडेकर, उपसरपंच सचिन चौगुले, सरपंच अमोगसिद्ध पुजारी, आर बी सी शिक्षण संस्थेचे संस्थापक गजानन पाटील आदी सहकारी तसेच भाविक आणि ग्रामस्थ उपस्थित होते. नवसाला पावनारा आशी या गणपतीची ओळख आसल्याने नवीन विवाह झालेली जोडप्यांची संख्या दर्शनासाठी आधिक होती.नदी कोरडी आसल्याने भाविकांचे दर्शन मुक्तपणे झाले,

# मकर संक्रांतीनिमित्त झाडी येथे महिलांच्या रंगल्या स्पर्धा

## एकता महिला मंचचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.१५ जानेवारी-**

झाडी (ता. बार्शी) येथे 'एकता महिला मंच'च्या वतीने मकरसंक्रांतीनिमित्त आयोजित हळदी-कुंकू आणि सांस्कृतिक कार्यक्रमात गुरुवारी, दि.१५ जानेवारीला महिलांनी विविध स्पर्धामध्ये उत्साही सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाची सुरूवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमापूजनाने झाली. विविध खेळांमध्ये महिलांनी हिरीरीने सहभाग नोंदवला. यावेळी मंचचे प्रमुख प्रभाकर क्षीरसागर, मंचाच्या झाडी गाव प्रमुख आशा चव्हाण, प्रतीक्षा सांगुळे, सरोजा मते, पल्लवी जगदाळे, पूनम माने, संध्या सरवदे, कोमल वाघमारे, पल्लवी सांगुळे, सविता सांगुळे यांसह इतर अनेक सदस्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. प्रतीक्षा सांगुळे यांनी प्रास्ताविक केले. आशा चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. सरोजा मते यांनी आभार मानले. या कार्यक्रमामुळे गावातील महिलांमध्ये आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, पहिल्यांदाच झालेल्या या भव्य सोहळ्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.



**स्पर्धा, सहभागी महिला व क्रमांक (कंसात) पुढीलप्रमाणे : संगीत खुर्ची :** पल्लवी जगदाळे(प्रथम), पूनम माने(द्वितीय),रतन उबाळे (तृतीय). **फुगडी स्पर्धा :** पूजा सांगुळे आणि बालिका मोहिते (प्रथम), शांताबाई सांगुळे आणि रतन उबाळे (द्वितीय), सविता सांगुळे आणि शालन सांगुळे (तृतीय), भाग्यश्री मते आणि जयश्री मते (उत्तेजनार्थ).

# माढा नगरपंचायतच्या स्वीकृत नगरसेवकपदी गाडेकर व साबळे



**तभा वृत्तसेवा**
**माढा, दि.१४ जानेवारी-**

माढा नगरपंचायतच्या दोन स्वीकृत नगरसेवकांनी काही दिवसांपूर्वी राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या दोन पदासाठी जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने निवडी घेण्यात आल्या. त्यामध्ये सचिन साबळे व दिनेश गाडेकर यांची स्वीकृत नगरसेवक म्हणून निवड करण्यात आली. काँग्रेसतर्फे सचिन साबळे व शहर विकास आघाडीतर्फे दिनेश गाडेकर यांची नियुक्ती करण्यात आली. या निवडीनंतर दोघांच्या समर्थकांनी फटाके फोडून व गुलाल उधळून जल्लोष केला.

माढा नगरपंचायतीच्या नामनिर्देशित सदस्य पदाची मंगळवारी निवड ठेवण्यात आली होती. यापूर्वीचे स्वीकृत सदस्य चंद्रकांत कांबळे व अरविंद खरात यांनी राजीनामा दिल्याने या दोन जागा रिक्त झाल्या होत्या. काँग्रेसच्या अॅड. मीनल साठे यांनी सचिन साबळे यांच्या नावाचे लेखी शिफारस पत्र देले तर माढा शहर विकास आघाडीच्या वतीने गटनेत्या संजीवनी भांगे यांनी दिनेश गाडेकर यांना शिफारस दिले.

या दोन नावा व्यतिरिक्त कोणताही अर्ज दाखल न झाल्याने विशेष सभेचे पीठासन अधिकारी तथा अकलूजचे मुख्याधिकारी सचिन पाटील यांनी वरील दोघांची नियुक्ती झाल्याचे घोषित केले. या दोघांचा यावेळी सन्मान करून शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी नगराध्यक्षा अॅड. मीनलताई साठे, उपनगराध्यक्षा कल्पनाताई जगदाळे, नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी नेहा कंठे, गटनेत्या नगरसेविका संजीवनी भांगे, सभापती रेशमा लंकेश्वर सभापती मोहिनी नेटके,नगरसेविका निर्मला थोरात, शबाना बागवान, राजाभाऊ चवरे, वेदांत साठे, सुधीर लंकेश्वर, नगर सेवक आजिनाथ माळी, नगरसेवक विकास साठे, नगरसेवक अरुण कदम,नगरसेवक नाना साठे, नगरसेवक राजू गोटे, आदित्य भांगे, शंभूराजे चवरे, सुमन गाडेकर, बापू साबळे,अनिकेत चवरे, प्रदिप भांगे, राजू भांगे आदी उपस्थित होते.

# नव्याने भाजपमध्ये आलेल्यांवर योगेश बोबडे यांची नाराजी

## माढा तालुक्यात निवडणुकीआधी खळबळ

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. १५ जानेवारी -**

आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या तोंडावर माढा तालुक्यात भाजपमध्ये मोठी खळबळ उडाली असून, नुकतेच भाजपमध्ये प्रवेश केलेल्या नेत्यांकडून जुन्या कार्यकर्त्यांना डावलले जात असल्याचा आरोप करत भाजप माढा तालुका पश्चिम मंडलाध्यक्ष योगेश बोबडे यांनी थेट नाराजी व्यक्त केली आहे. टेंभुर्णी येथील भाजप संपर्क कार्यालयात घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी वरिष्ठ नेतृत्वालाच इशारा देत जुन्या कार्यकर्त्यांना न्याय न मिळाल्यास त्याचा थेट परिणाम निवडणुकांवर होईल, असे ठाम विधान केले.



राज्यभरात भाजपमध्ये मोठ्या प्रमाणावर पक्षप्रवेश सुरू असून भाजप हा राज्यातील सर्वात प्रभावी पक्ष ठरत आहे. अनेक ठिकाणी भाजपचे उमेदवार बिनविरोध निवडून येत असतानाच, माढा तालुक्यात मात्र जुन्या, निष्ठावान कार्यकर्त्यांमध्ये तीव्र असंतोष पसरलेला दिसून येत आहे. अनेक वर्षांपासून पक्षासाठी काम करणाऱ्या पदाधिकाऱ्यांना डावलून अलीकडे पक्षात आलेल्या नेत्यांना प्राधान्य दिले जात असल्याची भावना उघडपणे व्यक्त करण्यात आली. पत्रकार परिषदेत बोलताना बोबडे म्हणाले की, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या अनुषंगाने पक्षाच्या वरिष्ठांनी स्थानिक पातळीवरील कार्यकर्ते विश्वासात घ्यायला हवेत. नव्या नेत्यांच्या दबावाखाली जुन्या कार्यकर्त्यांना बाजूला सारले गेले, तर कार्यकर्त्यांना वेगळी भूमिका घ्यावी लागेल. याचा थेट फटका भाजपला बसेल, असा गंभीर इशाराही त्यांनी दिला. माजी आमदार बबनदादा शिंदे यांचे सुपुत्र रणजीतसिंह शिंदे व विक्रमसिंह शिंदे यांचे नाव न घेता अलीकडे भाजपमध्ये आलेल्या काही नेत्यांकडून कुर्डूवाडी नगरपरिषद निवडणुकीत भाजपच्या अधिकृत पॅनलकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोप बोबडे यांनी केला. आपण स्वतः अकोले पंचायत समिती गटातून निवडणूक लढवण्यास इच्छुक असल्याचे सांगितले. पदाधिकारी निवडणूक लढवण्यास इच्छुक असून, त्यांना सन्मानजनक व न्याय्य उमेदवारी देण्यात यावी, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली.

बोबडे पुढे म्हणाले की, कुर्डूवाडी नगरपरिषद निवडणुकीत शिवसेनेने भाजपला विश्वासात न घेता स्वतंत्र पॅनल उभा केला होता. त्यामुळे आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये शिवसेना स्वतंत्र लढत असल्यास भाजप त्यास विरोध करणार नसल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी भाजप कुर्डूवाडी मंडलाध्यक्ष अविनाश गोरे यांनीही मत मांडले. माढा तालुक्यात भाजप स्वबळावर लढवण्यासाठी तालुक्यातील सर्व पदाधिकाऱ्यांच्या बैठका सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. भाजप माढा तालुका पूर्व मंडलाध्यक्ष योगेश पाटील यांनी भाजपचे कार्यकर्ते, पदाधिकारी व बूथ सदस्य गेल्या निवडणूक तयारीत सक्रिय आहेत.

तालुक्यातील सर्व पदाधिकाऱ्यांची विचारविनिमय बैठक आयोजिली आहे. त्यातील निर्णय व ठराव पक्षश्रेष्ठींपर्यंत पोहोचवण्यात येणार आहेत. ही पत्रकार परिषद भाजप माढा तालुका पश्चिम मंडलाध्यक्ष योगेश बोबडे, कुर्डूवाडी मंडलाध्यक्ष अविनाश गोरे, माढा तालुका पूर्व मंडलाध्यक्ष योगेश पाटील तसेच भाजपचे अनेक जुने पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत पार पडली.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# ठाकरेंच्या मुंबईतील २५ वर्षांच्या सत्तेला सुरुंग ?

## महायुतीला बहुमत मिळविण्याचा एक्झिट पोलचा कल

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १५ जानेवारी -**

पूर्ण देशाचे लक्ष लागून राहिलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेसाठी गुरुवारी मोठया चुरशीने व तणावपूर्ण वातावरणात मतदान झाले. त्यानंतर एक्झिट पोलचे अंदाज उघड करण्यात आले असून त्यामध्ये सर्वच कंपन्यांनी भाजप आणि शिवसेना शिंदें गट स्पष्ट बहुमत मिळवून सत्तेत येण्याचा दावा केला आहे. त्यांना १२५ ते १३८ जागा मिळतील तर २५ वर्षे सत्तेत असलेल्या उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला मनसेला सोबत घेऊनही ५८ ते ६८ जागा मिळवतील आणि काँग्रेस -वंचित आघाडीचे २० ते २५ नगरसेवक निवडून येतील, असा अंदाज वर्तविला आहे.

एक्झिट पोलच्या अंदाजानुसार ठाकरेची मुंबईतील सत्ता खालसा होण्याची शक्यता वर्तविण्यात आला असून शुक्रवारी मतदानाची मतमोजणी झाल्यानंतर स्पष्टता येणार आहे.

मुंबई महापालिकेच्या २२७ जागांसाठी आज सरासरी ५२ टक्के मतदान झाल्याचा अंदाज आहे. अंतिम आकडेवारी निवडणूक आयोगाकडून अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. त्या आधी विविध कंपन्यांनी सर्व्हे जाहीर केला आहे. त्यामध्ये भाजप आणि शिंदे यांच्या युतीला १३८ जागा मिळणार असल्याचा अंदाज आहे. त्याचवेळी ठाकरे बंधू आणि पवारांच्या राष्ट्रवादीला फक्त- ६८ जागा मिळतील. तर काँग्रेस आणि वंचित आघाडीला २० -२५जागा आणि इतर पक्षांना ७ जागा मिळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

### लोकशाही रुद्र रिसर्च एक्झिट पोल

त्याचवेळी लोकशाही आणि रुद्र रिसर्च यांच्याही एक्झिट पोलची आकडेवारी समोर आली आहे. या आकडेवारीनुसार, मुंबईत भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेला १२१ जागा मिळतील. तर ठाकरेंच्या युतीला ७१ जागा मिळतील. काँग्रेस आणि वंचितच्या आघाडीला मुंबईत २५ जागा मिळतील असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

भाजप -शिवसेना - १२१
शिवसेना ठाकरे- मनसे - ७१
काँग्रेस वंचित - २५
इतर - १०

जेवीसी एक्झिट पोलनुसार, मुंबईत भाजपची सत्ता येणार असून सर्वाधिक मतदान टक्काही त्या पक्षाला मिळणार आहे. या अंदाजानुसार कोणत्या पक्षाला जागा आणि किती टक्के मतदान मिळणार अशी खालीलप्रमाणे,

भाजप शिंदे - १२५-१३३८
ठाकरे- मनसे - ५८-६८
काँग्रेस-वंचित - २०-२५
इतर - ७

### मतांची टक्केवारी किती ?

महायुती : ४२-४५%
शिवसेना ठाकरे- मनसे : ३४-३७%
काँग्रेस- वंचित : १३-१५%
इतर : ६-८%

### जेडीएस मुंबई एक्झिट पोल

भाजप शिंदे - १२७-१५४
ठाकरे- मनसे - ४४-६४
काँग्रेस-वंचित - १६-२५
इतर - ०९-१७

### अक्सिस माय इंडिया मुंबई एक्झिट पोल

भाजप शिंदे - १३१- १५१
ठाकरे- मनसे - ५८-६८
काँग्रेस-वंचित - १२-१६
इतर - ६-१२

### मतदानाची टक्केवारी कशी ?

भाजप शिंदे - ४२
ठाकरे- मनसे - ३२
काँग्रेस-वंचित - १३
इतर - १३

## मतदानासाठी तारे जमी पर

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १५ जानेवारी -**

मुंबई महापालिकेसाठी गुरुवारी झालेल्या मतदानाची अंतिम टक्केवारी अद्याप जाहीर झालेली नाही. मात्र मुंबईतील विविध क्षेत्रातील सिलेब्रेटीनी आपल्या मतदानाचा हक्क बजाविला आहे. स्वतः सह कुटुंबिया समवेत त्यांनी मतदान केले. त्यानंतर सर्व मतदारांना मतदान करण्याचा हक्क बजाविण्याचे आवाहन केले.

मुंबईत पश्चिम उपनगरातल्या जूहू भागात मोठ्या प्रमाणात सिलेब्रेटी राहातात. त्यामुळे इथल्या मतदान केंद्रावर या कलाकारांची झलक पाहण्यासाठी मिळाली. त्यामध्ये

बॉलिवूडमध्ये अण्णा नावाने परिचित असलेल्या सुनिल शेट्टीने आपला मतदानाचा हक्क बजावला. मतदान केल्यानंतर त्याच्या चाहत्यांनी त्याला गराडा घातला होता. त्याच्या बरोबर अनेकांनी सेल्फे ही घेतली. सुनिल शेट्टी प्रमाणे सलमान खान,जॉन इब्राहीम याने ही मतदान केले.

यावेळी तो मतदानासाठी आपल्या आई वडीलांनाही घेवून आला होता. त्याच बरोबर अभिनेत्री आणि भाजप खा. हेमा मालिनी ही आपल्या मतदानाच हक्क बजावला. जुहू इथल्या मतदान केंद्रावर अक्षय कुमार आला होता. त्याने मतदान केल्यानंतर एका तरुणीने त्याच्या पाया पडले. त्यावेळी त्याने तिला रोखले. शिवाय सर्वांना मतदान करण्याचे आवाहन केले. अक्षय सोबत त्याची पत्नी ट्विंकल खन्नाने हिनेही मतदान केले. मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर, त्याची पत्नी अंजली तेंडुलकर, कन्या सारा तेंडुलकर यांनीही मतदानाचा हक्क बजाविला.





केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी महाल येथील न्यू इंग्लिश शाळेत मतदान केले. यावेळी त्यांच्यासोबत स्नुषा ऋतुजा, मुलगा निखिल, आ. प्रवीण दटके, पत्नी कांचन गडकरी आणि स्नुषा मधुरा उपस्थित होते

## लोककेंद्रित धोरणांतून लोकशाहीचे बळकटीकरण : ओम बिर्ला

◆ **नवी दिल्ली, १५ जानेवारी**



संपूर्ण जगाचे लक्ष पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाकडे लागले असताना ते जागतिक आव्हानांवर निर्णायक तोडगा काढत आहे, असे लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी गुरुवारी सांगितले. भारताच्या सात दशकांपेक्षा जास्त काळाच्या संसदीय प्रवासात लोककेंद्रित धोरणे आणि कल्याणकेंद्रित कायद्यांद्वारे लोकशाही अधिक मजबूत झाली आहे, असे ओम बिर्ला यांनी संविधान सदनाच्या ऐतिहासिक सेंट्रल हॉलमध्ये राष्ट्रकुल देशांच्या सभापती आणि पीठासीन अधिकाऱ्यांच्या २८ व्या परिषदेला संबोधित करताना सांगितले.

निष्पक्ष आणि निःपक्षपाती निवडणूक प्रणालीने सर्व पात्र नागरिकांसाठी सहभागात्मक लोकशाही सुनिश्चित केली आहे, असे त्यांनी ठामपणे सांगितले. संसद आणि सरकार यांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे अनेक अनावश्यक आणि कालबाह्य कायदे रद्द करणे आणि कल्याणकारी दृष्टिकोन असलेल्या नवीन कायद्यांची निर्मिती करणे शक्य झाले आहे.

अशा कायदे आणि धोरणांच्या अंमलबजावणीमुळे भारताला आत्मनिर्भर आणि विकसित देश बनण्यास मदत होते, असे बिर्ला म्हणाले. *(वृत्तसंस्था)*

## व्हिसा बंदी मागे घ्या

### अमेरिकेने जागा दाखवल्यावर पाकिस्तानची विनंती

◆ **इस्लामाबाद, १५ जानेवारी**

अमेरिकेने रशिया, इराण, बांगलादेश, अफगाणिस्तान आणि पाकिस्तानसह ७५ देशांसाठी सर्व व्हिसा प्रक्रिया स्थगित केली. यादीत पाकिस्तानचा समावेश करीत अमेरिकेने त्यांना जागा दाखवली. यामुळे समाज माध्यमांवर नागरिकांकडून पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्यावर टीका होत आहे. अशातच पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाने व्हिसा बंदी मागे घेण्याची विनंती अमेरिकेकडे केली आहे.

पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते ताहिर अंद्राबी यांनी गुरुवारी पत्रपरिषदेत सांगितले की, व्हिसा प्रक्रिया स्थगितीच्या यादीत आमच्या देशाचा समावेश होईल, असा विचार आम्ही केला नव्हता. दोन्ही देशांचे संबंध बळकट असताना हा निर्णय निश्चितच आम्हाला दुखावणारा आहे. यासंदर्भात अमेरिकन अधिकाऱ्यांशी संपर्क साधला आणि पाकिस्तानला यादीतून काढण्याची विनंती केली. आम्हाला विश्वास आहे की, अमेरिका आमची मागणी निश्चितच गांभीर्याने घेईल.

हा निर्णय केवळ अंतर्गत पुनरावलोकनाचा भाग आहे आणि अधिक माहिती मिळविण्यासाठी अमेरिकन अधिकाऱ्यांच्या सतत संपर्कात आहे. या निर्णयामुळे दरवर्षी अमेरिकन व्हिसासाठी अर्ज करणाऱ्या हजारो पाकिस्तानी नागरिकांच्या प्रवास, अभ्यास आणि कामाच्या योजनांना विलंब होऊ शकतो. व्हिसा बंदीची अंमलबजावणी २१ जानेवारीपासून सुरू होईल आणि विभाग व्हिसा प्रक्रियेचे पुनर्मूल्यांकन करेपर्यंत अनिश्चित काळासाठी सुरू राहील. *(वृत्तसंस्था)*

## खुर्सापार जंगलातील ५ पैकी १ वाघोबा अडकला

### डोंगरगाव शिवारात कारवाई

◆ **समुद्रपूर, १५ जानेवारी**

तालुक्यातील गिरड खुर्सापार परिसरात गेल्या वर्षभऱ्यापासून मुक्कामी असलेल्या ५ वाघांच्या कुटुंबाने दहशत निर्माण केली. या वाघांनी अनेक जनावरांचा फडशा पाडला. त्यामुळे बंदोबस्त करण्याची मागणी केली होती. आ. समिर कुणावार यांच्या पाठपुराव्याने पाचही वाघांना पकडण्याचा आदेश मिळाला होता. त्यामुळे एका वाघाला पिंजऱ्यात अडविण्यात वनविभागाच्या कर्मचाऱ्यांना यश आले. या वाघाला पेंच व्याघ्रप्रकल्पात नेण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी दुपारी वाघाने डोंगरगाव शिवारातील राजू भुजाडे यांच्या गोऱ्यावर हल्ला चढवून ठार केले. माहिती मिळताच नवेगाव नागझिरा येथील रॅपिड रेस्क्यू टीम, पीपल फॉर ॲनिमल्सचे वर्धा पथक व वनविभागाचे अधिकारी, कर्मचाऱ्यांनी सापळा रचला. दुपारी ४.१५च्या सुमारास वाघ पुन्हा येथे आला असता त्याला डार्ट मारून बेशुद्ध करून पिंजऱ्यात टाकले. गेल्या ११ दिवसांपासून या वाघाच्या मागावर वनविभागाचे संपूर्ण पथक होती.



वाघाला पकडणारी वनविभागाची चमू

आ. कुणावार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, वनमंत्री गणेश नाईक तसेच वनविभागाच्या अधिकाऱ्यांकडे वाघांना जेरबंद करण्याची मागणी केली होती. उपवनसंरक्षक हरबिदर सिंग, सहायक वनसंरक्षक हरीलाल सरोदे, वनपरिक्षेत्र अधिकारी निलेश गावंडे यांच्या मार्गदर्शनात या वाघांच्या कुटुंबीयांना जेरबंद करण्यासाठी पथक युद्ध पातळीवर काम करीत आहे.

६० च्यावर अधिकारी व कर्मचारी वाघांच्या मागावर असून, या ५ वाघांना जेरबंद करण्यासाठी रननीती आखली आहे. त्यामुळे वनविभागाच्या पथकाचा या पाचही वाघांना जेरबंद करण्याचा मार्ग मोकळा झाला असला, तरी वाघ हातात येत नव्हता. आ. कुणावार स्वत: रोज वनविभागाच्या अधिकाऱ्यांकडून आढावा घेत होते.

आ. कुणावार यांनी समुद्रपूर येथे वाघाला डार्ट मारणाऱ्या शूटरसह वनविभागाच्या पथकाचे कौतुक केले आहे. उरलेल्या ४ वाघांना सुद्धा जेरबंद करण्याचा विश्वास वनविभागाच्या चमूने व्यक्त केला आहे. *(तभा वृत्तसेवा)*

## सोलापूर महानगरपालिका प्रभागनिहाय मतमोजणी आराखडा

| अ.क्रं. | स्ट्रॉंग रुम व मतमोजणी ठिकाण | प्रभाग क्रमांक |
|---|---|---|
| १ | दयानंद कॉलेज, सोलापूर | १, २, ३, ४ |
| २ | सिंहगड कॉलेज, सोलापूर | ५, ६, ७, १५ |
| ३ | शासकिय तंत्रनिकेतन, शांती चौक,अक्कलकोट रोड | ८, ९, १४ |
| ४ | कुचन हायस्कूल, सोलापूर | १०, ११, १२, १३ |
| ५ | कै.वि.मो.मेहता प्राथमिक शाळा, सोलापूर | १६, १७, १८, २१ |
| ६ | नू.म.वि., डफरीन चौक | १९, २०, २५ |
| ७ | शहिद राहुल शिंदे, बहुउद्देशीय सभागृह,एसआरपीएफ कॅम्प, | २२, २३, २४, २६ |

| अ.क्र. | निवडणूक निर्णय अधिकारी | प्रभाग क्रमांक | EVM मतमोजणी टेबल | पोस्टल मोजणी टेबल | फेरी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| 1 | RO 1 | 1 | 14 | 1 | 3 |
| 2 | RO 1 | 2 | 14 | 1 | 3 |
| 3 | RO 1 | 3 | 14 | 1 | 3 |
| 4 | RO 1 | 4 | 14 | 1 | 3 |
| 5 | RO 2 | 5 | 15 | 1 | 3 |
| 6 | RO 2 | 6 | 15 | 1 | 3 |
| 7 | RO 2 | 7 | 15 | 1 | 3 |
| 8 | RO 2 | 15 | 15 | 1 | 3 |
| 9 | RO 3 | 8 | 17 | 1 | 3 |
| 10 | RO 3 | 9 | 16 | 1 | 3 |
| 11 | RO 3 | 14 | 15 | 1 | 3 |
| 12 | RO 4 | 10 | 16 | 1 | 3 |
| 13 | RO 4 | 11 | 16 | 1 | 3 |
| 14 | RO 4 | 12 | 16 | 1 | 3 |
| 15 | RO 4 | 13 | 16 | 1 | 3 |
| 16 | RO 5 | 16 | 15 | 1 | 3 |
| 17 | RO 5 | 17 | 15 | 1 | 3 |
| 18 | RO 5 | 18 | 15 | 1 | 3 |
| 19 | RO 5 | 21 | 15 | 1 | 3 |
| 20 | RO 6 | 19 | 12 | 1 | 4 |
| 21 | RO 6 | 20 | 12 | 1 | 5 |
| 22 | RO 6 | 25 | 12 | 1 | 3 |
| 23 | RO 7 | 22 | 16 | 1 | 4 |
| 24 | RO 7 | 23 | 16 | 1 | 3 |
| 25 | RO 7 | 24 | 16 | 1 | 3 |
| 26 | RO 7 | 26 | 16 | 1 | 2 |
| | | | 388 | 26 | 81 |

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# नव्या पर्वाचा मुहूर्त

आरोप-प्रत्यारोप, टीकाटिप्पणी, टोमणे, खिल्ली, चारित्र्यहनन, व्यंगोक्ती या सगळ्या योग्य-अयोग्य हत्यारांचा वापर करून महाराष्ट्रातील २९ महानगर पालिकांच्या निवडणुकांच्या रणांगणावर साचलेला दूषित राजकारणाचा धुरळा आज खाली बसेल आणि संध्याकाळी याच रणांगणावर विजयाचे झेंडे फडकू लागतील. ज्या मैदानावरून एकमेकांवर प्रहार झाले, तेथे केवळ फुलांचा वर्षाव, हारतुरे दिसतील. प्रचारासाठी प्रभाग पिंजून काढणाऱ्या फेऱ्या ज्या रस्त्यावरून निघाल्या, त्याच रस्त्यांवर विजयी मिरवणुका निघतील. मतदारांना आभारपूर्वक अभिवादन करण्यासाठी विजयी उमेदवारांचे हात उंचावले जातील. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेतील सर्वात महत्त्वाचा, दीर्घकाळ रखडलेला आणि सर्वच राजकीय पक्षांच्या कमालीच्या प्रतिष्ठेचा ठरलेला महापालिका निवडणुकांचा टप्पा पार पडला आहे. विकासाची नवी स्वप्ने पाहणाऱ्या, विकसित अवस्थेचे समाधान मिरविणाऱ्या या शहरांची नवी राजकीय वाटचाल सुरू होईल. निवडणुकांच्या आधी विविध राजकीय पक्षांनी जाहीरनामे, वचननामे किंवा अशाच काही गोंडस नावांनी मतदारांस दिलेल्या आश्वासनांची कसोटी आता सुरू होईल. ज्या गोष्टीपासून वर्षानुवर्षे वंचित राहण्याची वेळ आली, ज्या अभावग्रस्ततेमुळे असंख्य गैरसोयींचा सामना करावा लागला, त्या गोष्टी इतिहासजमा होणार, अशा अपेक्षा पल्लवित करणाऱ्या घोषणांचा आणि आश्वासनांचा गदारोळ मतदारांच्या कानाशी घुमत होता. विकासाच्या मुद्द्यावर वारंवार लढविल्या जाणाऱ्या निवडणुका विकासाच्या मुद्द्यावरच लढविल्या गेल्या. विकासाच्या मुद्द्याचे गांभीर्य कमी होऊ द्यायचे नाही, असे मतदारांनी ठरविले असेल, तर तो मतदारांच्या मनाचा मोठेपणा मान्य करावाच लागेल. एका बाजूला केवळ विकासाच्या मुद्द्यांचा प्रयत्न आणि दुसरीकडे अतार्किक, घासून गुळगुळीत झालेल्या बिनबुडाच्या आरोपांचे गुऱ्हाळ, केवळ मतदारांना संभ्रमित करणाऱ्या व कोणताही आधार नसलेल्या बाबींचा बागुलबुवा मतदारांसमोर उभा करून द्वेष पसरविण्याची कारस्थाने अशा वातावरणात या निवडणुका पार पडल्या आहेत.

गेल्या काही महिन्यांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक उलटसुलट, अनपेक्षित आणि कमी-अधिक धक्कादायक अशा घडामोडी घडल्या. खुद्द बाळासाहेब ठाकरे यांना जे जमले नाही, ते राज आणि उद्धव ठाकरे यांच्या गट व पक्षांचे तब्बल दोन दशकांचे वैर मागे ठेवून हे दोघे बंधू निवडणुकीसाठी एकत्र आले. ज्या नेतृत्वाच्या संघर्षातून दोन दशकांपूर्वी राज ठाकरे यांनी शिवसेनेचा त्याग करून राजकीय अस्तित्वाची वेगळी चूल मांडली, तो वाद विसरून राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांचे नेतृत्व मान्य केले. गेल्या पाच-सहा वर्षांत उद्धव ठाकरे यांच्या पक्षाची पुरती वाताहत झाली. अलिकडच्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील मतदारांनी त्यांच्या पक्षास पुरते झिडकारून टाकले आणि मोजक्या साथीदारांनिशी एक राजकीय गट चालविणाऱ्या उद्धव ठाकरे यांच्या राजकीय अस्तित्वावरच अस्थिरतेचे सावट दाटले. राज ठाकरे यांचा पक्ष तर सातत्याने गमावत राहिला होता. त्यामुळे दोघांच्याही अस्तित्वाच्या या अखेरच्या संधीसाठी अपरिहार्य ठरलेले ऐक्य या निवडणुकीच्या निमित्ताने घडले. देशातील सर्वात मोठे अर्थकारण असलेली, सुमारे ७५ हजार कोटी रुपयांचा अर्थसंकल्प असलेली मुंबई महापालिका ही राजकीयदृष्ट्या सोन्याचे अंडे देणारी कोंबडी आहे, असे म्हटले जाते. या महापालिकेची सत्ता राखण्यासाठी आणि सत्ता प्राप्त करण्यासाठी भाजपाप्रणित महायुती व दुसरीकडे ठाकरे बंधूंची युती असा थेट सामना ही या टप्प्यातील निवडणुकांमधील सर्वाधिक चुरशीची बाब ठरली. आज या महापालिकेवर कोणाचा झेंडा फडकणार, याकडे केवळ मुंबईकरांचेच नव्हे, तर उभ्या देशाचे, जगाचे लक्ष लागून राहिले असून सत्ताधारी महायुतीची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. दुसरीकडे ठाकरे बंधूंच्या भविष्यातील अस्तित्व पणाला लागले आहे. राज्यातील नगरपरिषदांच्या निवडणुकांमध्ये विरोधकांनी, विशेषतः ठाकरे बंधूंनी आणि काँग्रेसनेदेखील विजयाची अपेक्षा सोडूनच दिली होती. विधानसभेच्या निवडणुकीत मतदारांनी दाखविलेली मानसिकता बदलून पुन्हा राज्यातील मतदारांचा विश्वास प्राप्त करण्यात फारसे प्रयत्नही न केल्याने, नगर परिषदांच्या निवडणुकांत सत्ताधारी भाजपाला विजयाचा मार्ग आपसूक मोकळा करून देत झाकल्या मुठीतील गुपित कायम राखण्यातील शहाणपणा विरोधकांनी ओळखला. आमच्यातील व्यक्तिगत हेव्यादाव्यांपेक्षा महाराष्ट्राचे हित महत्त्वाचे आहे, असे म्हणत महाराष्ट्राची काळजी करण्याकरिता एकत्र आल्याचा कांगावा करून मुंबई महापालिकेपलीकडच्या महाराष्ट्राकडे कोठेही फारसे लक्ष न देणाऱ्या ठाकरे बंधूंच्या पक्षास महाराष्ट्राची काळजी असती, तर तेथील जनतेच्या मतांचा कौल आजमावण्याची संधी नगरपरिषदांच्या निवडणुकांत समोर उभी असूनही त्यांनी त्या संधीकडे पाठ फिरवली, तेव्हाच महाराष्ट्राचे हित हा केवळ कांगावा असून अस्तित्वाचा प्रश्न हेच ऐक्याचे अपरिहार्य कारण असल्याचे महाराष्ट्राने ओळखले होते. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी त्यांनी आपले उरलेसुरले अस्तित्व आणि दिवंगत बाळासाहेबांची पुण्याई पणाला लावली, तेव्हा त्या कारणावर शिक्कामोर्तबही झाले होते. म्हणूनच या महापालिकेवरील सत्तेचे ठाकरेंच्या झेंड्याचे भविष्य आजच ठरणार आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्याईची शिदोरी एवढे एकमेव भांडवल हाती असलेल्या राज आणि उद्धव ठाकरे यांनी नेहमीप्रमाणे मुंबईत मराठी-अमराठी वाद भडकावण्याचे पुरेपूर राजकारण केले. मुंबईवरील मराठीचा ठसा पुसला जाऊ नये म्हणून एकत्र आल्याचे सांगणाऱ्या ठाकरेंनी या निवडणुकीतही तेच पत्ते मतदारांसमोर धरले. मराठी मतदाराचे भावनिक विश्व या नाजूक मुद्द्याभोवती फिरते आहे. मुंबई हा भारताच्या सांस्कृतिक परंपरेचा आरसा असल्याने, या महानगरीच्या विकासात मराठी माणसाच्या बरोबरीने वाटा असलेल्या अन्य प्रांतांतील असंख्य मतदारांवर ठाकरेंच्या मराठीप्रेमापोटी अमराठींच्या विरोधात टोकाची द्वेषाची बीजे पेरण्याच्या राजकारणाचा आज फैसला होणार आहे. यामध्ये अमराठींच्या विरोधात टोकाची द्वेषाची बीजे पेरण्याच्या राजकारणाचा किती परिणाम होतो याचाही आज फैसला होणार आहे.

गेल्या अनेक निवडणुका सातत्याने गमावणाऱ्या विरोधकांनी केवळ राजकारणापोटी देशातील लोकशाही यंत्रणांवरच संशयाची सुई रोखण्याचे प्रयत्न केले. निवडणूक आयोगासमोर आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून या यंत्रणेविषयी जनतेच्या मनात अविश्वास पेरण्याचेही अनेक प्रयत्न झाले. लोकशाही यंत्रणांविषयी द्वेष पेरणे आणि जनतेमध्ये संभ्रम निर्माण करून त्याचा राजकीय लाभ उठविण्याचा मोठा आटापिटा सातत्याने सुरू राहिला. यापैकी कोणताच प्रयत्न यशस्वी झाला नाहीच; उलट आरोपांचे मुद्दे पुराव्यानिशी सिद्ध करण्याचे साधे आव्हानही कोणीच स्वीकारले नाही. आरोप सिद्ध न करता संभ्रम माजविण्यासाठी प्रयत्न करण्याच्या या प्रयत्नांनाही जनतेचा प्रतिसाद मिळाला नाही, हे निकालांवरून सातत्याने स्पष्ट होत गेले, तरी त्या प्रयत्नांचा हट्ट विरोधकांनी आजही सोडलेला नाही, अशी शंका येण्याजोगी नवी परिस्थिती महापालिका मतदान प्रक्रियेदरम्यान निर्माण झाली. मतदान केल्याची खूण म्हणून मतदाराच्या बोटावर लावण्यात आलेली शाई सहज पुसली जाते, याच्या प्रात्यक्षिकांची चढाओढ सुरू झाली. असे झाल्यास मतदारांस पुन्हा मतदान करता येईल, असा संभ्रम पसरविण्याचा प्रयत्न निवडणूक आयोगाने निःसंदिग्धपणे हाणून पाडला आहे. शाई पुसली गेली तरी तोच मतदार पुन्हा मतदान करू शकणार नाही, याची पूर्ण दक्षता निवडणूक आयोगाने घेतली आहे. त्याने तसा प्रयत्न केल्याचे स्पष्ट झाल्यास योग्य ती कायदेशीर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशाराही दिला. बोटास लावण्याच्या शाईकरिता मार्कर पेन वापरण्याचा निर्णय निवडणूक आयोगाने २०११ मध्येच घेतला होता. त्यामुळे शाई पुसण्याचा प्रयत्न करून पुन्हा मतदान करणे हे गैरकृत्य ठरणार असून मतदानाच्या पवित्र जबाबदारीविषयीची नागरिकांचा बेजबाबदारपणा ठरणार आहे. मतदार या नात्याने अशा बेजबाबदारपणाचा ठपका बसू नये याकरिता निवडणूक यंत्रणेपेक्षाही, मतदारांनी सजग राहण्याची गरज आहे. कारण आरक्षणाच्या मुद्द्यावरून रखडलेल्या जिल्हा परिषदांच्या निवडणुकांचा टप्पा अजून शिल्लक आहे. ▮

## प्रासंगिक

**विजय पांढरीपांडे**

# आपणच लिहिलेली शोकांतिका

या शतकाचे पाव शतक संपत आले. स्वातंत्र्य मिळून तर ७५ वर्षे झालीत. आपला सशक्त लोकशाही असलेला देश. आतापर्यंत विविध राज्यात, केंद्रात आलेल्या वेगवेगळ्या सरकारचे क्लेम खरे मानले तर आपल्या देशाने सर्वच क्षेत्रात फक्त विकासच केला. या लोकशाही देशात आपण निवडून दिलेले लोकप्रतिनिधी हे फक्त लोकसेवाच करतात. ते एकनिष्ठ आहेत आपल्या पक्षाशी, पक्षाच्या विचारधारेशी. त्यांच्या या विचारधारा सारख्या बदलतात. प्रत्येकाला काहीतरी नवे हवे असते सारखे. जुन्याचा पटकन कंटाळा येतो. लोकसेवक असल्याने प्रत्येकाला स्वतःचाही विकास तितकाच महत्त्वाचा वाटतो; किंबहुना स्वतःचाच विकास जास्त महत्त्वाचा असतो राजकारणात. मग त्यासाठी काहीही करायची तयारी. कोणत्याही स्तराला जायची तयारी. निवडणुका आल्या की होणारे तमाशे, उडणारी धुळवड, चिखलफेक आपण बघतोच. हे आक्का, भाई, दादा, बाहुबली काहीही करू शकतात. मारामाऱ्या, खून, खोक्याची देवघेव... अगदी काहीही. कसलेही खास उत्पन्न, कामधाम नसताना हे लोकसेवक लखपती-करोडपती कसे होतात, याचा कुणीच शोध घेत नाही आपल्या सुधारलेल्या लोकशाही, विकसनशील देशात!

आपण शिक्षण क्षेत्रात सुधारणेचे दावे करतो. गेली पाच वर्षे सारखे एनईपी म्हणजे नव्या शैक्षणिक धोरणाचे ढोल पिटले जाताहेत. अगदी जागतिक विद्यापीठाशी स्पर्धा सुरू असल्यासारखी वातावरण निर्मिती केली जातेय. पण अजूनही अनेक शाळेत शिक्षक नाहीत. स्वच्छतागृहाची नीट सोय नाही. प्रयोगशाळा, संगणक, इंटरनेटसारख्या सुविधा नाहीत. महाविद्यालयात तर विद्यार्थीच येत नाहीत वर्गात; तरी निकाल छान छान लागतात. संशोधक विद्यार्थी कॉपी पेस्ट करून प्रबंध लिहितात. त्यावर मान्यतेसाठी सही करायला प्राध्यापक लाखो रुपये घेत असल्याच्या बातम्या येतात. खाजगी कॉलेजेसची तपासणी, प्राध्यापकाच्या नेमणुका, त्यासाठी होणारी लाखोंची देवघेव हे सगळे आता उघडे गुपित झाले आहे. काही अपवाद वगळता कुलगुरू नेमणुकीत होणारा राजकीय हस्तक्षेप; मग अशा कुलगुरूंपैकी काहींनी केलेला पैशाचा अपहार, त्याचे मीडियातील व्हिडीओ क्लिप याचीही आपल्याला सवय झालीय. अशा भ्रष्टाचारात अडकलेल्या कुणाची चौकशी झाली, त्यांना शिक्षा झाली, त्याची पेन्शन थांबवली



असे ऐकिवात नाही. ही भ्रष्टाचारी माणसे समाजात उजळ माथ्याने वावरताना दिसतात. लोकांना ज्ञान पाजळायला मोकळे फिरतात. आपल्याकडे आयआयटीसारख्या उच्च शिक्षण संस्थात सरकारच्या, जनतेच्या पैशाने शिक्षण घेऊन आपलेच होतकरू तरुण, हुशार विद्यार्थी जगाचे कल्याण करायला परदेशात जातात अन् आपल्या आई-वडिलांना इकडे एकटे सोडून तिकडचेच होऊन बसतात. यालाच देशसेवा म्हणतात. कारण ते म्हणे इकडे डॉलर्स पाठवतात; ज्यामुळे देशाचा विदेश निधी वाढतो. देश थोडाबहुत आर्थिकदृष्ट्या संपन्न होतो. आपण कोणत्याही गोष्टीकडे कोणत्या दृष्टिकोनातून बघतो त्यावर फायदे-तोटे, चांगले-वाईट, योग्य-अयोग्य ठरत असते.

आपले शालेय शिक्षण तर इतके छान छान झालेय की विचारूच नका. कॉन्व्हेन्ट, इंटरनॅशनल, ग्लोबल अशी नावे असलेल्या, विस्तीर्ण वातानुकूलित कॅम्पस असलेल्या शाळांतील पहिली-दुसरीची फी लाखो रुपये असते. म्हणजे इंजिनीअरिंग शिक्षणापेक्षाही महाग! पण इथेही लांब लाईन असते ॲडमिशनसाठी. कुणीही काहीही प्रश्न न विचारता इथे मुलांना प्रवेश घेण्यासाठी उत्सुक असतात. मुळातच व्यस्त पालकांना आजकाल फालतू चौकशा करायला वेळ नसतो. प्रत्येकापुढे कसल्या ना कसल्या डेड लाईन्स असतात. मोठमोठे टार्गेट्स असतात. त्यासाठी ते अग्निशमन दलासारखे फायर फायटिंग करीत असतात. आता या देशात पूर्वीची कुटुंब व्यवस्था, नातीगोती, त्यातला लळा-जिव्हाळा हे सगळे शोधून बघावे लागते. कामापुरता मामा अशी परिस्थिती आहे. लग्न संस्थेला तडे जात आहेत. छोट्या-मोठ्या कारणाने होणाऱ्या घटस्फोटाचे प्रमाण वाढले आहे. मुले-मुली लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहायला लागली आहेत; तेही पालकांच्या संमतीने!

तरीही आम्हाला आमच्या संस्कृतीचा, सांस्कृतिक वारसा जपण्याचा, मूल्ये जोपासण्याचा सार्थ अभिमान आहे. पर्यावरण, निसर्गाची जपणूक, प्रदूषण यांसारख्या विषयाचे गांभीर्य तर आमच्या ध्यानीमनीही नाही. हे सगळे परीक्षेत पर्यावरण विषय शिकणे, आवश्यक तितके पास होण्यापुरते मार्क मिळविणे इथपर्यंतच मर्यादित आहे. माणसाने निसर्गाचे वस्त्रहरण केल्यामुळे वाढलेले तापमान, प्रदूषण, बदललेले ऋतुमान त्यामुळे वाढलेली रोगराई याची आम्हाला अजूनही गंधवार्ता नाही. त्यावर गांभीर्याने विचार करावा, हे सगळे थांबविण्यासाठी गांभीर्याने पावले उचलावीत, याकडे प्राथमिक गरज म्हणून बघावे असे आम्हाला, आम्ही निवडून दिलेल्या सरकारला कुणालाच वाटत नाही. आम्ही आपापल्या घरात, आपल्या कुटुंबात, आपल्या कामात फार बिझी आहोत. ही काही नैसर्गिक, काही मानव निर्मित भयानक संकटे आपल्या दाराशी येऊन ठाकली आहेत, याचे कुणालाच भान नाही. जो माणूस कोणे एके काळी एकमेकाच्या हातात हात घालून सहकार्याने, विवेक बुद्धीने इथपर्यंत कसाबसा पोहोचला तोच माणूस आज एक दुसऱ्याच्या उरावर बसतो आहे. तिसऱ्या महायुद्धाचा शंखनाद वाजवतो आहे, ही खरी आपली शोकांतिका आहे... आपणच लिहिलेली! ▮

७६५९०८४५५५

## वेध

**रेवती जोशी-अंधारे**

# 'लव्ह इन्शुरन्स'

'जिंदगी के साथ भी, जिंदगी के बाद भी' ही ओळ आयुर्विम्याची आठवण करून देते. गेल्या काही वर्षांत विशेषतः कोरोनानंतर जीवनाची काही शाश्वती नसल्याची जाणीव नव्याने आणि प्रकर्षाने आपल्याला झाली. आयुर्विम्यासोबतच आरोग्य विमा, अपघात विमा, पीक विमा, काही मॉडेल्सच्या सुंदर डोळ्यांचा, लांबसडक बोटांचा विमा असे अनेक प्रकार चलनात आहेत. पण, परस्परांविषयीच्या प्रेमाचा विमा काढण्याचीसुद्धा वेळ आली आहे. चीनमध्ये एका युवतीने १० वर्षांपूर्वी काढलेल्या 'लव्ह इन्शुरन्स'वर आता क्लेम केला आणि हा विषय चर्चेत आला.

या क्लेममध्ये तिला गुलाबाची १० हजार फुले किंवा तेवढी रोख रक्कम देण्याचे निर्धारित आहे. व्यावहारिक दृष्टीने १० हजार गुलाब फुले ठेवण्याचा प्रश्न असल्यामुळे तिने कंपनीला रोख रक्कम मागितली. भारतीय चलनानुसार तिला १ लाख २५ हजार रुपये मिळाले आहेत. या पॉलिसी अंतर्गत प्रियकर आणि प्रेयसीने लग्नापूर्वी आपल्या प्रेमाचा विमा काढायचा असतो. त्या तारखेच्या ३ वर्षांनंतर आणि १० वर्षांच्या आत, ते जोडपे विवाहबद्ध झाल्यास विमा क्लेम करता येईल. या क्लेममध्ये १० हजार गुलाब फुले, हृदयाच्या आकाराची ०.५ कॅरेट हिऱ्याची अंगठी किंवा रोख रक्कम मिळू शकते.

प्रेमाची भेट म्हणून आपल्या जोडीदाराला हा विमा काढून भेटीदाखल देण्याची टूम चीनमध्ये निघाली होती. कधी काळी सुदृढ कुटुंब व्यवस्था असलेल्या पण सध्या पाश्चिमात्यांचा वारा लागलेल्या चिनी युवावर्गाला, प्रामाणिकपणे एकाच नात्यात बांधून ठेवण्यासाठी या विम्याचा उपयोग नक्कीच झाला. अगदीच कमी पैशांत मिळणारा हा विमा नात्याप्रती अमूल्य बांधिलकी नक्कीच देत होता. यात गंमत अशी की, जोडप्याने प्रामाणिकपणे सोबत राहावे आणि विवाह करून नात्याला पूर्णत्व देणे अपेक्षित आहे. चीनमध्ये युवा लोकसंख्येची समस्या लक्षात घेता, अशा मार्गांनी नातं आणि पर्यायाने कुटुंब व्यवस्था टिकवून ठेवण्याचा प्रयत्न आहे. त्या देशात विवाहाचं बंधन नको, प्रजोत्पादनाची काळजी नको, पेट



पॅरेंटींग, डबल इन्कम नो किड्स असे ट्रेन्ड्स बऱ्यापैकी रुजले आहेत. आपल्याही देशातील तरुणाई यात मागे नाहीच. मात्र, लव्ह इन्शुरन्स आणि त्यानंतर आलेला विवाह विमा या दोन्ही पर्यायांचा छान गैरवापर करून चीनच्या युवावर्गाने विमा कंपनीला दिवाळखोर केले. विमा कंपन्यांनी या दोन्ही प्रकारचे विमा बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. पण, ज्यांचा आधीच विमा काढून झाला आहे ती जोडपी मात्र क्लेम करत आहेत.

योगायोग म्हणजे आपल्या देशातही प्रेमी युगुलांचा उत्सव सध्या सुरू आहे. उत्तर प्रदेशातील बांदा येथे मकर संक्रांतीनिमित्त एक अनोखा जोडप्यांचा मेळावा होतो. बांद्याच्या केन नदीत पवित्र स्नान करून, ही जोडपी ६५० वर्षे जुन्या भुरागड किल्ल्यात जातात आणि आपले प्रेम यशस्वी होण्यासाठी प्रार्थना करतात. असं म्हणतात की, तिथल्या राजकन्येचं नाचगाणं करणाऱ्या नटासोबत प्रेम जुळलं. राजाला हे कळताच त्याने एक विचित्र अट त्या युवकापुढे ठेवली. केन नदीच्या दोन्ही टोकांवर दोर बांधण्यात आला. युवकाने त्या दोरावर चालत नदी ओलांडली तर राजकन्येसोबत त्याचा विवाह होणार. प्रेमाच्या भरात तो दोरावर चालत अर्ध्या अंतरावर पोहोचलासुद्धा! राजाने दुष्टपणे सेवकाला सांगून, एका बाजूने दोर कापला. तरुण नदीत पडून बुडला. राजकन्येचं नंतर काय झालं? याचा उल्लेख आढळत नाही. पण, अमर प्रेमाचं प्रतीक म्हणून युवा नट अजरामर झाला. १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यात याच किल्ल्यात शेकडो क्रांतीकारकांना देशप्रेमाच्या आरोपावरून फाशी देण्यात आली.

भुरागडच्या प्राचीन किल्ल्यात, प्रेमीयुगुलांनी जाऊन केलेली प्रार्थनासुद्धा एक प्रकारचा 'विमा'च आहे. प्रेमाचा विमा हे खूपच फिल्मी वाटत असलं तरी, नातं टिकविण्यासाठी असा विमा काढणे ही काळाची गरज झाली आहे. कुटुंब व्यवस्थेचा आदर्श असलेल्या आपल्या समाजातील सर्वच प्रेमळ नात्यांची वीण उसवत चालली आहे. ती घट्ट ठेवण्यासाठी कोर्टात चालणाऱ्या कोरड्या खटल्यांपेक्षा, प्रेमळ संवादाचा आणि आश्वासक स्पर्शाचा 'लव्ह इन्शुरन्स' जास्त महत्त्वाचा आणि अपेक्षित परिणाम देणारा आहे. अगदी कालपरवापर्यंत कोणाचीतरी मान्यता नाही म्हणून एखाद्याच्या प्रेमाला संपविण्याच्या घटना घडल्यात आणि घडत आहेत. प्रेम...राष्ट्रावरचे, समाजमान्यता नसलेले, कला-साहित्यावरचे, वृद्ध माता-पित्यांवरचे, प्राणी-पक्ष्यांवरचे पण, ते संपविणारी अदृश्य शक्ती सदोदीत कार्यरत असते. चीनमध्ये बंद करण्यात आलेला हा 'लव्ह इन्शुरन्स' आपण आपल्यापुरता सुरू करायला काय हरकत आहे? ▮

९८५०३३९२४०


## दखल

**मोरेश्वर बडगे**

# आज दिसणार महायुतीची जादू

हा लेख तुम्ही वाचायला घ्याल तेव्हा महापालिका निवडणूक निकालाचे कल यायला सुरुवात झालेली असेल. तुम्हाला उत्सुकता असेल. कोण येणार? साहजिक आहे. कित्येक वर्षांनंतर राज्यात महापालिकांच्या निवडणुका झाल्या आहेत. काही महापालिकांमध्ये तीन-चार वर्षांनंतर तर मुंबई महापालिकेत आठ वर्षांनंतर निवडणुका झाल्या आहेत. मतदारांची पिढी बदलली आहे. राजकारणही बदललं आहे. या काळात शिवसेना आणि राष्ट्रवादी हे दोन पक्ष फुटले. सारंच बदललं आहे. हा बदललेला मतदार कसा वागेल, हे सांगणं अवघड आहे. त्यामुळे उत्सुकता नक्कीच ताणली गेली असणार. त्यात भर म्हणजे या वेळच्या महापालिका निवडणुका एकदम वेगळ्या होत्या. यंदाचं इलेक्शनच विचित्र होतं. तंगड्यात तंगड्या. कोण कोणासोबत आहे कळत नव्हतं. 'वेगळे लढा. मात्र निकालानंतर तिघांनाही एकत्र यायचं आहे' असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरुवातीलाच सांगून टाकले होते. त्यामुळे महायुतीतही मित्रपक्ष एकमेकांविरुद्ध उभे ठाकलेले दिसले. पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेत अजित पवार आपल्या काकाच्या सोबतीने भाजपाच्या विरोधात लढले. पाच महिन्यांपूर्वी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सुप्रीमो राज ठाकरे उद्धव ठाकरेंसोबत एका मंचावर आले. म्हणूनच यावेळी बंडखोरांची संख्या मोठी दिसते. आज निकाल लागणार असले, तरी जय-पराजयाचे अंतिम चित्र स्पष्ट व्हायला चार दिवस लागतील. मतदान ५० टक्क्याच्या वर झाले तर सत्ताधारी महायुतीला फायदा आहे. पण मी तुम्हाला सांगतो, लिहून ठेवा. एकूण २९ महापालिकांचे निकाल येणार आहेत. त्यातल्या किमान २५ महापालिकांमध्ये महायुती विजयी झालेली दिसेल. नागपुरात भाजपा चौका मारेल. यात आश्चर्याचा धक्का बसण्यासारखे काही नाही. मतदारांनी ते आधीच ठरवलेलं होतं. १४ महिन्यांपूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला प्रचंड यश मिळालं. विधानसभा निवडणुकीत भाजपाला २९ टक्के मतं मिळाली तर शिंदे सेनेला १७ टक्के मतं होती. उद्धव ठाकरे यांच्या उबाठाला फक्त २३ टक्के. महायुती आणि उबाठा यांच्या मतांमधला फरक १६ टक्के आहे. दोन महिन्यांपूर्वी नगर परिषद निवडणुकीत लोकांनी महायुतीला उचलून धरले. तीच स्टोरी आता रिपीट होणार आहे. महापालिका निवडणुका स्थानिक प्रश्नांवर होत असल्या, तरी वर्षभरात मतदारांची मतं फारशी बदलत नाहीत. त्यांनी बदलावे असे काही घडलेही नाही. गेल्या दोन निवडणुकीत महायुतीला उचलून धरणारा मतदार महापालिकेतही तिच्यासोबत दिसेल.

२९ महापालिकांसाठी निवडणुका झाल्या असल्या, तरी चर्चा मुंबईचीच झाली. मुंबईची महापालिका ही सर्वात श्रीमंत महापालिका आहे. तिचे वर्षाचे बजेट ७५ हजार कोटी रुपये आहे. महाराष्ट्रातल्या साऱ्या महापालिकांचे बजेट एकत्र केले तरी ते एवढे होत नाही. चेन्नई महापालिकेचे बजेट अवघे ९ हजार कोटी रुपये आहे. एका अर्थाने मुंबई महापालिका ही सोन्याची कोंबडी आहे. त्यामुळे साऱ्यांच्या नजरा मुंबईवर होत्या. राज्याच्या सत्तेत सहभागी



असलेले अजित पवार पुण्यात वेगळे लढल्याने तिकडची थोडी चर्चा झाली. मात्र सारा फोकस मुंबईने नेला. उद्धव ठाकरे यांच्यासाठी तर ही निवडणूक म्हणजे अस्तित्वाची लढाई होती. ठाकरे बंधूंनी नेहमीप्रमाणे मराठी माणूस आणि मराठीच्या अस्मितेचा मुद्दा पुढे केला. मराठीच्या नावाने मुंबईकरांना भावनात्मक साद घातली. त्या शिवाय ठाकरेंना दुसरा पर्याय नव्हता. मतदारांना दाखवण्यासारखे कुठलेही काम केलेले नाही. त्यामुळे प्रत्येक निवडणुकीत ऐकायला मिळते तेच रडगाणे यावेळीही ऐकायला मिळाले. पिढीजात सत्ता जाण्याच्या भीतीने ठाकरे बंधू एकत्र आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मात्र विकासाच्या अजेंड्यावर मतं मागितली. ठाकरे विकासाची भाषा करूच शकत नाहीत. त्यांच्याकडे दृष्टीच नाही. बाळासाहेब ठाकरे हयात होते तोपर्यंत 'ठाकरे ब्रँड' जोरात होता. मुख्यमंत्री होण्याच्या हव्यासापायी उद्धव ठाकरे शरद पवारांच्या मांडीवर जाऊन बसले. तेव्हाच त्यांचे 'बुरे दिन' सुरू झाले. अडीच वर्षात मुख्यमंत्रिपद गेले. मात्र विधानसभा निवडणुकीत ते उघडे पडले. आता तर काँग्रेसनेही त्यांची साथ सोडली. शरद पवार काय ताकद देणार? त्यांनीच पुण्यात पुतण्याच्या कुबड्या घेतल्या. आपण एकटे पडलो याची कल्पना उद्धव यांना आली तेव्हा तब्बल २० वर्षांनंतर भाऊ आठवला. राज ठाकरे यांच्याही नशिबी राजकीय वनवास आहे. एकही खासदार नाही, आमदारच काय नगरसेवकही नाही. दोघेही भाऊ समदुःखी. एकत्र येण्यासाठी दोघांनी मराठीचे निमित्त शोधले. मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा डाव रचला जात आहे हा नेहमीचा आरडाओरडा सुरू केला. ठाकरे कुटुंबाला कधीही स्वबळावर मुंबई महापालिका मिळविता आली नाही. खिचडी सरकारच आतापर्यंत चालले. शेवटच्या म्हणजे २०१७ च्या निवडणुकीत शिवसेनेला भाजपापेक्षा फक्त दोन जागा जास्त मिळाल्या होत्या. ती तर फडणवीस यांची मेहरबानी. त्या वेळेला फडणवीस मुख्यमंत्री होते. त्यांनी मनात आणले असते तर तेव्हाच मुंबई महापालिका भाजपाला ताब्यात घेता आली असती. फडणवीस यांच्या उदारपणाचा चुकीचा अर्थ ठाकरेंनी घेतला. ताळतंत्र सोडले. फडणवीसांना काय काय बोलले. कधी 'फडतूस' म्हणाले तर कधी 'टरबूज' म्हणाले. विधानसभा निवडणुकीत तर 'तू राहशील किंवा मी' अशा शब्दात त्यांनी फडणवीसांना आव्हान दिले. आज कोण संपले आणि कोण राहिले ते महाराष्ट्र पाहतो आहे. यावेळी त्यांनी चक्क फडणवीस यांचे आई-वडील काढले. मतदारांना हे अजिबात आवडलेले नाही. राज ठाकरेंना सोबत घेणे उद्धव ठाकरेंना महागात पडले. शेवटच्या दिवसांमध्ये राज ठाकरे यांनी केलेली वादग्रस्त वक्तव्ये अंगलट आली. परप्रांतीयांबद्दल राज ठाकरे यांचे 'प्रेम' जगजाहीर आहे. ते त्यांनी यावेळीसुद्धा दाखवले. हे सरकार हिंदी लादण्याच्या विचारात नाही. पण 'हिंदी लादाल तर लाथ मारू' असे राज म्हणाले. भाजपाच्या प्रचारासाठी तामिळनाडूचे भाजपाचे नेते के. अण्णामलाई आले होते. 'मुंबई हे महाराष्ट्राचे नव्हे तर आंतरराष्ट्रीय शहर आहे' असे ते बोलले. राज ठाकरेंनी त्याचा इश्यू केला. अण्णामलाई यांना 'रसमलाई' म्हटले. मुंबईमध्ये सहा टक्के तामिळ मतदार आहेत. या साऱ्यांना दुखावून राज ठाकरेंनी काय साधले असेल? उद्योगपती गौतम अदानींना हे सरकार पायघड्या घालत आहे, असे सांगत राज ठाकरे यांनी सडकून टीका केली. पण अदानींना काँग्रेसनेच वाढवले हे ते विसरतात. २००१ साली गुजरातमधील मुंद्रा बंदराच्या परवानग्या काँग्रेस सरकारनेच दिल्या आहेत. पुढे अदानी स्वकर्तृत्वाने वाढले. भावाला सोबत घेतल्याने मराठी मतं टिकतील, असा उद्धव यांचा अंदाज होता. मात्र, राज यांच्या सापळ्यात अडकून उद्धव यांनी स्वतःचे नुकसान करून घेतले. विधानसभा निवडणुकीत दलित आणि मुस्लिम मतांनी ठाकरेंना साथ दिली होती. पण ते वातावरण उद्धव टिकवू शकले नाही. मुंबईतली मराठी मतं एकनाथ शिंदे यांची शिवसेना खाणार आहे. ठाकरेंना मतं देणार कोण? मतदार शहाणा झाला आहे. या साऱ्या रणधुमाळीत देवेंद्र फडणवीस यांना मानले पाहिजे. त्यांनी साऱ्या गटातटांना सांभाळले. संयम पाळला. तोल ढळू दिला नाही. विकासाच्या अजेंड्यावर मतं मागितली. अनावश्यक आश्वासनांचा मोह टाळला. मोदी-शाह यांच्या सभेशिवाय फडणवीसांनी मुंबईचा मंगलकलश आणण्याची हिंमत केली. फडणवीस यांचे राजकीय वजन वाढलं आहे. ▮

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## खरा वसंत

निसर्गाने निर्माण केलेले ऋतुचक्र हे केवळ हवामानातील बदलांचे चक्र नसून, मानवी जीवनाला गहन आध्यात्मिक संदेश देणारी एक दिव्य व्यवस्था आहे. प्रत्येक ऋतू मनुष्याच्या अंत:करणातील एखाद्या अवस्थेचे प्रतीक आहे. त्यामध्ये वसंत ऋतू हा आत्मिक उन्नती, चैतन्य आणि नवचैतन्याचा ऋतू मानला जातो. म्हणूनच वसंत ऋतूला 'ऋतूंचा राजा' असे संबोधले जाते.

वसंत ऋतू म्हणजे पानगळ आणि बहर यांचा संगम. आध्यात्मिक दृष्टिकोनातून पाहिले तर पानगळ म्हणजे जुने संस्कार, दोष, अहंकार आणि नकारात्मक वृत्ती यांचे गळून पडणे; तर बहर म्हणजे शुद्ध भाव, सात्त्विक विचार आणि ईश्वरप्राप्तीची ओढ यांचे उमलणे. कडाक्याच्या थंडीप्रमाणेच मानवी जीवनातही कधी कधी जडत्व, निरुत्साह आणि अज्ञानाची अवस्था येते. त्या अवस्थेतून बाहेर काढणारी सूर्याची कोवळी ऊब म्हणजे ईश्वरकृपा. ही कृपा प्राप्त होताच अंतर्मनात नवचैतन्य निर्माण होते. वसंत ऋतूत झाडांना नवी पालवी फुटते, आंब्याला मोहर येतो, फुलांवर भोवऱ्यांचे गुंजन सुरू होते. ही सर्व दृश्ये बाह्य असली, तरी त्यांचा सूक्ष्म अर्थ



अंतर्मनाशी जोडलेला आहे. पालवी म्हणजे साधकाच्या मनात उगवणारे सद्विचार, मोहर म्हणजे भक्तिभावाची सुरुवात, तर भोवऱ्यांचे गुंजन म्हणजे नामस्मरणातून निर्माण होणारी चैतन्यलहरी. कोकिळेचा मधुर स्वर हा आत्म्यातून उमटणाऱ्या आनंदाचा प्रतिध्वनी आहे.

वसंत ऋतूत येणारी वसंत पंचमी म्हणजे ज्ञानज्योतीचा आध्यात्मिक उत्सव वसंत ऋतूची सुरुवात वसंत पंचमी या पवित्र दिवशी होते. हा दिवस केवळ एक सण नसून, आत्मज्ञानाच्या जागृतीचा दिवस आहे. या दिवशी सरस्वती देवीची उपासना केली जाते. सरस्वती म्हणजे शुद्ध ज्ञान, विवेकबुद्धी आणि चैतन्यस्वरूप शक्ती. साधकासाठी खरे ज्ञान म्हणजे केवळ पुस्तकी विद्या नव्हे, तर आत्मा आणि परमात्म्याची ओळख होणे.

वसंत पंचमीला पिवळ्या रंगाला विशेष महत्त्व आहे. आध्यात्मिक दृष्टिकोनातून पिवळा रंग म्हणजे सत्त्वगुण, प्रसन्नता आणि ज्ञानप्रकाश. जसा पिवळा रंग अंधार नाहीसा करतो, तसाच ज्ञानप्रकाश अज्ञान, अहंकार आणि भ्रम दूर करतो. म्हणूनच या दिवशी साधकांनी ज्ञानप्राप्तीसाठी, सद्बुद्धीसाठी आणि अंतःकरणशुद्धीसाठी प्रार्थना करणे अपेक्षित आहे. भगवान श्रीकृष्णांनी "ऋतूंमध्ये मी वसंत आहे" असे सांगून वसंत ऋतूचे आध्यात्मिक महत्त्व अधोरेखित केले आहे. वसंत ऋतू आपल्याला सांगतो जीवनातील जडत्व, निराशा आणि अज्ञान दूर करून भक्ती, ज्ञान आणि वैराग्य यांचा स्वीकार करा. जसा निसर्ग दरवर्षी नव्याने बहरतो, तसाच साधकानेही दररोज स्वतःला अंतर्मुख करून आत्मिक उन्नतीचा संकल्प करावा. साक्षीभाव ठेवून जीवनातील प्रत्येक प्रसंग पाहिला, तर अंतर्मनात कायमचा वसंत नांदू लागतो. जिथे अंतःकरण शुद्ध आहे, जिथे ईश्वरस्मरण आहे, तिथेच खरा वसंत आहे.

**रमा देशमुख**/नागपूर

## वाचक पत्रे

### बांगलादेशातील घडामोडी हा भारतासाठी सापळा

सध्याच्या बांगलादेशातील घडामोडी केवळ शेजारी देशातील अंतर्गत प्रश्न नसून भारताला एका गंभीर रणनीतिक सापळ्यात अडकवण्याचा हा सुनियोजित डाव आहे. भारताला एकाच वेळी पाकिस्तान आणि बांगलादेश या दोन्ही आघाड्यांवर युद्धात ओढण्याची योजना आखण्यात आली आहे. भारताने युद्धाला सुरुवात केली, तर त्याच्यावर 'युद्धखोर' व 'हुकूमशाही' ठपका ठेवून आर्थिक निर्बंध लादता येतील आणि पाकिस्तान व बांगलादेश यांना प्रचंड आर्थिक व सैन्य साहाय्य देऊन युद्ध दीर्घकाळ चालवता येईल. परिणामी भारताची अर्थव्यवस्था अनेक दशके मागे फेकण्याचा हा डाव आहे. रशिया-युक्रेन युद्धात वापरलेलेच हे 'टेम्पलेट' भारताविरुद्ध राबवले जात आहे.

बांगलादेशात घडणाऱ्या प्रत्येक हिंसक घटनेनंतर भारतविरोधी भावना अधिक भडकवल्या जातील. हिंदूंवरील अत्याचार वाढवून भारताने सैन्य कारवाई करावी, यासाठी सरकारवर दबाव आणला जाईल. त्याच वेळी पाकिस्तानी दहशतवाद्यांकडून एखादी मोठी घटना घडवण्याचाही प्रयत्न होऊ शकतो. या सर्वांचा उद्देश भारताने भावनेच्या भरात युद्धाला सुरुवात करावी, हाच आहे. देशाने भावनेच्या भरात वहावत जाऊन अवाजवी दडपण न निर्माण करता नेतृत्वाच्या मागे ठामपणे उभे राहायला हवे; कारण हा सगळा प्रकार 'मोदी की शिकार के लिये हिंदुओं पर अत्याचार' (मोदींच्या शिकारीसाठी हिंदूंवर अत्याचार), असा आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी जावळीतून बाहेर पडावे, यासाठी अफझलखानाने श्री तुळजाभवानीची मूर्ती फोडली, तरी महाराजांनी संयम पाळला होता, हे विसरता कामा नये. ज्यांचा जन्मच हिंदुद्वेषाचे राजकारण करण्यात गेला, त्यांनाही हिंदूंच्या प्रेमाचे उमाळे येऊ लागतील. यामागचे विषारी कारस्थान ओळखायला हवे. ▮

**संजय चौधरी**/अमरावती

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

महत्वाचे...

# युनियन बँक ऑफ इंडियाची तिसऱ्या तिमाहीत उल्लेखनीय कामगिरी

## ५०१७ कोटींचा निव्वळ नफा

**मुंबई, दि. १५ जानेवारी-**
सार्वजनिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या युनियन बँक ऑफ इंडियाने आर्थिक वर्ष २०२५ - २६ च्या तिसऱ्या तिमाहीत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. अत्याधुनिक ग्राहक सेवा देत ग्राहकांचा विश्वास संपादन केल्या मुळे बँकेला ५०१७ कोटी रुपयांचा निव्वळ नफा मिळाला असल्याची माहिती बँक प्रशासनाने दिली.



बँकेचा एकूण व्यवसाय २२.३९ लाख कोटींच्या पुढे गेला आहे. सातत्यपूर्ण वाढ आणि मालमत्ता गुणवत्तेतील सुधारणा यामुळे ही प्रगती साध्य झाल्याचे बँकेने स्पष्ट केले. ३१ डिसेंबर २०२५ रोजी सम ाप्त झालेल्या तिमाहीत बँकेचा नफा मागील तिमाहीच्या तुलनेत १८.०७ टक्क्यांनी वाढलेला आहे. या कालावधीत बँकेचा ऑपरेटिंग नफा ६,९४२ कोटी इतका राहिला, तर निव्वळ व्याज उत्पन्न ५.८५ टक्क्यांनी वाढून ९,३२८ कोटींवर पोहोचले.

कार्यक्षमता निर्देशांकातही सुधारणा दिसून आली असून, निव्वळ व्याज मार्जिन २.७६ टक्के, मालमत्तेवरील परतावा १.३५ टक्के आणि भागधारक भांडवलावरील परतावा १७.०९ टक्के इतका नोंदवण्यात आला आहे. देशांतर्गत गुणोत्तर ३३.९६ टक्क्यांवर स्थिर राहिले असून, कमी खर्चाच्या ठेवींवर बँकेचा भर कायम असल्याचे यावरून स्पष्ट होते.

किरकोळ, कृषी व सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्रांवर बँकेचा धोरणात्मक भर कायम असून देशांतर्गत एकूण कर्जपुरवठ्यात या क्षेत्रांचा वाटा ५८.८४ टक्के इतका आहे. किरकोळ कर्जपुरवठ्यात वर्षभरात २१.६७ टक्क्यांची वाढ झाली असून गृहकर्ज व वाहन कर्ज यामुळे ही वाढ साध्य झाली आहे. तसेच क्षेत्रातील कर्जपुरवठा १९.७५ टक्क्यांनी वाढला आहे. मालमत्ता गुणवत्तेच्या बाबतीत बँकेने दहा वर्षांतील सर्वोत्तम कामगिरी नोंदवली आहे. एकूण अनुत्पादित कर्जे ३.०६ टक्क्यांवर आली असून, नेट केवळ ०.५१ टक्के इतकी राहिली आहे. प्रोव्हिजन कव्हरेज रेशो ९५.१३ टक्क्यांपर्यंत वाढला असून बँकेच्या जोखीम व्यवस्थापनाची ही सकारात्मक बाब मानली जात आहे.

भांडवली स्थितीही भक्कम असून, १६.४९ टक्के तर -१ गुणोत्तर १३.९४ टक्के आहे, जे नियामक निकषांपेक्षा अधिक आहे. त्यामुळे भविष्यातील वाढीसाठी युनियन बँक ऑफ इंडिया सक्षम स्थितीत असल्याचे बँकेने नमूद केले आहे.

# तामलवाडी येथील सर्व्हिस रस्ता व दोन्ही बाजूच्या गटारी अर्धवट अवस्थेतच

- राष्ट्रीय राजमार्गाच्या संबंधित अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष
- थेट केंद्रीय मंत्री गडकरी यांच्याकडे ग्रामस्थांची तक्रार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ जानेवारी-**
तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील राष्ट्रीय राजमार्गाच्या बाजूचा सर्व्हिस रस्ता आणि त्या रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या गटारी अर्धवट अवस्थेत असल्याने वारंवार पत्रव्यवहार करुनही संबंधित अधिकारी याकडे दुर्लक्ष करत आहेत; यामुळे स्थानिक ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी या रस्ता दुरूस्तीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे लेखी तक्रारी केल्या आहेत.

सोलापूर ते धुळे राष्ट्रीय राजमार्ग क्रं. ५२ हा तामलवाडी गावच्या मध्यभागातुन गेला असून, गावचे दोन भागात विभाजन झाले आहे. गावातील नागरिकांना ये-जा करण्यासाठी भुयारी मार्गाची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच महामार्गाच्या दोन्ही बाजूला अरूंद सर्व्हिस रस्ता तयार करुन भुयारी गटारीचीही व्यवस्था करण्यात आली आहे. परंतु हेच रस्ते व गटारी सोलापूर कडील बाजुस दक्षिण दिशेला दुतर्फा जवळपास १ कि.मी. अंतरापर्यंत बनवले आहेत. तेच सर्व्हिस रस्ते व गटारी तुळजापूर कडील बाजुस उत्तर दिशेला दुतर्फा अर्धवट अवस्थेत बनवले आहेत. गेली सात ते आठ वर्षांपासून हीच परिस्थिती जैसे थे आहे. लहान भुयारी मार्गापासुन पुढे फक्त जेसीबीच्या सहाय्याने चारी खोदली आहे. यामुळे घाणीचे साम्राज्य तर पसरतच आहे परंतु दोन वाहने आल्यास वाहने जात नाहीत.

पावसाळ्यात ओढ्याला पूर येतो, त्यावेळी शेतकरी, विद्यार्थी, कामगार व पशुधनाला घेऊन नागरिकांना राष्ट्रीय राजमार्गावरुन विरुद्ध दिशेने प्रवास करताना अपघाताचा मोठा धोका निम ाण होण्याची शक्यता असून, यामुळे स्थानिक नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो. त्याचप्रमाणे राष्ट्रीय राजमार्गाच्या पुर्वे कडील सर्व्हिस रस्ता असाच अर्धवट अवस्थेत भुयारी मार्गापर्यंतच असल्यामुळे नागरिकांना गावामध्ये ये जा करतांना महामार्गावरुनच विरूध्द दिशेने प्रवास करावा लागतोय. याकडेही राष्ट्रीय राजमार्गाच्या संबंधित अधिकाऱ्याचे गेली सात ते आठ वर्षांपासून दुर्लक्ष होत असल्याचे बोलले जात आहे. लवकरात लवकर अर्धवट गटारी व अर्धवट सर्विस रस्ते तयार करुन ग्रामस्थांना दिलासा द्यावा, अशी मागणी तामलवाडीसह परिसरातील नागरिकांमधून होत आहे.

### उपमुख्यमंत्री अजितदादांनाही दिले होते निवेदन

सप्टेंबर २०२५ मध्ये अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पहाणी करण्याकरीता राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे मराठवाड्याच्या दौ-यावर आले असता तामलवाडी ग्राम पंचायत व ग्रामस्थांच्या वतीने टोलनाक्यावर या सर्व्हिस रस्त्याबाबत लेखी निवेदन दिले होते. यावेळी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी सर्व ग्रामस्थांसमोर संबंधित अधिकारी यांना तशा सूचना दिल्या होत्या. अजितदादा पवार यांच्या सुचनेचा संबंधित अधिकारी यांना विसर तर पडला नाही ना? असा सवाल नागरीकांमधुन उपस्थित केला जातोय. तसेच आक्टोबर २०२५ मध्ये यासाठी सामाजिक कार्यकर्ते सर्जेराव गायकवाड यांनीही उपोषण आंदोलनाचा इशाराही दिला होता. याकडेही संबंधित अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले आहे..



# छत्रपती ब्रिगेडच्या महिलांनी लुटले पुस्तकाचे वाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ जानेवारी-**
मकर संक्रांतीनिमित्त छत्रपती ब्रिगेडच्या महिला आघाडीच्या वतीने महिलांसाठी कर्तबगार जिजाऊ, सावित्री, अहिल्यादेवी, रमाई यांच्या जीवन चरित्रावरील पुस्तक आणि उपयुक्त वस्तूंचे (रुपी वाण) लुटण्याचे व हळदी कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या उपक्रमाद्वारे महिलांना वाण म्हणून पुस्तके देऊन ज्ञानाचा प्रसार आणि उपयुक्त वस्तू देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. मकर संक्रांतीनिमित्त हळदी-कुंकू कार्यक्रमात केवळ पारंपरिक वस्तू न देता, पुस्तके वाटून ज्ञानाचे वाण लुटले. मकर संक्रांतीला 'वाण लुटणे' ही प्रथा आहे, ज्यामध्ये महिला एकमेकींना उपयुक्त वस्तू भेट देतात. यावर्षी छत्रपती ब्रिगेडने महिलांना वाचण्याची आवड लागावी व ज्ञान मिळावे म्हणून पुस्तके वाटली. यावेळी केवळ पुस्तकेच नाही, तर दैनंदिन जीवनात उपयोगी पडणाऱ्या वस्तू (रुपी वान) देखील वाटण्यात आल्या.

या सणात तीळ, गूळ, सुगडी, आणि दैनंदिन उपयुक्त वस्तू (उदा. स्वयंपाकघरातील वस्तू, वाण) भेट देण्याची परंपरा आहे; हा उपक्रम महिला सक्षमीकरण आणि ज्ञानाचा संदेश देणारा ठरला आहे. यावेळी छत्रपती ब्रिगेडच्या जिल्हा अध्यक्ष मोनाली धुमाळ, जिल्हा कार्याध्यक्ष मनीषा कोळी, शहर कार्याध्यक्ष सोनाली सगर, राजनंदिनी धुमाळ, उज्ज्वला यन्नले, अंबिका पवार यांच्यासह इतर महिलांची उपस्थिती होती.

# व्हॉईस ऑफ मीडियाच्या तालुका शाखेतर्फे पत्रकारांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.१५ जानेवारी-**
व्हॉईस ऑफ मीडिया, बार्शी तालुका शाखेच्यावतीने पत्रकार दिनानिमित्त सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीप ढेरे, ग्रामीण वैद्यकीय अधीक्षक डॉ. शीतल बोपळकर, डॉ. राहुल मांजरे, पीएसआय राजेंद्र भापकर, पीएसआय गुळमे व प्रशांत कथले यांच्या हस्ते ज्येष्ठ पत्रकारांचा सत्कार करण्यात आला.




अध्यक्षस्थानी राष्ट्रवादीचे जिल्हा सचिव नागेश चव्हाण होते. सत्कारार्थी पत्रकार : गणेश गोडसे, चंद्रकांत करडे, किरण आवारे, संजय बारबोले, विनोद ननवरे. तालुकाध्यक्ष अस्लम काझी, सचिव सुशेन डमरे, उपाध्यक्ष राहुल गुरव, कार्याध्यक्ष निलेश उबाळे, प्रसिद्धी प्रमुख अमीन गोरे व खजिनदार संतोष राजगुरू यांनी आयोजन केले होते.

संघटनेचे सदस्य सागर गरड, संजय बोकेफोडे, काशीनाथ क्षिरसागर, असिफ मुलाणी, गणेश आडसुळ, अजिम शेख, नितीन गाढवे, मुज्जमिल कौठाळकर, सुरज चंदनशिवे यांच्यासह अनेक पत्रकार उपस्थित होते. सूत्रसंचालन निलेश उबाळे यांनी तर आभार काशीनाथ क्षिरसागर यांनी मानले.



# ऐतिहासिक वेशभूषा सादरीकरण स्पर्धेत राजनंदिनी मुगळे प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ जानेवारी-**
वालचंद महाविद्यालयात झालेल्या ऐतिहासिक वेशभूषा सादरीकरण स्पर्धेत या स्पर्धेमध्ये राजनंदिनी मुगळे (येसूबाई) हिने पप्रथम क्रमांक पटकाविला. हर्षदा काळे (येसूबाई) व अक्षया कोंका (अहिल्याबाई होळकर) यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय स्थान मिळविले. श्रद्धा गायकवाड (माता यशोधरा) व श्रुतिका देशपांडे ( टेसी थॉमस) यांनी अनुक्रमे उत्तेजनार्थ प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविले.पटकावले.

राजमाता जिजाऊ जयंती, हुतात्मा दिन, आणि राष्ट्रीय युवा दिनानिमित्त वालचंद महाविद्यालयात वुमेन स्टडीज सेंटर आणि अंतर्गत तक्रार निवारण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने याचे आयोजन केले होते.

मुख्य अतिथी म्हणून छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्सचे डॉ. युवराज सुरवसे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संतोष कोटी होते. वुमेन स्टडीज सेंटरच्या समन्वयक डॉ. रेखा ओव्हाळ यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. अंजना गायकवाड यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. ऐतिहासिक वेशभूषा स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना इतिहास विभाग प्रमुख डॉ. चंद्रकांत चव्हाण यांनी मार्गदर्शन केले.

या स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. नागनाथ धायगुडे, डॉ. वंदना गवळी, डॉ. महावीर साबळे, डॉ दिपाली पाटील यांनी काम पाहिले. या कार्यक्रमास प्रा. हनुमंत मते, डॉ. अमोल शिंदे, डॉ. रामचंद्र गोरे, डॉ. सचिन नवले ,डॉ.अर्चना एंजल, डॉ. मनीषा चौरे, डॉ. स्मिता ढावरे, डॉ. रचना कपूर आणि बहुसंख्य विद्यार्थ्यांची उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पद्मावती पाटील यांनी केले. डॉ. मेघा जगदाळे यांनी आभार मानले.

# विवाहितेसोबत जबरदस्तीने लग्न केल्याप्रकरणातील आरोपीस जामीन मंजूर

**सोलापूर, दि. १५ जानेवारी-**
शहरात राहणाऱ्या दोन मुले असणाऱ्या एका सुशिक्षित महिलेला सोलापुरात प्लॉट घेऊन देण्याचे आमिष दाखवून त्यांचे कडून सुमारे १५ तोळे सोने आणि १ लाख २० हजार रुपय रोख रक्कम घेऊन तिची फसवणूक केली. तसेच त्या महिलेस आळंदी येथे एका लॉजवर नेऊन तिला खोटे बोलून व जीवे ठार मारण्याची धमकी देऊन जबरदस्तीने तिच्याबरोबर विवाह केल्याच्या गुन्ह्यातील अटकेतील आरोपी राज उर्फ शैलेंद्र महेंद्र गोसावी (वय -३६ वर्षे, रा. अवंतीनगर, सोलापूर) याची जामीनावर मुक्तता करण्याचा आदेश प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी श्री.एस.बी.नवले यांनी दिला.

याची हकीगत अशी की, आरोपी राज गोसावी याची त्या सुशिक्षित महिलेबरोबर जानेवारी २०२५ला ओळख झाली होती. त्या महिलेस सोलापूर शहरात प्लॉट घेऊन देण्याचे आमिष दाखवून राज याने तिच्याकडून मार्च २०२५ ते ऑक्टोबर २०२५ पर्यंत सुमारे १५ तोळे सोने आणि रोख रक्कम १ लाख २० हजार मिळवले. त्यानंतर त्याने त्या महिलेस आळंदी येथील एका लॉजवर नेऊन तिचेशी खोटे बोलून व जीवे ठार

मारण्याची धमकी देऊन ११ नोव्हेंबर २०२५ रोजी जबरदस्तीने लग्न केले व त्यानंतरही १९ नोव्हेंबर रोजी राज याच्या पत्नी आणि आईने त्या महिलेस काठीने व हाताने चक्कर येईपर्यंत मारहाण केली. त्यानंतर २० नोव्हेंबर रोजी त्या महिलेस सिद्धेश्वर मंदिर परिसरात बोलवून आरोपी राज व त्याच्या नातेवाईकांनी तिला शिवीगाळ, मारहाण करून विनयभंग केला आणि सिद्धेश्वर तलावात उडी मारण्यास प्रवृत्त केले वगैरे आशयाची फिर्याद त्या महिलेने फौजदार चावडी पोलीस ठाण्यात दिली. या गुन्ह्याचा तपास करणाऱ्या महिला पोलीस उपनिरीक्षक आर.एन.जेऊघाले यांनी आरोपी राज गोसावी यास ७ जानेवारी २०२५ रोजी अटक केली होती.

आरोपी राज गोसावी याच्या जामीन अर्जा प्रकरणी फिर्यादी महिलेने तिचे प्रतिज्ञापत्र देऊन आरोपीस जामीनावर सोडण्यास सक्त विरोध केला होता. तथापि फिर्यादी महिला आणि आरोपीच्या प्रेम संबंधात आरोपीने तिला झिडकारल्यामुळे चिडून बनावट कथा रचून महिलेने खोटी फिर्याद दिली असल्यामुळे गुन्ह्यात तथ्य नसल्याचा युक्तिवाद आरोपीचे वकील आल्हाद अंदोरे यांनी करून आरोपीस जामीन मंजूर करण्याची मागणी केली. तो युक्तिवाद ग्राह्य मानून न्यायाधीशांनी आरोपीचा जामीन मंजूर केला.

या गाजत असलेल्या गुन्ह्याचे कामी आरोपीतर्फे ॲड.आल्हाद अंदोरे, ॲड.अथर्व अंदोरे तर सरकार पक्षातर्फे ॲड.शिल्पा बनसोडे हे काम पाहत आहेत.

# सत्य, न्याय, सेवा, समता आणि बंधुतेचा संदेश देणारी सिद्धेश्वर यात्रा

## ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर महाराज यांच्या प्रतिमेचे सोलापूर बार असोसिएशनतर्फे पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ जानेवारी-**
ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर महाराज यांच्या सामाजिक, आध्यात्मिक व सांस्कृतिक योगदानाचा उल्लेख केला. त्यांनी आपल्या भाषणात सत्य, न्याय, सेवा, समता आणि बंधुतेचा संदेश देणाऱ्या या परंपरेचे महत्त्व बापूसाहेब देशमुख, योगिनाथ बिराजदार तसेच प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मनोज शर्मा यांनी सांगितले.

शहराचे आराध्य दैवत, भक्तांच्या श्रद्धेचे व आस्थेचे केंद्रस्थान असलेल्या ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर महाराज यांच्या पावन प्रतिमेचे पूजन सोलापूर बार असोसिएशनतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही अत्यंत भक्तिभावाने, श्रद्धेने आणि परंपरेनुसार १४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता सोलापूर बार असोसिएशन हॉल येथे संपन्न झाले.



या धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमामुळे संपूर्ण बार परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता. धार्मिक परंपरा जपणारा आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देणारा हा उपक्रम सोलापूर बार असोसिएशनच्या सामाजिक, सांस्कृतिक व आध्यात्मिक जडणघडणीचा अविभाज्य भाग असल्याचे यावेळी स्पष्टपणे दिसून आले. या पवित्र पूजन समारंभास सोलापूर जिल्ह्याचे माननीय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश म नोज शर्मा यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांच्या उपस्थितीमुळे या कार्यक्रमाला विशेष प्रतिष्ठा प्राप्त झाली. तसेच सोलापूर बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष व सध्या ठाणे येथे कुटुंबिक न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून कार्यरत असलेले अमित आळंगे साहेब हे देखील या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित होते.

या वेळी सोलापूर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. बाबासाहेब जाधव, उपाध्यक्ष ॲड. रियाज शेख, सचिव ॲड. बसवराज हिंगमिरे, सहसचिवा: ॲड. मीरा प्रसाद, खजिनदार ॲड. अरविंद देडे यांच्यासह बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा चे विद्यमान सदस्य मिलिंद थोबडे यांचीही विशेष उपस्थिती होती. तसेच बारचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ सदस्य ॲड.विश्वनाथ आळंगे, ॲड.एस. आर. पाटील, ॲड.एन. आर. खंडाळ, ॲड.एस. व्ही. उजळंबे, ॲड.बसवराज सलगर आदी ज्येष्ठ व युवा वकील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**CHANGE IN NAME**

I hereby declare that my old name **Pushpank Madukar Doddi** has been changed to new name **Pushpank Mahadev Doddi** Add. Flat No. 203, 1st floor Pawan apartment, walchand college road yuva sport New Pacha Peth, Ekta nagar, Solapur

**asrec (India) Limited** | Bldg. No. 2, Unit No. 201-202A & 200-202B, Gr. Floor, Solitaire Corporate Park, Andheri Ghatkopar Link Road, Chakala, Andheri (East), Mumbai-400 093.

**परिशिष्ट-खत-**
**लिलावासाठी सार्वजनिक सूचना - अचल मालमत्तेची विक्री**

**(सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ९ सह वाचलेले नियम ८(६) अंतर्गत)**

ज्याअर्थी, SREC (इंडिया) लिमिटेड ही एक सिक्युरिटायझेशन आणि ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी आहे (यापुढे SREC म्हणून संदर्भित) आणि २२.१०.२०२२ रोजी फोक्सवॅगन फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड सोबत केलेल्या असाइनमेंट कराराच्या आधारे कर्जदार खात्याची सुरक्षित कर्जदार आहे. SREC-PS ०३/२०२२-२३ ट्रस्टचे विश्वस्त म्हणून काम करत आहे आणि मेसर्स इड व्हील्स प्रायव्हेट लिमिटेडचे सुरक्षित कर्ज विकत घेतले आहे. लिमिटेड, १. दिवंगत श्री. अय्युब बाबुमियाँ शेख (संचालक आणि हमीदार) यांचे संचालक आणि हमीदार त्यांचे कायदेशीर वारस श्री. अर्शद अय्युब शेख, श्री. तोहिद अय्युब शेख, २. श्री. अर्शद अय्युब शेख, ३. श्री. तोहिद अय्युब शेख, मूळ कर्जदात्या, फोक्सवॅगन फायनान्स प्रायव्हेट लिमिटेडच्या अंतर्निहित सिक्युरिटीजसह.

SREC (इंडिया) लिमिटेडच्या अधिकृत अधिकाऱ्याने, वित्तीय मालमत्तांचे सुरक्षाकरण आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ (SRFESI) आणि सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून, ३१.०८.२०२३ रोजी कर्जदार/संचालक/गहाणखत/जामीनदारांना १,८५,५२,९९४.०९ रुपये (रुपये एक कोटी पंच्याऐंशी लाख बावन्न हजार नऊशे चौरस रुपये आणि फक्त नऊ पैसे) रक्कम परत करण्याचे आवाहन केले होते. सदर कायद्याच्या कलम १३(२) अंतर्गत कर्जदार आणि संयुक्त/सह-कर्जदारांना देण्यात आलेल्या मागणी सूचनांमध्ये नमूद केल्याप्रमाणे, वोक्सवॅगन फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड/SREC (इंडिया) लिमिटेडने दिलेल्या आगाऊ रकमेवर ६० दिवसांच्या निर्धारित कालावधीत, अतिरिक्त व्याजासह परतफेड करावी.

**एकूण थकबाकीची माहिती खालीलप्रमाणे:**

| खात्यांचे नाव | रक्कम |
|---|---|
| १. मेसर्स एबीएस व्हील्स प्रायव्हेट लिमिटेड, संचालक आणि जामीनदार<br>२. दिवंगत श्री. अय्युब बाबुमियान शेख त्यांच्या कायदेशीर वारसांद्वारे<br>श्री. अर्शद अय्युब शेख<br>श्री. तोहिद अय्युब शेख<br>३. श्री. अर्शद अय्युब शेख<br>४. श्री. तोहिद अय्युब शेख | सुविधेचा प्रकार नवीन कार युनिट फंडिंग डीलर कोड: तथडजड्डइड<br>ग्राहक आयडी: ९००१००१५७०<br>१४.०९.२०२२ रोजी रु. १,८५,५२,९९४.०९ वार्षिक १३.००% दराने अतिरिक्त व्याज + त्यावर २% वार्षिक दंडात्मक व्याज १५.०९.२०२२ पासून लागू. |
| **एकूण थकबाकी रक्कम** | **रु. १,८५,५२,९९४.०९ वर नमूद केलेल्या अतिरिक्त व्याजासह** |

कर्जदार/संचालक/गहाणखतदार/जामीनदार यांनी सदर कायद्याच्या कलम १३ (२) अंतर्गत ३१.०८.२०२३ रोजीच्या मागणी सूचनेनुसार, साठ दिवसांच्या विहित कालावधीत आणि २२.१०.२०२२ रोजीच्या SREC (इंडिया) लिमिटेडच्या नावे केलेल्या उपरोक्त असाइनमेंट करारानुसार संपूर्ण थकबाकी परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, SREC (इंडिया) लिमिटेडच्या अधिकृत अधिकाऱ्याने, सिक्युरिटीज अंमलबजावणी (व्याज) नियम, २००२ सह वाचलेल्या कलम १३ (४) अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून, येथे नमूद केलेल्या अनुसूचित मालमत्तेच्या संदर्भात ०४.०७.२०२५ रोजी येथे दिलेल्या अनुसूचित मालमत्तेचा, विशेषतः येथे नमूद केलेल्या अनुसूचित मालमत्तेच्या संदर्भात, प्रत्यक्ष ताबा घेतला.

संपूर्ण देणी अद्याप फेडली गेली नसल्यामुळे, सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः कर्जदारांना, संचालकांना आणि जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की अधिकृत अधिकारी कलम १३ (२) सूचनेनुसार, खात्यातील थकबाकी वसूल करण्यासाठी खाली नमूद केलेली सुरक्षित मालमत्ता विकण्याचा विचार करीत आहेत, जर काही असेल तर, आर्थिक मालमत्तांचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत, सूचनेनंतर मिळालेल्या देयकाचे देय क्रेडिट देऊन आणि म्हणूनच सुरक्षित मालमत्तेच्या खरेदीसाठी सीलबंद लिफाफ्यात निविदा/बोली मागविण्यात येत आहेत.

ही मालमत्ता जशी आहे तिथे, जशी आहे जे आहे, जशी आहे जी स्थिती आहे आणि कोणतीही वसुली नाही या तत्त्वांवर विकली जाईल. एकूण १,८५,५२,९९४.०९ रुपये (रुपये एक कोटी पंच्याऐंशी लाख बावन्न हजार नऊशे चौरस रुपये आणि फक्त नऊ पैसे) वसूल करण्यासाठी, मेसर्स एबीएस व्हील्स प्रायव्हेट लिमिटेडचे १. दिवंगत श्री. अय्युब बाबुमियान शेख (संचालक आणि हमीदार) यांचे कायदेशीर वारस श्री. अर्शद अय्युब शेख, श्री. तोहिद अय्युब शेख, २. श्री. अर्शद अय्युब शेख, ३. श्री. तोहिद अय्युब शेख यांच्यामार्फत सुरक्षित कर्जदाराला देय असलेल्या अतिरिक्त व्याजासह. राखीव किंमत आणि ईएमडी इत्यादी खाली दिले आहेत:

| अनु क्रमांक | सुरक्षित मालमत्तेचे वर्णन | राखीव किंमत (लाखो रुपयांत) | ईएमडी (लाखो रुपयांत) | बोली वाढ (लाखो रुपयांत) |
|---|---|---|---|---|
| १ | सोलापूर जिल्हा सोलापूर तालुका उत्तर सोलापूर, कसबे सोलापूर गाव येथे ०० हेक्टर ८७ आरे, बेअरिंग सर्वे क्रमांक १०३, हिस्सा क्रमांक १ येथील जमीन, जी सोलापूर महानगरपालिकेच्या स्थानिक हद्दीत आणि नोंदणी जिल्हा उपनिबंधक सोलापूर, जिल्हा सोलापूर यांच्या अधिकारक्षेत्रात आहे. श्री तोहिद अय्युब शेख आणि श्री अर्शद अय्युब शेख यांच्या मालकीची आहे. | २११.५० | २१.१५ | १.०० |
| | **एकूण** | **२११.५०** | **२१.१५** | |

**लिलावाची माहिती :**
- लिलावाची तारीख आणि वेळ: ०४.०२.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता
- मालमत्तेची तपासणी (पूर्व अपॉइंटमेंटसह): २७.०१.२०२६ रोजी दुपारी २.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत
- बिड फॉर्म्स संकलन: १६.०१.२०२६ ते ०३.०२.२०२६ सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत
- बिड फॉर्म्स सादर करण्याची शेवटची तारीख आणि वेळ: ०३.०२.२०२६ ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत
- बिड फॉर्म्स संकलन/सबमिशनचे ठिकाण आणि लिलावाचे ठिकाण: एएसआरईसी (इंडिया) लिमिटेडच्या २०० ए-२०१ आणि २०० बी-२०२ येथील कार्यालयातून, इमारत क्र. २, तळमजला, सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क, अंधेरी-घाटकोपर लिंक रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९३. निविदा फॉर्म SREC (INDI) LTD च्या वेबसाइटवरून देखील डाउनलोड करता येतील. (www.asrecindia.co.in). SREC कडून प्राप्त झालेले प्रस्ताव/निविदा अधिकृत अधिकाऱ्यांद्वारे ०४.०२.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता आमच्या वर नमूद केलेल्या कार्यालयीन पत्त्यावर उघडल्या जातील जिथे आंतर-सेवा बोली लावता येईल.

**अटी आणि शर्ती:**
१. अधिकृत अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, मालमत्तेवर इतर कोणतेही भार नाहीत. इच्छुक बोलीदारांनी त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी मालमत्तेवर परिणाम करणारे भार, लिलावात ठेवलेल्या मालमत्तेचे मालकी हक्क आणि दावे/हक्क/देयके याबद्दल स्वतंत्र चौकशी करावी. सार्वजनिक लिलावाची जाहिरात SREC ची कोणतीही वचनबद्धता किंवा कोणतेही प्रतिनिधित्व करत नाही आणि ती मानली जाणार नाही. SREC ला ज्ञात असो वा नसो, मालमत्ता सर्व विद्यमान भारांसह विकली जात आहे. अधिकृत अधिकारी/सुरक्षित कर्जदार कोणत्याही तृतीय पक्षाच्या दाव्यांसाठी/हक्कांसाठी/मतदानासाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत.
२. वर सांगितल्याप्रमाणे संपूर्ण मालमत्तेचा लिलाव जसे आहे तिथे आहे, जसे आहे जे आहे आणि जसे आहे जे आहे तेथे आहे आणि कोणताही आधार नाही या आधारावर केला जाईल.
३. निविदा दस्तऐवजात दिलेल्या विहित नमुन्यातील बोली, डिमांड ड्राफ्ट किंवा ठढक्रड्ड द्वारे निधी हस्तांतरणाच्या स्वरूपात १०% एचऊ रक्कम खाली दिलेल्या तपशीलांनुसार, SREC (इंडिया) लिमिटेड, बिल्डिंग क्रमांक २, युनिट क्रमांक २०१-२०२अ आणि २००-२०२ब, ग्रा. फ्लोअर, सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क, अंधेरी घाटकोपर लिंक रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००९३ च्या अधिकृत अधिकाऱ्याकडे सादर करावी. ०३.०२.२०२६ रोजी सायंकाळी ५:०० नंतर प्राप्त झालेला बोली फॉर्म किंवा एचऊ कोणत्याही कारणास्तव स्वीकारला जाणार नाही. EMD नसलेली बोली थोडक्यात नाकारली जाईल.
४. यशस्वी बोलीदाराची बयाणा रक्कम (EMD) विक्रीच्या मोबदल्यात राखून ठेवली जाईल आणि अयशस्वी बोलीदारांची EMD त्याच प्रकारे परत केली जाईल. EMD वर कोणतेही व्याज आकारले जाणार नाही. जलद आणि योग्य परतफेड करण्यासाठी बोलीदारांना त्यांच्या बँक खात्याची माहिती देण्याची विनंती केली जाते.
५. यशस्वी बोलीदाराने ताबडतोब म्हणजेच त्याच दिवशी किंवा पुढील कामकाजाच्या दिवशी, जसे असेल तसे, विक्री किमतीच्या २५% (जमा केलेल्या एचऊ रकमेसह) अधिकृत अधिकाऱ्याकडे जमा करावे आणि अशी ठेव न भरल्यास, EMD जप्त केली जाईल आणि मालमत्ता पुन्हा विकली जाईल.
६. विक्री किमतीची उर्वरित रक्कम मालमत्तेच्या विक्रीची पुष्टी झाल्यापासून १५ व्या दिवशी किंवा सुरक्षित धनको आणि यशस्वी बोलीदार यांच्यात लेखी सहमती झाल्याच्या वाढीव कालावधीपूर्वी किंवा त्यापूर्वी भरली जाईल. वरील निर्धारित कालावधीत पैसे न भरल्यास, ठेव जप्त केली जाईल आणि मालमत्ता पुन्हा विकली जाईल आणि कसूर करणारा खरेदीदार मालमत्तेवरील किंवा ती नंतर विकल्या जाणाऱ्या रकमेच्या कोणत्याही भागावरील सर्व दावे जप्त करेल.
७. विक्री ही वित्तीय मालमत्तांचे सुरक्षाकरण आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ अंतर्गत विहित केलेल्या नियम/शर्तींच्या अधीन असेल.
८. ईएमडी रक्कम आणि राखीव किंमतीपेक्षा कमी असलेली बोली स्वीकारली/पुष्टी केली जाणार नाही.
९. इच्छुक खरेदीदार/बोलीदारांनी ईएमडी रक्कम एनईएफटी/आरटीजीएस द्वारे बँक ऑफ इंडिया, एसएसआय, अंधेरी शाखा, आयएफएससी कोड: बीकेआयडी००००००९० येथे खाते क्रमांक: ००९०२०११०००१५७० मध्ये जमा करणे आवश्यक आहे. लाभार्थीचे नाव: एएसआरईसी पीएस-०३/२०२२-२३ ट्रस्ट, किंवा एएसआरईसी-पीएस-०३/२०२२-२३ ट्रस्टच्या नावे काढलेल्या डिमांड ड्राफ्टद्वारे कोणत्याही राष्ट्रीयीकृत किंवा अनुसूचित बँकेत काढलेल्या आणि मुंबईत देय असलेल्या.
१०. इच्छुक बोलीदार २७.०१.२०२६ रोजी दुपारी २.०० ते ४.०० वाजेपर्यंत मालमत्तेची तपासणी करू शकतात. संपर्क तपशील: श्री. हर्षद व्ही. - सेल क्रमांक ९५९४६९२२५१,०२२-६१३८७०५७, श्री. जगदीश शाह - सेल क्रमांक ७०२१४ २८३३६, ०२२६१३८७०४२, कोणत्याही प्रश्नासाठी संपर्क साधता येईल.
११. अधिकृत अधिकाऱ्याला कोणतेही कारण न देता कोणत्याही किंवा सर्व ऑफर स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा आणि/किंवा कोणत्याही अटी/शर्तींमध्ये बदल करण्याचा पूर्ण अधिकार आहे.
१२. यशस्वी बोलीदार कायद्यानुसार लागू असलेल्या नोंदणी, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, आनुषंगिक खर्च इत्यादींसाठी देय शुल्क/शुल्क सहन करेल.
१३. विक्रीच्या अटी आणि शर्तींचे पालन झाल्यानंतर आणि विक्रीची पुष्टी झाल्यानंतर अधिकृत अधिकारी यशस्वी बोलीदाराच्या नावे विक्री प्रमाणपत्र जारी करतील.
१४. जर वर नियोजित लिलाव कोणत्याही कारणास्तव अयशस्वी झाला तर, डठएउ ला या सूचनेद्वारे खाजगी कराराद्वारे किंवा सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम आणि SRFESI कायदा, २००२ च्या नियम ८(५) च्या तरतुदींनुसार लिलावाअंतर्गत सुरक्षित मालमत्ता विकण्याचा अधिकार आहे.
१५. सर्वोच्च बोली सुरक्षित धनको/अधिकृत अधिकाऱ्याच्या मान्यतेच्या अधीन असेल.

जर त्यांच्या थकबाकीची देणी पूर्णपणे भरली गेली नाहीत तर ही सूचना सरफसी कायदा आणि सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियमांच्या नियम ८(६) आणि ९(१) अंतर्गत सुरक्षित मालमत्तेच्या विक्रीसाठी कर्जदार आणि संयुक्त/सह-कर्जदार/जामीनदारांना वरील उल्लेखित तारखेला १५ (पंधरा) दिवसांची सूचना म्हणून लागू होते.

तारीख : १६.०१.२०२६
ठिकाण : मुंबई

सही/-
प्राधिकृत अधिकारी,
SREC (इंडिया) लि.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे

### ऑस्ट्रेलियन ओपनसाठी स्लोएन स्टीफन्स पात्र

**मेलबर्न :** स्लोएन स्टीफन्सने ऑस्ट्रेलियन ओपनसाठी पात्रता मिळवली आहे. मेलबर्न पार्कमध्ये एका वर्षापूर्वी अव्वल मानांकित आर्यना



सबालेन्काविरुद्ध पहिल्याच फेरीत पराभव पत्करल्यानंतरची ही तिची पहिली मोठी स्पर्धा आहे. २०१७ च्या अमेरिकन ओपन विजेत्या स्टीफन्सने डाव्या पायाच्या दुखापतीतून बऱ्याच काळ सावरल्यानंतर, या हंगामातील पहिल्या ग्रॅण्ड स्लॅम स्पर्धेच्या पात्रता फेरीत १०९७ व्या क्रमांकाच्या मानांकनासह प्रवेश केला होता. तिने मेलबर्न पार्कमध्ये पात्रता फेरीत सलग तीन विजय मिळवले आहेत. गुरुवारी तिसऱ्या फेरीत इटलीच्या लुसिया ब्रॉन्झेटीला ६-१, ७-५ असे हरवून तिने मुख्य ड्रॉमध्ये आपले स्थान निश्चित केले. या ३२ वर्षीय अमेरिकन खेळाडूने आपल्या कारकिर्दीतील सर्वोत्तम तिसरे मानांकन गाठले होते.

### केंद्र सरकारने इंग्लंडच्या रशीद, अहमदला व्हिसा दिला नाही

**लंडन :** भारतीय सरकारने फिरकीपटू आदिल रशीद आणि रेहान अहमद यांना अद्याप व्हिसा न दिल्यामुळे इंग्लंडच्या टी-२० विश्वचषकाच्या तयारीला बाधा आली आहे. या विलंबामुळे, पाकिस्तानी वंशाचे असलेले हे दोन्ही खेळाडू या आठवड्याच्या शेवटी श्रीलंकेविरुद्धच्या सहा वन-डे व टी-२० सामन्यांसाठी (तीन एकदिवसीय आणि तीन टी-२०) संघासोबत प्रवास करण्याची शक्यता कमी आहे. तो आपल्या सहकाऱ्यांसोबत कधी सहभागी होईल हे अद्याप अस्पष्ट आहे.रशीद सध्या २० मध्ये खेळत आहे, तर अहमद बिग बॅश लीगसाठी ऑस्ट्रेलियामध्ये आहे व त्यांचा व्हिसा मंजूर झाल्यावर ते थेट त्या ठिकाणांहून प्रवास करू शकतील अशी आशा आहे. इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट मंडळाला त्यांच्या अर्जांवर कोणताही आक्षेप नसल्याचे आश्वासन देण्यात आले आहे आणि ही प्रक्रिया लवकर पूर्ण करण्यासाठी इंग्लंड सरकारकडून मदत मागितली आहे, तथापि, वेळेबद्दल अनिश्चितता कायम असल्याचे अहवालात म्हटले आहे.

### राज्य क्रिकेट : सोलापूरच्या महिला उपांत्य फेरीत

**सोलापूर, दि. १५ जानेवारी-**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या निवड सामन्यात सोलापूरने गुरुवारी कोल्हापूर संघाचा पराभव करीत उपांत्य फेरीत प्रवेश केला.



कोल्हापूरने प्रथम फलंदाजी करताना ४७ षटकात १४२ धावा केल्या. यात पुनम माशाळे व विभावरी देवकते प्रत्येकी २ बळी टिपले. भक्ती पवार, अमृता गव्हाणे, स्नेहा शिंदे व आर्या उमाप यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला. १४२ विजयी लक्ष्य गाठताना सोलापूरच्या आर्या उमाप हिने नाबाद १०२ धावा करीत एक हाती सामना जिंकून दिला. उपांत्य फेरीत सोमवारी सोलापूरची लढत पुणे संघाशी पडेल.



श्रीराज गवळी



सार्थक कन्ना

### एनजी अकादमीविरुद्ध युनायटेड मजबूत स्थितीत

**सोलापूर, दि. १५ जानेवारी-**

युनायटेड क्रिकेट क्लबचे दिवंगत खेळाडू नजीर पैलवान शेख चषक तीन दिवसीय क्रिकेट स्पर्धेत नीलेश गायकवाड क्रिकेट अकादमी विरुद्ध युनायटेडने सर्व बाद २३२ धावा केल्या. प्रत्युतरात पहिल्या दिवशीचा खेळ संपताना एनजी अकादमीने २ बाद ५१ धावा केल्या आहेत. पहिल्या दिवशी श्रीराज गवळी व सार्थक कन्ना यांनी शानदार खेळी केली. **संक्षिप्त धावफलक :** युनायटेड ७२.२ षटकांत सर्व बाद २३२ (श्रीराज गवळी ८२, सम्राट बोबडे ४३, ध्रुव शिंदे २३, हर्षद विजापुरे १८, सार्थक कन्ना ४-५४, जयवर्धन भोसले ३-२४, ऋग्वेद पाटील व अनुज वाल्मिकी आर्यन हंगे प्रत्येकी एक बळी). विरुद्ध एनजी अकादमी : १६ षटकांत २ बाद ५१ (सुजल गायकवाड ४१ धावांवर खेळत आहे. दत्तात्रय कुलकर्णी २-१७).

# भारताची विजयी सलामी

## १९ वर्षांखालील विश्वचषक क्रिकेट ● अमेरिकेवर ६ गड्यांनी विजय

**बुलावायो, १५ जानेवारी**

आयसीसी १९ वर्षांखालील विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत गुरुवारी येथे हेनिल पटेलच्या प्रभावी गोलंदाजीच्या बळावर भारताने सलामीच्या सामन्यात डकवर्थ लुईस नियमानुसार अमेरिकेवर ११८ चेंडू शिल्लक ठेवित ६ गड्यांनी सहज विजय नोंदविला.



सामनावीर हेनिल पटेलचे १६ धावांत ५ बळी

भारतीय संघाचा कर्णधार आयुष म्हात्रेने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. कर्णधाराचा निर्णय योग्य ठरवित भारतीय गोलंदाजांनी-विशेषतः मध्यम गती गोलंदाज हेनिल पटेलने अचूक मारा केला आणि अमेरिकेला ३५.२ षटकांत १०७ धावा केल्या. हेनिल पटेलने अवघ्या १६ धावांच्या मोबदल्यात अमेरिकेचा निम्मा संघ बाद केला. पावसाच्या व्यत्ययामुळे भारतासमोर विजयासाठी सुधारित लक्ष्य ठेवण्यात आले. भारताला ३७ षटकांत ९६ धावा काढायच्या होत्या, ते त्यांनी अवघ्या १७.२ षटकांत ४ गडी गमावित विजयाचे लक्ष्य गाठले.

दुसऱ्याच षटकांत हेनिल पटेलने अमेरिकेचा सलामीवीर अमरिंदर गिलला (१) मल्होत्राकडे झेल सोपविण्यास भाग पाडले. सातव्या क्रमांकावरील नितीश सुदीमीने तेवढी भारतीय गोलंदाजांशी झुंज दिली व त्याने ५२ चेंडूंत ४ चौकारांसह ३६ धावा केल्या. साहील गर्ग (१६), अर्जुन महेश (१६) व अदनीत झाम्बने (१८) थोडे फार योगदान दिले.

भारताकडून हेनिल पटेलने प्रभावी मारा करत अमेरिकेच्या फलंदाजांना नियमित अंतराने तंबूत पाठविले. हेनिलने १६ धावांत ५ बळी टिपण्याची किमया केली. दीपेश देवेंद्रन, आर. एस. अंबरिश, खिलाव पटेल व वैभव सूर्यवंशीने प्रत्येकी १ बळी टिपला.

सुधारित लक्ष्यानुसार विजयासाठी ९६ धावांचा पाठलाग करताना भारताची प्रारंभी थोडी फार दाणादाण उडाली. भारताने वैभव सूर्यवंशी, वेदांत त्रिवेदी व आयुष म्हात्रेसारखे तीन भरवशाचे खेळाडू ५.२ षटकांत २५ धावांत गमावले. मात्र त्यानंतर विहान मल्होत्रा व अभिग्यान कुंडूने संयमाने फलंदाजी करत भारताच्या विजयाच्या आशा पल्लवीत ठेवल्या. परंतु याचदरम्यान विहान श्रीवास्तवच्या गोलंदाजीला बळी पडला. विहानने १७ चेंडूंत १८ धावांची भर घातली. तोपर्यंत भारताने ४ बाद ७० धावांचा टप्पा गाठला होता. पुढे अभिग्यान कुंडु व कनिष्क चौहानने नाबाद खेळी करत भारताला विजयावर शिक्कामोर्तब केला. भारताने १७.२ षटकांत ४ बाद ९९ धावा काढल्या.

कुंडुने अदित काप्पाला षट्कार हाणत भारताचा विजय साकार केला. अभिग्यान कुंडूने ४१ चेंडूंत ५ चौकार व एका षट्कारसह नाबाद ४२ धावांची खेळी केली, तर कनिष्क चौहानने १४ चेंडूंत नाबाद १० धावांची खेळी केली.

अमेरिकेकडून ऋत्विक अप्पीडीने २ बळी, ऋषभ शिम्पी व उत्कर्ष श्रीवास्तवने प्रत्येकी एक बळी टिपला. (वृत्तसंस्था)



जय



युवराज



मयुर



प्रांजल


## सोलापुरच्या चौघांना आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त

**सोलापूर, दि. १५ जानेवारी-**

पुणे आणि सोलापूर येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय गुणांकन बुद्धिबळ स्पर्धेत चॅम्प चेस स्कूल व सोलापूर चेस अकॅडमीच्या जय योगेश आनेराव, युवराज प्रदीप गायकवाड, मयूर दयानंद स्वामी व प्रांजल प्रकाश वाघमारे यांनी मानांकित व अनुभवी खेळाडूंविरुद्ध प्रभावी खेळाचे प्रदर्शन करत रॅपिड व ब्लिट्झ अशा विविध प्रकारात आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त केले आहे. सातत्यपूर्ण आणि एकाग्र खेळाच्या जोरावर त्यांनी आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महासंघाने ठरवलेले निकष पूर्ण करत हे महत्त्वाचे यश मिळवले

पंढरपूरच्या द. ह.कवठेकर प्रशालेत शिकत असलेल्या जय योगेश आनेराव याने आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त समृद्धी कटले, सृष्टी मुसळे यांचा पराभव केला व श्रेयश इंगळे आणि विशाल गिराम यांच्याशी बरोबरी साधत रॅपिड प्रकारात इलो १४९० आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त केले. इंडियन मॉडेल स्कूल सी.बी.एस.ई. च्या युवराज प्रदीप गायकवाड याने उत्कृष्टरीत्या खेळत मानांकित अर्णव पाटील याचा पराभव केला व अनय घुगे याच्याशी बरोबरी साधत ब्लिट्झ प्रकारात इलो १४३७ आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त केले. भारती विद्यापीठ प्रशालेचा मयूर दयानंद स्वामी याने सुरेख खेळ करत मानांकित नोमन पाचवडकरचा पराभव करत ब्लिट्झ प्रकारात इलो १४०६ आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त केले. तसेच धाराशिवच्या प्रांजल वाघमारे हिने देखील चमकदारी कामगीरी करत मानांकित बाळासाहेब मस्के, डी. कुलकर्णी, अनन्या उलभगत यांचा पराभव केला तर विजय विश्रुत याच्याशी बरोबरी साधत रॅपिड प्रकारात इलो १४९३ आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त केले.

चॅम्प चेस स्कूलमध्ये शिकत असलेल्या खेळाडूंना त्यांच्या पालकांचे व शाळेचे प्रोत्साहन मिळत असून त्यांना आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त उदय वगरे तसेच आंतरराष्ट्रीय पंच व प्रशिक्षक सुमुख गायकवाड यांचे मार्गदर्शन मिळत आहे. आंतरराष्ट्रीय गुणांकन मिळणे हा बुद्धिबळपटूसाठी महत्त्वाचा टप्पा मानला जातो. खेळाडूंनी संपादन केलेल्या उज्वल यशाबद्दल सोलापुर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनचे अध्यक्ष धैर्यशील मोहिते पाटील, सोलापुर चेस अकॅडेमीचे अध्यक्ष महेश धाराशिवकर आदींनी कौतुक करत अभिनंदन केले.









## केबीपी पंढरपूरच्या चार महिलांची आंतर विद्यापीठ क्रिकेट संघात निवड

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १५ जानेवारी -**

रयत शिक्षण संस्थेच्या येथील कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयाच्या पूजा माने, आकांक्षा रोंगे, तनवी माने व अमृता आगवणे या चार महिला खेळाडूंची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ महिला क्रिकेट संघात निवड झाली आहे. राजस्थान येथील नस्तली विद्यापीठात होणाऱ्या आंतर विद्यापीठ महिला क्रिकेट स्पर्धेत त्या भाग घेतील. त्यांचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव, शारीरिक शिक्षण संचालक प्रा. अनिल परमार, प्रा. विठ्ठल फुले तसेच प्रा. मनोज खपाले यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

## वालचंद व डब्ल्यूआयटी शिक्षक संघाचे दणदणीत विजय

### श्रीमान भाऊसाहेब गांधी स्मृती चषक क्रिकेट स्पर्धा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ जानेवारी-**

वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी क्रीडांगणावर सुरू असलेल्या श्रीमान भाऊसाहेब गांधी स्मृती चषक क्रिकेट स्पर्धेत रविवारी झालेल्या सामन्यात वालचंद व डब्ल्यूआयटी शिक्षक संघाचे दणदणीत विजय मिळवित उपांत्य फेरीत प्रवेश केला.

पहिल्या सामन्यात वालचंद शिक्षक संघाने डब्ल्यू. आय. टी. सिक्युरिटी संघाचा ४७ धावांनी पराभव केला. वालचंद शिक्षक संघाने ८ षटकांत बीन बाद १०० धावा केल्या. यात प्रसन्नकुमार पल्लीने ३० चेंडूंमध्ये ६९ धावांची नाबाद खेळी केली. प्रत्युत्तरात डब्ल्यू.आय.टी. सिक्युरिटी संघाने आठ षटकांत त्यांनी चार गडी गमावत ५३ धावाच करता आल्या. राहुल हजारे व संदेश बोराळकर यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. या सामन्याची नाणेफेक नूतन विद्यालय, आष्टीचे मुख्याध्यापक अजित हेरले यांनी केले.

दुसऱ्या सामन्यात दुसऱ्या सामन्यात डब्ल्यू.आय.टी. शिक्षक संघाने जैन गुरूकूलवर १० गडी राखून दणदणीत विजय मिळविला. जैन गुरुकुल प्रशाला संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना निर्धारित आठ षटकांत बीन बाद ८८ धावा केल्या. प्रत्युत्तरात डब्ल्यू.आय.टी. शिक्षक संघाने ८९ धावांचे लक्ष्य ६.३ षटकांत एकही गडी न गमावता सहज पूर्ण केले. यात श्रीशैल चमत गौडाने २६ चेंडूंमध्ये ६० धावांची झंझावाती खेळी केली. या सामन्याची नाणेफेक डब्ल्यू.आय.टी.ई अँड टीसी विभागाचे डॉ. विपुल कोंडेकर यांनी केले.



## राष्ट्रीय युवा दिनानिमित्त श्राविका प्रशालेतील युवा खेळाडूंचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ जानेवारी-**

उमाबाई श्राविका विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात राजमाता जिजाऊ व युगपुरुष स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

प्रारंभी महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रशालेच्या मार्गदर्शिका दीप्ती शहा,उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ सर, माधवी खोत यांची उपस्थिती होती. सांस्कृतिक विभाग प्रमुख माधवी खोत यांनी यावेळी विद्यार्थ्यांना राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवनातील प्रेरक प्रसंग सांगून विद्यार्थ्यांचे उद्बोधन केले. युवा दिनाचे औचित्य साधून उमाबाई श्राविका विद्यालयातील शालेय शहरस्तरीय व विभागीय स्पर्धेत यश संपादन केलेल्या खेळाडूंचा तसेच असोसिएशन राज्य पातळीवर निवड झालेल्या प्रशालेचे नेतृत्व करणाऱ्या खेळाडूंचा मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा शिक्षक सुहास छंचुरे यांनी केले. विक्रांत बारडकर यांनी आभार मानले.

# महाराष्ट्राच्या महिलांचा डंका, पुरुष गटात रेल्वेची बाजी

### महाराष्ट्राच्या संध्या सुरवसेला (धाराशिव) राणी लक्ष्मीबाई तर रेल्वेच्या रामजी कश्यपला (सोलापूर) एकलव्य पुरस्कार

**५८ वी वरिष्ठ राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा**

**महाराष्ट्राच्या महिलांचे २७वे तर रेल्वेचे १३वे अजिंक्यपद**

**काझीपेठ (तेलंगणा), दि. १५ जानेवारी-**

काझीपेठ येथील रेल्वे ग्राऊंडवर रंगलेली ५८ वी वरिष्ठ राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा शेवटच्या क्षणापर्यंत थरारक ठरली. भारतीय खो-खो महासंघाच्या मान्यतेने व तेलंगणा खो-खो असोसिएशनच्या आयोजनाखाली पार पडलेल्या या महास्पर्धेत महाराष्ट्राच्या रणरागिणींनी महिलांच्या गटात अजिंक्यपदाचा झेंडा फडकावला, तर रेल्वेच्या शिलेदारांनी पुरुष गटात आपले वर्चस्व सिद्ध केले.

महिलांच्या अंतिम सामन्यात महाराष्ट्राने ओडिशाला नमवले, तर पुरुषांच्या अंतिम लढतीत रेल्वेने महाराष्ट्रावर रोमहर्षक विजय मिळवला. या स्पर्धेत धाराशिव, महाराष्ट्राच्या संध्या सुरवसेला राणी लक्ष्मीबाई पुरस्कार, तर रेल्वेच्या रामजी कश्यपला (सोलापूर) एकलव्य पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. महिलांमध्ये महाराष्ट्राचे हे २७ वे, तर पुरुषांमध्ये रेल्वेचे १३ वे अजिंक्यपद ठरले.



**स्पर्धेतील मानकरी: उत्कृष्टतेचा गौरव**

**महिला गट:**
- राणी लक्ष्मीबाई पुरस्कार संध्या सुरवसे (महाराष्ट्र)
- सर्वोत्कृष्ट संरक्षक अर्चना प्रधान (ओडिशा)
- सर्वोत्कृष्ट आक्रमक प्रियंका इंगळे (महाराष्ट्र)

**पुरुष गट:**
- एकलव्य पुरस्कार रामजी कश्यप (रेल्वे)
- सर्वोत्कृष्ट संरक्षक प्रतीक वाईकर (महाराष्ट्र)
- सर्वोत्कृष्ट आक्रमक अभिनंदन पाटील (रेल्वे)

**महाराष्ट्राच्या रणरागिणींनी राखले वर्चस्व**

महिलांच्या अंतिम सामन्यात महाराष्ट्राने ओडिशावर २३२२ असा १ गुणाने थरारक विजय मिळवला. महाराष्ट्राच्या विजयात प्रियंका इंगळे (२.१० मि. संरक्षण व १० गुण),



संध्या सुरवसे



रामजी कश्यप

संध्या मोरे (२.४० मि. संरक्षण), संध्या सुरवसे (२.३० मि. संरक्षण) आणि अश्विनी शिंदे (१.२० मि. संरक्षण व ४ गुण) यांनी निर्णायक योगदान दिले. पराभूत ओडिशाकडून अर्चना प्रधान (२.१० मि. संरक्षण व २ गुण), अर्चना माझी (नाबाद १.५० मि. संरक्षण), मधुस्मिता ओझा (१.४० मि. संरक्षण व २ गुण) आणि शोभाश्री सिंग (१.५० मि. संरक्षण व २ गुण) यांनी जबरदस्त लढत दिली; मात्र त्यांचा प्रयत्न अपुरा ठरला.

**रेल्वेची विजयी धडाकेबाजी**

पुरुषांच्या अंतिम सामन्यात रेल्वेने महाराष्ट्राचा २६२१ असा ५ गुणांनी पराभव करत जेतेपद पटकावले. मध्यंतराला रेल्वे संघ १४११ ने आघाडीवर होता. विजयी रेल्वे संघाकडून रामजी कश्यप (नाबाद २.३० मि. संरक्षण व २ गुण), महेश शिंदे (१.४० मि. झुंज), जगन्नाथ दास (१.४० मि. संरक्षण व ४ गुण), अरुण गुणकी (१.३७ मि. संरक्षण व २ गुण) आणि अभिनंदन पाटील (४ गुण) यांनी चमकदार कामगिरी केली. महाराष्ट्राकडून प्रतीक वाईकर (१.५५ मि. संरक्षण व २ गुण), अनिकेट चेंदवणकर (१.३० मि. संरक्षण व ६ गुण) आणि शुभम उतेकर (नाबाद १ मि. संरक्षण व २ गुण) यांनी झुंजार खेळ केला.

**उपांत्य फेरीतील धमाका**

पुरुषांच्या उपांत्य फेरीत महाराष्ट्राने कोल्हापूरवर २९२७ असा २ गुणांनी विजय मिळवला, तर दुसऱ्या उपांत्य सामन्यात रेल्वेने ओडिशाचा २५१७ असा ८ गुणांनी पराभव केला.

महिलांच्या उपांत्य फेरीत महाराष्ट्राने दिल्लीवर २७०६ असा एक डाव व २१ गुणांनी दणदणीत विजय नोंदवला, तर ओडिशाने विमान प्राधिकरणावर २७१९ असा ८ गुणांनी विजय मिळवून अंतिम फेरीत प्रवेश केला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...

### राजुरी येथे १८ जानेवारीला विनामूल्य महाआरोग्य शिबिर; डॉ. दुरंदे यांचा पुढाकार

**जेऊर दि.१५ जानेवारी**

राजुरी (ता. करमाळा) येथे ग्रामीण भागातील नागरिकांना उत्तम आरोग्य सुविधा मिळाव्यात या उद्देशाने, डॉ. दुरंदे हॉस्पिटल ( करमाळा), मेडीकोज गिल्ड आणि परिवर्तन प्रतिष्ठान (राजुरी) यांच्या संयुक्त विद्यमाने राजुरी येथे भव्य 'विनामूल्य महाआरोग्य शिबिरा'चे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर रविवार, दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी पार पडणार आहे. तसेच सदर शिबिर जिल्हा परिषद शाळा, राजुरी येथे सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत संपन्न होणार असून या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांकडून रुग्णांची तपासणी केली जाणार आहे. या शिबिरांच्या माध्यमातून तालुक्यातील शेकडो नागरिकांना मोठा फायदा झाला आहे. त्याबरोबरच दरवर्षी प्रमाणे या शिबिरात देखील सर्व प्रकारच्या आजारांवर मोफत निदान आणि उपचार देखील करून दिले जाणार आहेत. रुग्णांना आधुनिक उपचार आणि विश्वासार्ह सेवा मिळावी, हा या शिबिराचा मुख्य उद्देश आहे. दरम्यान, परिवर्तन प्रतिष्ठानचे अध्यक्ष आणि राजुरीचे माजी सरपंच डॉ. अमोल दादासाहेब दुरंदे यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या मोफत आरोग्य शिबिराचा परिसरातील जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा असे त्यांनी आवाहन केले आहे. शिबिरात सहभागी होण्यासाठी रुग्णांनी आपली नावे खालील क्रमांकावर नोंदवावीत: ९७३०४९६८६४, ९७३०३२०२०४, ९९६०८६८७६४.



### काँग्रेस अल्पसंख्याक विभागाच्यावतीने राजमाता जिजाऊ यांची जयंती साजरी

**कुर्डूवाडी, दि. १५ जानेवारी -**

कुर्डुवाडी शहर काँग्रेस कमिटी अल्पसंख्याक विभाग यांच्या वतीने साजरी करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सर्वांनी अभिवादन करण्यात आले. यावेळी कुर्डुवाडी काँग्रेस अल्पसंख्यक शहराध्यक्ष हमीद शिकलकर , काँग्रेस कमिटी शहराध्यक फिरोज खान, राहुल गायकवाड , उमाकांत पारखे, शाबीर शिकलकर, मोईन मुलाणी, रितेश त्रिंबके, प्रतीक सातव , आदर्श जाधव व आदी कार्यकर्ते उपस्थित होते. शेवटी संयोजक हमीद शिकलकर यांनी सर्वांचे आभार मानले.

### १६ जानेवारीपासून पंचायत समितीची ऑफलाइन अर्ज घेण्याची प्रक्रिया

**मोहोळ, दि. १५ जानेवारी -**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक प्रक्रिया सुरू करण्यात आली असून १६ जानेवारीपासून पंचायत समितीची ऑफलाइन अर्ज घेण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आल्याची माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तहसीलदार सचिन मुळीक यांनी दिली. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूक याची प्रक्रिया सुरू झाली आहे यावेळी मोहोळ तालुक्यात सहा जिल्हा परिषद गट व १२ पंचायत समिती गण यासाठी निवडणूक होत आहे या निवडणुकीची माहिती जाहीर करण्यासाठी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सचिव मुळीक यांनी पत्रकार परिषदेत माहिती देताना म्हणाले की या निवडणुकीत सिमा



होळकर यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे निवडणुकीत कोणतेही पद्धतीचे ऑनलाईन अर्ज न भरता ऑफलाइन पद्धतीने अर्ज सादर करावयाचे आहेत अर्ज संपूर्णपणे भरला गेला पाहिजे संपूर्ण रकाने व्यवस्थितपणे भरूनच अर्ज सादर करावयाचा आहे यावेळी अर्जावर एका सुचकाची सही असणारा आहे तर एका उमेदवारास चार प्रतींमध्ये अर्ज सादर करता येतील अशी ही माहिती तहसीलदार सचिन मुळीक यांनी यावेळी पुढे बोलताना तहसीलदार म्हणाले .प्रत्येक मतदाराने एक जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गण असे दोन वेळा मतदान करावयाचे आहे जिल्हा परिषद साठी प्रत्येकी उमेदवारास एक हजार रुपये फी आकारण्यात येणार आहे तर मागासवर्गीय इतर मागासवर्गीय उमेदवार पाचशे रुपये आकारण्यात येणार आहे तर पंचायत समिती साठी खुल्या गटासाठी सातशे रुपये तर मागासवर्गीय इतर मागासवर्गी व्यक्ती साठी साडेतीनशे रुपये आकारण्यात येणार आहे निवडणूक निर्णयाच्या विरोधात अपील करता येणार नाही असेही तहसिलदार यावेळी म्हणाले १ जुलै २०२५ रोजी निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या यादि नुसार मतदान प्रक्रिया होणार आहे सदर निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी दीड हजार कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तहसिलदार सचिन मुळीक यांनी सांगितले.


# ऐन जि.प. निवडणुकीत डोंगरे पिता-पुत्र राष्ट्रवादीत

### मोहोळमधील राजकीय समीकरण बदलणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.१५ जानेवारी-**

जिल्हा परिषद, पंचायत समितीची निवडणूक रणधुमाळी सुरु झाली असतानाच मोहोळ तालुक्याच्या राजकारणात भूकंप झाला असून ज्येष्ठ नेते मनोहरभाऊ डोंगरे व त्यांचे पुत्र जिल्हा परिषदेचे माजी सभापती विजयराज डोंगरे यांनी भाजपातून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे.

दरम्यान डोंगरे पिता-पुत्राच्या राष्ट्रवादी प्रवेशामुळे मोहोळ तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीची समिकरणे आता बदलणार असल्याचे चित्र आहे. अनगरकरांना शह देण्याच हा प्रयत्न असल्याची चार्च आहे. माजी आमदार राजन पाटील व त्यांच्या चिरंजीवांनी भाजपाचा रस्ता धरला. तर नगरपरिषदेच्या निवडणुकीत विक्रांत पाटील यांनी



ना.अजित पवार यांनाच आव्हान दिले. या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा मोहोळ तालुक्यात आघाडीचा नारा दिसणार आहे. जिल्ह्याचे ज्येष्ठ नेते बळीरामकाका साठे यांनाही राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सन्मानाने घेऊन जिल्हाध्यक्षांनी संघटन कौशल्य सिद्ध केले आहे. तसेच करमाळ्याचे माजी आमदार संजयमामा शिंदे यांना सोबत घेऊन तसेच अक्कलकोटचे माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांचे चिरंजीव शिवानंद पाटील, संजीव पाटील यांनाही पक्षात घेऊन ना.अजितदादांच्या पक्षाची पकड जिल्ह्यात मजबूत करण्यावर भर दिला आहे. गुरुवारी बारामती येथे लोकशक्ती परिवाराचे मनोहरभाऊ डोंगरे व विजयराज डोंगरे यांना ना.अजितदादांच्या हस्ते पक्षात आणून मोहोळ तालुक्यातील बदलत्या राजकीय समिकरणाचे रणशिंग फुंकले आहे. डोंगरे यांना तालुक्यात मानणारा मोठा वर्ग आहे. एक काळ मनोहर डोंगरे व राजन पाटील या जोडीने तालुक्यातील नेतृत्वाची घडी एकसंध ठेवली होती. मात्र, अलिकडे दोन्ही नेते विभक्त झाले. विजयराज डोंगरे यांनी भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला होता. मात्र, आता राजन पाटील यांना भाजपमध्ये प्रवेश दिल्यामुळे डोंगरे यांनी ना.अजितदादांचे नेतृत्व मान्य केले आहे. त्यांच्या राष्ट्रवादी प्रवेशामुळे मोहोळ तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीची समिकरणे बदलणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. डोंगरे पिता-पुत्रासह सुनील पाटील, बाबूराव कोकाटे, पैलवान नितीन निळे, दीपक पुजारी, सर्जेराव चवरे, सहदेव पुजारी, दीपक गवळी, सादिक तांबोळी, महावीर पुजारी, सागर थोरात, मुन्ना बचुटे या कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

# बार्शी तालुक्यात क्रांतीचे पाऊल; मी विधवा नव्हे, मी स्त्री!

### विधवांनाही मिळणार सन्मान, नाव नोंदणीसाठी आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग,दि.१५ जानेवारी-**

समाजातील जुन्या अनिष्ट प्रथांना छेद देत महिलांना सन्मानाची वागणूक मिळवून देण्यासाठी 'एकता महिला मंच'ने यंदा मकर संक्रांतीचे औचित्य साधून मी विधवा नव्हे, मी स्त्री! हा एक अत्यंत धाडसी आणि कौतुकास्पद उपक्रम हाती घेतला आहे. बार्शी तालुक्यातील प्रत्येक गावागावांत सुवासिनी आणि विधवा भगिनींचा एकत्रित हळदी-कुंकू समारंभ आयोजित करून स्त्री शक्तीचा जागर केला जाणार आहे.

**'एकता महिला मंच'चा निर्धार**

**प्रथांना छेद, सन्मानाचा उदय**

मकर संक्रांतीला हळदी-कुंकू करण्याची परंपरा जुनी आहे, परंतु अनेकदा विधवा महिलांना अशा मंगल कार्यात सहभागी होण्यापासून वंचित ठेवले जाते. ही सामाजिक दरी मिटवण्यासाठी एकता महिला मंचने पुढाकार घेतला आहे. विधवा असणे हा कोणताही गुन्हा नाही, ती प्रथम एक स्त्री आहे हा विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

**कार्यक्रमाचे स्वरूप आणि नियोजन**

बार्शी तालुक्यातील ज्या गावांमध्ये हा उपक्रम राबवायचा आहे, त्या गावांसाठी मंचने काही नियमावली जाहीर केली आहे:

**एकत्रित सोहळा:**

गावात सुवासिनी आणि विधवा महिलांना एकाच व्यासपीठावर आणून जल्लोषात हळदी-कुंकू समारंभ पार पडेल.

**पूर्व नोंदणी अनिवार्य:**

कार्यक्रमाच्या उत्तम नियोजनासाठी गावातील प्रमुखांनी किंवा मंचच्या सदस्यांनी आपल्या गावाची नोंदणी करणे आवश्यक आहे.

**वेळेचे नियोजन:**

ज्या गावांची नावे आधी नोंदवली जातील, त्या गावांना तारीख आणि वेळेनुसार प्रथम प्राधान्य दिले जाणार आहे. आगाऊ नाव नोंदवल्याशिवाय कार्यक्रम निश्चित केला जाणार नाही.

**महिला सक्षमीकरणाची नवी दिशा**

या उपक्रमाबाबत बोलताना एकता महिला मंचच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, महिलांना समाजात सन्मानाचे स्थान मिळवून देणे ही काळाची गरज आहे. ही केवळ एक परंपरा नसून महिलांच्या आत्मसन्मानाची लढाई आहे. बार्शी तालुक्यातील जास्तीत जास्त गावांनी यात सहभागी होऊन परिवर्तनाचे साक्षीदार व्हावे.




# शिवप्रेमी चौकातील अतिक्रमण हटविण्याची मागणी

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि. १५ जानेवारी-**

शहरातील शिवप्रेमी चौकात उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य-दिव्य पुण्यस्मृती अश्वारूढ पुतळा परिसरात झालेल्या अतिक्रमणाबाबत सार्वजनिक शिवजयंती उत्सव मंडळ, मंगळवेढा यांच्या वतीने मंगळवेढा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांना लेखी निवेदन देण्यात आले आहे.

पुतळा परिसरालगत लोकगायक प्रल्हाद शिंदे यांच्या कमानीसमोर काही छोटे व्यावसायिक व टपरीधारकांनी अतिक्रमण केले आहे. त्यामुळे परिसरातील स्वच्छता, वाहतूक व्यवस्था तसेच एकूणच सौंदर्यावर विपरीत परिणाम होत आहे. अतिक्रमणामुळे रहदारीस अडथळा निर्माण होत असून अपघाताचीही शक्यता वाढली आहे. अतिक्रमण तात्काळ हटविण्यात यावे तसेच कमानी बरोबरच रस्ता होणेसाठी डिव्हायडर कट करावा आणि संबंधित व्यावसायिकांना नियमानुसार अन्यत्र पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी मंडळाच्या वतीने करण्यात आली आहे. प्रशासनाने याबाबत तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा शिवप्रेमी व नागरिकांनी व्यक्त केली आहे. निवदेन देण्यासाठी मंडळाचे पदाधिकारी सतिश दत्तु, भगवान चव्हाण, सुरज चव्हाण, अँड संभाजी घुले, अनिल मुदगल, विनायक कलुबर्मे, बाळासाहेब नागणे यावेळी उपस्थित होते.

# जिल्हा परिषद व पं.स.निवडणूक; बार्शी तहसीलमध्ये आढावा बैठक

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.१५ जानेवारी**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्या पार्श्वभूमीवर दि.१५ जानेवारी रोजी बार्शी तहसील कार्यालय येथे निवडणूक तयारीचा आढावा घेण्यासाठी महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीत जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक संदर्भात आदर्श आचारसंहिता, कायदा व सुव्यवस्था, किमान पायाभूत सुविधा, मतदान केंद्रांची तयारी तसेच इतर निवडणूकविषयक कामकाज यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या बैठकीस सर्व क्षेत्रीय अधिकारी तसेच पोलीस निरीक्षक बार्शी, ग्रामीण, पांगरी व वैराग उपस्थित होते. अमोलसिंह भोसले, निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या सूचनेनुसार सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा तहसीलदार एफ. आर. शेख यांनी सर्व संबंधित विभाग प्रमुखांना निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, शांततेत व नियमांचे काटेकोर पालन करुन राबविण्याच्या सूचना दिल्या. आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी, मतदान केंद्रांवर आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणे तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही यासाठी समन्वयाने काम करण्याचे निर्देश देण्यात आले. निवडणूक प्रक्रियेदरम्यान कोणतीही अडचण येऊ नये यासाठी सर्व विभागांनी सज्ज राहावे, असेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# १० बचत गटांना ६ लाखांच्या फिरत्या निधीचे वाटप



### मकर संक्रांतीनिमित्त घाणेगाव येथे महिला मेळावा संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग,दि.१५ जानेवारी-**

बार्शी तालुक्यातील घाणेगाव येथे मकर संक्रांतीचे औचित्य साधून महिलांचा भव्य मेळावा आणि सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न झाली. या कार्यक्रमात गावातील १० महिला बचत गटांना प्रत्येकी ६० हजार रुपयांप्रमाणे एकूण ६ लाख रुपयांच्या फिरत्या निधीचे वाटप करण्यात आले. योजनांची माहिती आणि मार्गदर्शन व कार्यक्रमाचे आयोजन मकर संक्रांतीच्या निमित्ताने करण्यात आले होते. यावेळी उपस्थित महिलांना हळदी-कुंकू लावून खाऊचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी 'एकता महिला मंच'चे प्रमुख प्रभाकर क्षीरसागर आणि सहाय्यक कृषी अधिकारी गाढवे यांनी महिलांना शासनाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. ग्राम संघाच्या माध्यमातून महिलांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम कसे व्हावे, यावर उपस्थित मान्यवरांनी मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी शरद पाटील, एकता महिला मंचचे प्रमुख प्रभाकर क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच ग्रामसखी कविता जाधव, भाग्यश्री शिंदे, राणी काटे, अर्चना कोळी, शर्मिला दाभाडे आणि कोषाध्यक्ष शुभांगी गोसावी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.

**महिलांचा उत्साही सहभाग**

कविता जाधव यांनी प्रभावीपणे सूत्रसंचालन केले. भाग्यश्री शिंदे यांनी कार्यक्रमाचा उद्देश आणि बचत गटांच्या कार्याचा आढावा प्रास्ताविकातून मांडला. राणी काटे यांनी उपस्थित मान्यवर आणि महिलांचे आभार मानले. आज दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी पार पडलेला हा कार्यक्रम अतिशय उत्साही वातावरणात संपन्न झाला. मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या महिलांनी या उपक्रमाचे स्वागत केले. गावातील सर्व क्षेत्रातील महिलांची उपस्थिती होती.

## निधन वृत्त...

### नवनाथ एडके



**बार्शी, दि. १५ जानेवारी-**

तालुक्यातील कळंबवाडी (आ.) येथील नवनाथ एकनाथ एडके (वय ८०) यांचे अल्पशा आजाराने बुधवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ, भावजय, ३ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर कळंबवाडी येथे बुधवारी रात्री अंत्यसंस्कार करण्यात आले. बार्शी नगरपरिषदेतील लिपिक सचिन पवार यांचे ते मामा होत.

### विश्वंभर शिरसट



**नरखेड, दि. १५ जानेवारी-**

पडसाळी तालुका उत्तर सोलापूर येथील विश्वंभर यादव सिरसट (८० ) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा असा परिवार आहे.

### अशोक कांबळे

**बार्शी, दि. १५ जानेवारी-**

राऊत चाळ येथील अशोक कांबळे (वय ७०) यांचे बुधवारी आजारपणामुळे निधन झाले. माजी नगरसेवक राहुल कांबळे यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. बुधवारी सायंकाळी मंगळवार पेठ येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# विद्यार्थ्यांनी घेतली न्यायालय, पोलिस व महसूलच्या कामकाजाची माहिती

### कुंभेजच्या विद्यार्थ्यांचा अभ्यास दौरा

### यशकल्याणीच्या सहकार्याने अभिनव उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि.१५ जानेवारी-**

कुंभेज (ता. करमाळा) येथील दिगंबरराव बागल माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी अभ्यास दौऱ्यातून न्यायालय, पोलीस मुख्यालय व तहसील कार्यालयातील कामकाजाची माहिती करून घेतली.




विद्यालय व यशकल्याणी सेवाभावी संस्थेच्या संयुक्त विद्यमाने येथे एक दिवसीय शैक्षणिक सहल व अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला होता. मुख्याध्यापक हनुमंत पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार उपक्रमशील शिक्षक पक्षीमित्र कल्याणराव साळुंके यांनी या अभ्यास दौऱ्याचे आयोजन केले. विद्यार्थ्यांनी करमाळा न्यायालय येथे न्यायदान कक्षात प्रत्यक्ष खटल्याचे कामकाज कसे चालते, पक्षकार , विधीज्ञ आणि न्यायाधीश यांची न्याय प्रक्रियेतील भूमिका याबाबत सविस्तर निरीक्षणे नोंदवली. महसुल विभागाचे प्रमुख, तालुका मुख्य कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार यांच्या अधिकार कक्षा, विविध विभाग, सामान्य नागरिकांप्रती प्रशासनाची बांधिलकी, गुन्हेगार व आरोपींचे कारागृह आदीबाबत माहिती घेतली. यावेळी विद्यार्थ्यांनी कारागृहाची प्रत्यक्ष पाहणी करत कैद्यांचे जीवन, सुधारगृहाची भूमिका व कायद्याचे महत्त्व समजून घेतले. तहसीलदार शिल्पा ठोकडे यांनी विद्यार्थाना मार्गदर्शन करताना शालेय वयातील आपले अनुभव सांगितले व लोकसेवेची आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेतून प्रशासकीय अधिकारी व्हावे असे आवाहनही केले. उपविभागीय पोलिस अधिकारी आयपीएस अधिकारी अंजना कृष्णा व्ही. एस. यांच्या कार्यालयास भेटी दरम्यान विद्यार्थ्यांनी त्यांच्याशी मनमोकळा संवाद साधला. अंजना कृष्णा यांनी विद्यार्थ्यांना आपली आवड ओळखून आपले क्षेत्र निवडा असा सल्ला दिला. कोणत्याही क्षेत्रात यशस्वी व्हा परंतू त्याआधी एक चांगला माणूस व्हा असा सल्ला त्यांनी आवर्जून दिला. पोलिस मुख्यालयात प्रा.गणेश करे-पाटील यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले. अशा प्रकारच्या नाविन्यपूर्ण विद्यार्थी अभ्यास दौऱ्यास प्रशासनाने केलेले सहकार्य प्रशंसनीय असून यशकल्याणी संस्था अशा उपक्रमांसाठी नेहमी पुढाकार घेऊन सहकार्य करेन असे आश्वासन दिले. मुख्याध्यापक हनुमंत पाटील यांनी आपल्या मनोगतातून हा उपक्रम विद्यार्थ्यांचे अनुभवविश्व समृद्ध करणारा असून यासाठी विद्यालयाची नेहमी सकारात्मक भूमिका असेन असे सांगितले. ए.पी.आय. व निर्भया पथक प्रमुख गिरिजा म्हस्के यांनी प्रशासन, कायदा व सुव्यवस्थेच्या विविध पैलूंविषयी मार्गदर्शन केले. पो.कॉ. मंगेश पवार यांनी पिस्तुल, राइफल,कार्बाइन आदी शस्त्रांबाबत माहिती दिली. या संपूर्ण अभ्यास दौऱ्यादरम्यान विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना अधिकाऱ्यांनी समर्पक उत्तरे देत शासकीय यंत्रणेची कार्यपद्धती स्पष्ट केली. अभ्यास दौऱ्यात सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना यशकल्याणी संस्थेच्या वतीने प्रा.गणेश करे पाटील यांचे हस्ते सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच प्रवासासाठी वातानुकूलित बस आणि अल्पोपहाराची व्यवस्थाही संस्थेकडून करण्यात आली होती. या अभ्यास दौऱ्यामुळे विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच प्रत्यक्ष अनुभव मिळाल्याने त्यांची प्रशासनविषयक समज अधिक व्यापक झाली. या अभ्यास दौऱ्याप्रसंगी आयपीएस अंजना कृष्णा व्ही. एस. तहसीलदार शिल्पा ठोकडे, एपीआय गिरिजा म्हस्के, बागल विद्यालयाचे मुख्याध्यापक हनुमंत पाटील, जीवन शिक्षण फाउंडेशनचे संचालक प्रा.जयेश पवार, पक्षीमित्र कल्याणराव साळुंके, निर्भया पथकचे पो कॉ. संभाजी पवार, पो.कॉ. मंगेश पवार,पो कॉ गणेश गुटाळ, पो कॉ. विद्या इंगोले सेवक संतोष घोरपडे, सेवक नंदकुमार कांबळे उपस्थित होते.

## दानात दान मतदान..!



✔ मतदानाची वेळ संपली प्रवेशद्वार बंद; काही मतदारांना जावे लागले परत.



✔ एका मतदान केंद्रावर गोंधळाची परिस्थिती झाली होती. पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांनी पथकासमवेत धाव घेत गर्दी पांगविली.



✔ शरदचंद्र पवार प्रशाला येथील मतदान केंद्रावर महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी भेट देऊन आवश्यक त्या सूचना दिल्या.



✔ मतदानाचा हक्क बजावताना रेवणसिध्द कोळी व परिवार



✔ मतदान हक्क बजावल्यानंतर आनंद व्यक्त करताना अश्विन डोईजोडे आणि परिवार



✔ श्रुती नंदिनी या अपंग मुलीने पहिल्यांदा बजावला मतदानाचा हक्क.



✔ प्रथमच मतदान..आनंद व्यक्त करताना युवक



✔ सोलापूरचे ग्रामदैवत शिवयोगी श्रीसिध्दरामेश्वर यात्रेच्या अनुषंगाने गुरुवारी शोभेचे दारुकाम करण्यात आले. यावेळी भक्तगणांनी अलोट गर्दी केली होती. (छाया-केवल तिवारी)

# मुलभूत गरजांचे आश्वासन; बहिष्कार मागे घेत मतदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ जानेवारी-**

राज्यातील २९ महानगरपालिकांसाठी गुरुवारी (१५ जानेवारी) मतदान पार पडलं. मतदारांनी आपला हक्क बजावावा असं आवाहन सर्वांकडून सातत्यानं करण्यात येत होतं. पण सोलापूरमध्ये एक वेगळाच प्रकार घडला आहे.



आपल्या मूलभूत प्रश्नांकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा राग मनात धरुन सोलापूरमधील प्रभाग क्रमांक २६ च्या तब्बल १५०० नागरिकांनी एकत्र येत मतदानावर पूर्णपणे बहिष्कार टाकला. ही वार्ता मनपा आयुक्त सचिन ओंबासे यांना समजताच सायंकाळी ४ च्या सुमारास उपायुक्त विणा पवार यांना पाठवून जनतेच्या समस्या जाणून घेतल्या आणि पवार यांनी त्या नागरिकांना मुलभूत गरजा पूर्तता लवकर करु, असे आश्वासन दिले. त्यांच्या शब्दाला मान देत नागरिकांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. सोलापूर महापालिकेच्या प्रभाग २६ मधील रुबीनगर जवळील गणेश बिल्डर, अमोलनगर, लोखंडवाला पार्क आदी ठिकाणच्या विविध समस्यांनी त्रस्त असलेल्या नागरिकांनी हा टोकाचा निर्णय घेतला होता.

महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांना ड्रेनेजलाईन, रूबीनगर ते पुनमनगर रस्ता व इतर काही मुलभूत गरजांची मागणी केली होती. तोंडी आणि निवेदनाद्वारे मागणी करूनही अधिकारी ऐकत नव्हते. कोरोनापासून अधिकारीच प्रशासन पाहत असल्याने माजी नगरसेवकांचेही काही चालत नव्हते. यामुळे संतापून या ठिकाणच्या नागरिकांनी मतदानच करायचे नाही, असा चंग बांधला होता. उपायुक्त वीणा पवार यांनी दिलेल्या आश्वासनामुळे या भागातील नागरिकांनी आयएमएस, कल्याणनगर आणि वसुंधरा येथील मतदान केंद्रांवर जावून आपला मतदानाचा हक्क बजावला.

## मतदारांची नावे गायब, दुसरेच करुन गेले मतदान

शहराच्या विविध प्रभागात अजूनही काही मतदारांची नावेच गायब झाल्याचे प्रकार आढळून आले. अनेकांच्या नावाने दुसरेच मतदान करुन गेल्याचाही प्रकार आढळून आला. काही भागात मतदानाची वेळ संपल्याने अनेक मतदारांना आल्या पावली माघारी जावे लागले. काही बुथवर सायंकाळी गर्दी झाल्याने रात्री उशिरापर्यंत त्याठिकाणी मतदान प्रक्रिया सुरु होती. मतदानाचा टक्का सरासरी ६० ते ६२ टक्केच्या घरात जाण्याची चर्चा राजकीय गोटातून सुरु होती.

## अनेक भागात फटाक्याची आतिषबाजी

सकाळच्या सत्रात प्रत्येक मतदान केंद्रावर गर्दीच नव्हती. दुपारच्या सत्रात काही ठिकाणी रांगा लागल्याचे दिसून आले. मतदान प्रक्रिया पार पडताच विजयाची खात्री बाळगून असलेल्या शहरातील अनेक भागातील उमेदवारांच्या समर्थकांनी फटाक्याची आतिषबाजी करत जल्लोष केला. असा प्रकार सळई मारुती मंदिर, रामलाल चौक, जुना विडी घरकुल, दाजी पेठ, दत्त नगर, घोंगडे वस्ती यांसह प्रभाग ८ मध्ये घडला.

## आज याठिकाणी होणार मतमोजणी

महापालिकेच्या २६ प्रभागातील १०२ जागांच्या निवडणुकीची मतमोजणी शुक्रवार, १६ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे. यात दयानंद कॉलेज, सिंहगड कॉलेज, शासकीय तंत्रनिकेतन, कुचन महाविद्यालय, मेहता महाविद्यालय, नूतन मराठी विद्यालय आणि एसआरपी कॅम्प याठिकाणचा समावेश आहे. मतमोजणीच्या ठिकाणी कडक पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

## चुरशीने मतदान, तगडी फाईट

आमदार देवेंद्र कोठे यांच्या शहर मध्य विधानसभा मतदारसंघात चुरशीने मतदान झाले. येथील काही उमेदवारात तगडी फाईट झाली. '७५ पार'चा नारा प्रत्यक्षात आणण्याच्या दृष्टीने पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यासह आ.विजय देशमुख, आ.सुभाष देशमुख, आ.देवेंद्र कोठे, आ.सचिन कल्याणशेट्टी, शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर आदींनी चांगलाच जोर लावल्याचे दिसून आले.

## पक्षसंघटनांनी लढविलेल्या जागा याप्रमाणे

सोलापूर महापालिकेच्या २६ प्रभागातील एकूण १०२ जागांसाठी निवडणूक झाली. 'भाजपा'ने सर्वच्या सर्व म्हणजे १०२ जागा लढविल्या. शिवसेना शिंदेगट ६१, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट ५४, काँग्रेस ४९, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट १२, शिवसेना उबाठा २१, एमआयएम २१, माकपा ९ जागा लढविल्या आहेत.

## नरोटे व भोसले गट समोरासमोर; दाखवले सामंजस्य

प्रभाग क्रमांक १५ मध्ये काँग्रेसचे चेतन नरोटे आणि भाजपचे उमेदवार विनोद भोसले यांचे गट मतदान झाल्यानंतर समोरासमोर आले. या दोन्ही गटाकडून फटाके उडवण्यात आले. यामुळे या परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पण फटाके उडवल्यानंतर दोन्ही गटांनी सामंजस्य दाखविले. त्यामुळे तणाव निवळला.



✔ एकमेकांच्या विरोधात लढलेले अमोल शिंदे व पद्माकर काळे यांनी एकत्र येत सुसंस्कृत राजकारणाचे दर्शन घडविले.



✔ आई प्रतिष्ठानचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह मतदानाचा हक्क बजाविल्यानंतर मतदानाची खूण दाखविताना मोहन डांगरे.



अविनाश महागांवकर प्रभाग क्रमांक १३ मध्ये लालबहादूर शास्त्री शाळेत सहकुटुंब मतदानाचा हक्क बजावला.




रविवार पेठ येथील एसव्हीसीएस हायस्कूलमधील महिला व्यवस्थापित केंद्र असलेला पिंक पोलिंग बूथ.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

## दानात दान मतदान..!



✔ जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद



✔ पोलिस आयुक्त एम.राजकुमार यांनी पत्नीसह बजावला मतदानाचा हक्क.



✔ महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी वसंत विहार येथील केंद्रात मतदान केले.



✔ अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांनी मतदान केंद्रास भेट देत सेल्फी पॉईंटमध्ये फोटो काढला.



✔ 'प्रिसिजन'चे यतिन शहा, डॉ.सुहासिनी शहा, करण शहा यांनी मतदानाचा हक्क बजावला.



✔ मतदानाचा हक्क बजाविल्यानंतर सुधीर खरटमल, हर्षल खरटमल, नेहा खरटमल.



✔ निवृत्त पोलीस अधिकारी शशिकांत तिवारी यांच्या मातोश्री कुसुम हिरालाल तिवारी या ९५ वर्षे वयाच्या मतदाराची मतदानाची सेवा करताना जुळे सोलापूर प्राधिकरण आघाडीचे उमेदवार डॉ.बसवराज बगले. शेजारी युनिक इंग्लिशचे प्राचार्या अंजली तिवारी.

# आज मतमोजणी
# अनेकांकडून देव पाण्यात

**२६ प्रभागातील १०२ जागांसाठी झाले मतदान**

**काही मतदान केंद्रांवर मतदान यंत्र बिघडल्याने व्यत्यय**

**मतदारांची नावे गायब; बोगस मतदानाच्या तक्रारी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ जानेवारी-**

सुमारे चार वर्षाच्या प्रशासकीय राजवटीनंतर अखेर गुरुवार, दि.१५ जानेवारी २०२६ रोजी सोलापूर महापालिकेच्या २६ प्रभागातील १०२ जागांसाठी चुरशीने मतदान पार पडले. ५६४ उमेदवारांचे राजकीय भवितव्य मतदान यंत्रात सीलबंद झाले. आज मतमोजणी होणार आहे. निकालाच्या धाकधुकीमुळे अनेकांकडून देव पाण्यात ठेवल्याचे सांगण्यात येते.

अनेक ठिकाणी मतदारांची नावे गायब झाली होती. काही मतदान केंद्रांवरील बीएलओकडे मतदार यादी नसल्याने काही जणांना मतदानापासून वंचित राहावे लागले. कुठे गोंधळाची स्थिती तर कुठे संवेदनशील वातावरण पाहायला मिळाले. गुरुवारी शहरातील ३५३ इमारतींमधील १०९१



मतदान केंद्रांवर सकाळी ७.३० ते सायंकाळी ५:३० यावेळेत मतदान प्रक्रिया पार पाडण्यात आली. शहरातील ९ लाख २४ हजार ७०६ मतदारांपैकी अनेक मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. सकाळी ९.३० वाजेपर्यंत केवळ ६.८६ टक्के इतके मतदान झाले होते. काही ठिकाणी मतदारांची नावे गायब तर काही ठिकाणी बोगस मतदान झाल्याच्या तक्रारी आल्या होत्या. ज्येष्ठ नागरिक, महिला आणि दिव्यांग मतदारांनी दुपारच्या उन्हाचा त्रास टाळण्यासाठी सकाळच्या सत्रातच मतदान करणे पसंद केले होते. महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, संदीप कारंजे, निवडणूक विभागाचे सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित आदींनी बारीक लक्ष ठेवून होते. पोलिस आयुक्त एम.राजकुमार, महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी पाहणी केली.

### आज होणार मतमोजणी

निवडणूक व्यवस्थापनाच्या दृष्टीने ७ निवडणूक निर्णय अधिकारीनिहाय ७ ठिकाणी शुक्रवार, दि.१६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजल्यापासून मतमोजणी प्रक्रियेस प्रारंभ होणार आहे. याठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे व आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यात आल्या आहे.

### संवेदनशील केंद्रांवर नजर

४६ मतदान केंद्रे संवेदनशील म्हणून घोषित करण्यात आली होती. या केंद्रांवर करडी नजर ठेवण्यात आले होते. कुठे गोंधळाचे वातावरण असल्याचे समजताच उपायुक्त विजय कबाडे यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांचा फौजफाटा दाखल होईल.

### आदर्श व पिंक मतदान केंद्र

प्रत्येक प्रभागात एक याप्रमाणे एकूण २६ मतदान केंद्रे 'आदर्श मतदान केंद्र' म्हणून विकसित होती. यामध्ये पर्यावरणपूरक हरित मतदान केंद्रे व महिला मतदान केंद्रांचा समावेश होता. एसव्हीसीएसमध्ये महिला व्यवस्थापित असे पिंक पोलिंग बूथ होते.

### मतदान केंद्रात मोबाईलला बंदी

निवडणूक आयोगाने मतदान केंद्राच्या शंभर मीटर अंतरावर मोबाईल व पर्सवर निर्बंध घातले होते. या निर्णयाची शहरातील सर्वच मतदान केंद्रावर काटेकोर अंमलबजावणी करण्यात आली. मतदान केंद्रावर नियुक्त सुरक्षा रक्षकांकडून मतदारांची तपासणी करण्यात येत होती.

### महिलांचा लक्षणीय सहभाग

सम्राट चौक, मिलिंद नगर, नीला नगर, रविवार पेठ,शेळगी, लोधी गल्ली आणि नई जिंदगी यासह विविध परिसरातील मतदान केंद्रांवर महिलांची मोठ्या प्रमाणात गर्दी दिसून आली. प्रथमच महिला कार्यकर्त्यांचा लक्षणीय सहभाग दिसला.

### खासगी वाहनांचा वापर

वाहतूक अडथळा होत असल्याने पोलिसांनी मतदारांना १०० मीटरच्या बाहेर वाहने लावण्यास भाग पाडले. मतदारांना आणण्यासाठी कार्यकर्ते धावपळ करत होते. मतदारांना ने-आण करण्यासाठी खासगी वाहनांचा सर्रास वापर करण्यात आला.

### स्लीपा वाटप न झाल्याने गैरसोय

सर्वपक्षीय उमेदवारांकडून अनेक मतदारांपर्यंत स्लिपा पोहोचल्याच नाहीत. काही ठिकाणी बीएलओ यांनी स्लीपा वाटप केल्या नाहीत. काही ठिकाणी मतदार यादी उपलब्ध नव्हती. कोणत्या बूथवर नाव आहे? शोधून दुसऱ्या बूथवर जावे लागले. यामुळे गैरसोय झाली.

### ३४९४ बॅलेट युनिटस्, १३६५ कंट्रोल युनिट

मतदान प्रक्रिया अंतर्गत ३ हजार ४९४ बॅलेट युनिटस् आणि १ हजार ३६५ कंट्रोल युनिटस् उपलब्ध होते. गरजेनुसार १ हजार २५० स्टेशनरी किटस्, २ हजार ५०० बॅलेट युनिट कव्हर कंपार्टमेंटस्चा वापर करण्यात आला.

### प्रत्येक केंद्रावर सहा कर्मचारी

प्रत्येक मतदान केंद्रावर एक केंद्राध्यक्ष, तीन पोलिंग ऑफिसर, एक शिपाई व एक पोलीस कर्मचारी असे एकूण सहा कर्मचारी होते. महापालिकेच्या वतीने प्रत्येक केंद्रांवर वैद्यकीय पथक तैनात होते. आयोगाच्या निर्देशानुसार जबाबदारी पार पडली.

### २ हजार ७४१ पोलिस होते तैनात

मतदान प्रक्रिया शांततेत पार पाडण्याकामी, कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने एकूण २ हजार ७४१ पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. यामध्ये १५१ पोलिस अधिकारी, १६८० पोलिस हवालदारचा समावेश आहे. तसेच एसआरपीएफच्या २ कंपन्या यांचा समावेश होता.

# मतदारांपेक्षा कार्यकर्त्यांचीच गर्दी

**वयोवृध्द मतदारांना रिक्षातून ने-आण**

**मतदानाचा टक्का घसरल्याची चर्चा**




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिकेच्या २६ प्रभागातील १०२ जागांसाठी जाहीर झालेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार गुरुवार, १५ जानेवारी २०२५ रोजी शहरातील विविध केंद्रांवर मतदान प्रक्रिया पार पडले. मात्र, अनेक मतदान केंद्रांवर मतदारांपेक्षा कार्यकर्त्यांचीच गर्दी होती. मतदानाचा टक्का घटल्याची चर्चा सुरु होती.

सोलापूर महानगरपालिका सर्वत्रिक पंचवार्षिक निवडणूक २०२७ निवडणुकीचे मतदान गुरुवारी सकाळी ७:३० वाजल्यापासून शहरातील विविध मतदान केंद्रांवर पार पाडले गेले. दुपारपर्यंत विविध मतदान केंद्रांवर मतदारांची म्हणावी तशी गर्दी नव्हती. दुपारी दीड वाजेपर्यंत मतदानाचा टक्का ३३ टक्के इतकाच राहिला होता. शहरातील प्रमुख, संवेदनशील, हद्दवाढ आणि जुळे सोलापूर येथील मतदान केंद्रांमध्ये मतदारांची संख्या कमी तर केंद्रांबाहेर कार्यकर्त्यांची गर्दी दिसून आली. मतदान केंद्रांत मतदारांसह मतदान प्रतिनिधी आणि त्यांचे इतर कार्यकर्त्यांची वर्दळ होती. वयोवृध्द मतदारांना रिक्षातून ने-आण करण्यासाठी कार्यकर्ते झटत होते. अनेक मतदान केंद्रांमधील इव्हीएम मशीनमध्ये बिघाड झाल्याने त्या दुरुस्त करण्यात वेळ जात होता. त्यामुळे मतदारांना ताटकळत उभे राहावे लागले. त्यामुळे मतदारांसह उमेदवार चांगलेच वैतागले होते. चिन्ह आणि मशीनवरील बटन यामध्ये मतदारांना संभ्रम निर्माण झाली होती. दरम्यान, दुपारनंतर मतदार मतदानासाठी घराबाहेर पडत होते.

### ना धावपळ, ना 'शोक'; उमेदवाराचा 'मोबाईल'ला 'कल'

पूर्वभागातील एका प्रभागातील एक अपक्ष उमेदवार दोन दिवसांपुर्वी रिंगणातून बाहेर पडत 'महाविकास आघाडी'च्या उमेदवाराला पाठिंबा दर्शविला. त्यामुळे मतदानाच्या दिवशी मतदारांना केंद्रांवर आणण्याकामी धावपळ करावी लागली नाही. आपल्या पारड्यात कमी मते पडली; याविषयी 'शोक' व्यक्त करण्याचे सोडून 'मोबाईल' पाहण्याकडे त्यांचा 'कल' होता.



### क्रॉस व्होटिंग मोठ्या प्रमाणावर

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभागांमध्ये पहिल्या टप्प्यातील मतदान अत्यंत कमी प्रमाणात होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. अनेक प्रभागांमध्ये क्रॉस व्होटिंग मोठ्या प्रमाणावर झाल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. एकूणच परिस्थितीचा विचार करता, यावेळी धक्कादायक निकाल लागण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

### निकालाबाबत उत्सुकता शिगेला

सर्वेक्षणांनुसार भारतीय जनता पक्ष पहिल्या क्रमांकाचा पक्ष म्हणून आघाडीवर असल्याचे चित्र समोर येत आहे. मात्र दुसऱ्या क्रमांकावर कोणता पक्ष येईल? याबाबत सध्या स्पष्टता नसून मोठी अनिश्चितता निर्माण झाली आहे. मतदारांचा कल नेमका कुठल्या दिशेने जाणार? हे सांगणे कठीण झाले आहे. निकालाबाबत उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

### मतदारांना पैशांचे प्रलोभन, गोंधळ

प्रभाग क्रमांक २२ मध्ये एका उमेदवाराकडून पैशांचे प्रलोभन दाखविण्यात येत असल्याचे कळताच विरोधी गटाचे उमेदवारांनी पैसे वाटणाऱ्या 'त्या' इसमाला रंगेहाथ पकडले. प्रभाग क्रमांक १४ मध्येही पैसे वाटप करण्याच्या घटना घडल्या. मतदानाच्या एक दिवस आधी, मतदानाच्या दिवशी पैशांचे प्रलोभन अन् गोंधळ असा प्रकार पहावयास मिळाला.

### अधिकाऱ्याच्या विरोधात महिला मतदाराची तक्रार

प्रभाग क्रमांक १० मधील रचभरे उर्दू हायस्कूल येथील एका मतदान केंद्रावर एक महिला मतदान करताना मशीनचा आवाज येत नसल्याचे तेथील अधिकाऱ्यांच्या कानावर घातले. तेव्हा 'त्या' अधिकाऱ्याने सदर महिला मतदाराच्या पसंतीऐवजी स्वतःच्या पसंतीनुसार बटन दाबले. त्यामुळे चिडलेल्या त्या महिलेने एका अपक्ष उमेदवाराकडे तक्रार केली. दरम्यान, या प्रभागातील अन्य अपक्ष उमेदवार तेथे धाव घेत 'त्या' अधिकाऱ्याला धारेवर धरले.

## दानात दान मतदान..!



✔ माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी मतदान केल्यानंतर अशी पोज दिली.



✔ खा.प्रणिती शिंदेंनी बजावला मतदानाचा हक्क.



✔ आ.सुभाष देशमुख व कुटुंब मतदान करताना.



✔ आ.विजयकुमार देशमुख बजावला हक्क.



✔ आ. देवेंद्र कोठे, व सौ.मोनिका कोठे यांनी बजावला मतदानाचा हक्क.



✔ राष्ट्रवादीचे आनंद चंदनशिवे मतदान करताना.



✔ भाजपा प्रदेश नेत्या मोहिनी पत्की,शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, सरचिटणीस सुधा अळ्ळीमोरे यांनी मतदानाचा हक्क बजावला.



✔ बाळे येथे भाजप उमेदवार मंदाकिनी तोडकरी यांच्यासोबत सेल्फी घेताना महिला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी १३२८

**विष्णुदास आम्ही न भ्यों कळिकाळा ।**
**भुलों मृगजळा न घडे तें ॥**

खरोखरच ज्याचे अस्तित्व नाही, त्याचे अस्तित्व मानणे म्हणजे वेडेपणाच होय. पण हा वेडेपणा जवळपास सर्वच लोक मी च्या बाबतीत करीत असतात. मूळात मी म्हणजे काय? हे समजले नसले तरीही या नाशवंत देहाला मी म्हणून माणूस माया, मोहाच्या पूर्ततेसाठी आयुष्यभर धावत असतो. मी चे अस्तित्व देहाच्या ठिकाणी मानणारा माणूस पावला पावलाला भितही असतो. माझे फलाणे काम झाले नाही तर, असे झाले तर, तसे झाले तर असा विविध प्रकारचा भित्रा विचार माणसाच्या मनात चालू असतो. हे सर्व मी मुळे घडत असते. मी ची जोपासणूक करायची म्हटली की कळत न कळत ईर्षा, द्वेष, मत्सर, अहंकार, काम, क्रोध आदिंना स्थान द्यावेच लागते. यांचे स्थान आपोआप भितीला आमंत्रित करते. नाशवंत देहाला मी म्हणणाऱ्याला मृत्यूचेही भय वाटू लागते. हे सर्व संसारात अडकलेल्या जीवाच्या बाबतीत घडते. पण जो वैष्णव आहे, त्याला मी म्हणजे नेमके काय? हे समजल्याने तो नाशवंत देहाला चांगले ओळखू लागतो.



त्याला मीची खरी जाणीव झाल्याने मृगजलवत् प्रपंचास तो भुलत नाही आणि कळिकाळाला तर अजिबातच भित नाही. हे सांगतांना तुकाराम महाराज म्हणतात,

**विष्णुदास आम्ही न भ्यों कळिकाळा ।**
**भुलो मृगजळा न घडे तें ॥**

विष्णुदास म्हणजे तुमच्या आमच्यापैकीच कोणी तरी आहे. जो माया, मोह, काम, क्रोध, ईर्षा, द्वेष, अहंकार, मीपणा आदिला स्थान देत नाही तो विष्णुदास होय, हा विष्णुदास सर्व जीवात सम त्व पाहातो. त्याला आप-पर असा भेद नसतो. ज्याला आप-पर, सुख-दुःख यातील फरकच जाणवत नाही. त्याला कशाचीही भिती, कशाचाही मोह वाटण्याचे कारणच नाही. संसारात अडकलेला जीव प्रत्येक गोष्टीत, घटनेत मी-मी म्हणत राहतो. त्यामुळे सातत्याने त्याला सुख-दुःखाला सामोरे जावे लागते. मी मुळे इच्छा, अपेक्षा सातत्याने वाढत जातात. इच्छा, अपेक्षांची पूर्ती करण्यासाठी नको ते करावे लागते. हे नको ते करणे दुःखाला आमंत्रण दिल्याशिवाय राहत नाही. या सर्व गोष्टीला आपली मानसिकता, आपला स्वभाव म्हणजे आपणच कारणीभूत असतो. कपाळाला गंध, अंगावर विशिष्ट वस्त्र, गळ्यात माळ, मुखात नाम असणारा म्हणजेच वैष्णव होय, असे नाही. तर ज्याचे वर्तन समत्व जोपासणारे व अहंकार ,स्वार्थरहीत असते, तो वैष्णव होय. ज्याला समत्व जोपासता येत नाही तसेच मीतून बाहेर पडता येत नाही, त्याने गळ्यात कितीही माळा घातल्या, ओरडून भगवंताचे नामस्मरण केले, भगवी वस्त्र धारण केली तरी तो वैष्णव होऊ शकत नाही. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : शुक्रवार,**
**दि. १६ जानेवारी २०२६**
**विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७**
**संवत्सर - विश्वावसु**
**मास - पौष. द्वादशी**
**ऋतु - हेमंत ।**
**नक्षत्र- मूळ (अहोरात्र)**
**योग - ध्रुव (२१.०५)**
**करण - गरज (०९.२१)**
**राहू काल : गुरुवार**
**सकाळी १०.३० ते दुपारी १२**
**दिनविशेष :**
**१६६०: रुस्तुम झमान आणि फाजल खान हे आदिलशहाचे सेनापती शिवाजी महाराजांवर चालुन आले आणि पराभूत होऊन परत गेले.**
*** १६६६: नेताजी पालकर वेळेवर न आल्याने पन्हाळगड जिंकण्याचा शिवाजीराजांचा डाव फसला.**
*** १६८१: छत्रपती संभाजी राजे यांचा छत्रपती म्हणून राज्याभिषेक झाला.**
*** १९०५: लॉर्ड कर्झनने बंगालची फाळणी केली, तेव्हा वायभंगाच्या चळवळीत देशभक्तानी वंदे मातरम् चा जल्लोष केला.**
*** १९२०: अमेरिकेचे अध्यक्ष वूड्रो विल्सन यांच्या १४ कलमी कार्यक्रमानुसार स्थापन झालेल्या राष्ट्रसंघाची पहिली बैठक झाली.**

# शिवस्मारकतर्फे आयोजित भजन स्पर्धेत उपासना भजनी मंडळ प्रथम



### कुलकर्णीस संवादिनी, गजानन पुजारीस तबला वादकाचे पारितोषिक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १५ जानेवारी-**

श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मंडळ शिवस्मारकतर्फे शिवस्मारक सभागृहात झालेल्या भजन स्पर्धेत उपासना, विठाई आणि रेणुका भजनी मंडळाने बाजी मारली. या स्पर्धेचे पारितोषिक वितरण ह.भ.प. सुधाकर महाराज इंगळे यांच्या हस्ते झाले.

याप्रसंगी स्पर्धेचे परीक्षक भारतरत्न भीमसेन जोशी यांचे सुपुत्र आनंद जोशी, शुभांगी जोशी, शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर, कोषाध्यक्ष धनंजय कुलकर्णी उपस्थित होते.या स्पर्धेतील प्रथम विजेत्या संघास सात हजार रुपये, द्वितीय विजेत्या संघास पाच हजार रुपये तर तृतीय विजेत्या संघास तीन हजार रुपये स्मृतीचिन्ह आणि प्रम

### स्पर्धेतील प्रथम तीन, दोन उत्तेजनार्थ

उपासना भजनी मंडळ, विठाई भजनी मंडळ, रेणुका भजनी मंडळ. संत गोरोबा काका मंडळ, पाणीवेस भजनी मंडळ. वादक : सुनिल कुलकर्णी (संवादिनी), गजानन पुजारी (तबला).

ाणपत्र देण्यात आले. तसेच प्रत्येक सहभागी भजनी मंडळास प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह आणि दीड रुपये मानधन देण्यात आले. याप्रसंगी शिवस्मारकचे कोषाध्यक्ष धनंजय कुलकर्णी, संचालक प्रा. देवानंद चिलवंत, प्रसाद जिरांकलगीकर, व्यवस्थापक म ल्लिनाथ व्हटकर आदी उपस्थित होते. शिवस्मारकचे सचिव गंगाधर गवसने यांनी सूत्रसंचालन केले. अध्यक्ष रंगनाथ बंकापूर यांनी प्रास्ताविक केले. स्पर्धा प्रमुख धनंजय कुलकर्णी यांनी आभार प्रदर्शन केले.

# सिध्देश्वर मॉन्टेसरी स्कूलचा स्नेहसंमेलन उत्साहात



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १५ जानेवारी-**

श्री सिद्धेश्वर मॉन्टेसरी स्कूलचा स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ हुतात्मा स्मृती मंदिर येथे पार पडला.

वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स सायन्सचे प्राचार्य संतोष कोटी, सिद्धेश्वर देवस्थान शिक्षण समितीचे सदस्य रेवणमिद्ध पाटील, डॉ. राजशेखर येळीकर, श्री सिद्धेश्वर देवस्थान शिक्षण समितीचे पालक सदस्य विलास कारभारी, प्रभुराज मैंदर्गीकर, पशुपतीनाथ माशाळ, पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष बमनिंग बुक्का यांच्या प्रमुख उपस्थितीत याचे उद्घाटन झाले.

अचिंत्य बोरामणीकर व निशिगंधा पवाडे यांची आदर्श विद्यार्थी म्हणून निवड करण्यात आली. ग्रामदैवत श्री सिद्धेश्वरांच्या व संस्थेचे आधारवड कर्मयोगी अप्पासाहेब काडादी यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. मुख्याध्यापिका उमा बागलकोटी यांनी मान्यवरांचे स्वागत केले. साक्षी बुद्दनवार या विद्यार्थीनीने मान्यवरांचा परिचय करून दिला. बक्षीस पात्र विद्यार्थ्यांचे यादी वाचन आरती ठाकूर यांनी केले. शौर्य झेंडेकर आणि स्पृहा पवाडे यांनी शालेय अहवाल सादर केला. निशिगंधा पवाडे हिने आभार मानले.

# ऑनलाइन योगा आणि ऑफलाइन आरी वर्कशॉप २० जानेवारीपासून

### श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशनचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ जानेवारी-**

समस्त पद्मशाली समाजाचे कुलदैवत चिरंजीव महर्षी श्री मार्कंडेय जन्मोत्सवाचे औचित्य साधून श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशनच्या वतीने महिलांसाठी मोफत ऑनलाइन व ऑफलाइन उपक्रमांचे आयोजन केल्याची माहिती फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष गौरीशंकर कोंडा यांनी दिली.

स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देण्याऱ्या महिलांसाठी २० ते २४ जानेवारीपर्यंत पाच दिवस दररोज सकाळी ८ ते ८.४५ यावेळेत घरबसल्या मोफत ऑनलाइन योगा शिकवणार आहेत. उत्कर्षा वेंकटरमण कुचन. या मार्गदर्शन करणार आहेत. ऑनलाइन योगामध्ये महिलांना सर्वरोग निवारणासाठी सूर्यनमस्कार, महिलांच्या मासिक पाळीमध्ये आजार, आणि उच्च रक्तदाब, मधुमेह, मायग्रेन, स्पोंडिलायसेस अश्या सर्व आजारांवर मात करण्यासाठी आसने व प्राणायम शिकवतील. ऑनलाइन सहभागी होण्यासाठी फक्त महिलांनी ९०१४५९५९३९ या क्रमांकावर संपर्क करावेत. २६ जानेवारी ते १० फेब्रुवारीपर्यंत हे वर्कशॉप असणार आहे. आरी वर्क प्रशिक्षण वेलकम फाउंडेशनचे संचालिका उमा बिल्ला यांच्या मार्गदर्शनाखाली अशोक चौक परिसरातील श्री गणेश मंदिर जवळ, साईबाबा चौक येथे होईल. यासाठी ७३०४३५७२२५ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# प्रत्येकाने धार्मिक, सहिष्णूता पाळल्यास जगात शांतता नांदेल

### प्रा.डॉ. येळेगावकर यांचे प्रतिपादन

### दयानंद महाविद्यालयात युवक दिनानिमित्त प्रबोधन शिबिर संपन्न



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ जानेवारी-**

स्वामी विवेकानंद हे विश्व संस्कृतीचे उपासक होते. त्यांनी माणूस घडवणाऱ्या धर्माचा व चारित्र्य निर्माण करणाऱ्या शिक्षणाचा पुरस्कार केला. त्यांनी राष्ट्राला दैवत मानून तरुणांना शिवभावे, जीवसेवा करण्याचे आवाहन केले. प्रत्येक माणसात परमेश्वर असतो. प्रत्येकाने धार्मिक, सहिष्णूता पाळल्यास जगात शांतता नांदेल अशी आशा व्यक्त केली होती असे प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी सांगितले.

ते फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा व दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, एन.एस.एस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय युवा दिन- स्वामी विवेकानंद जयंती, राजमाता जिजाऊ जयंती व हुतात्मा दिनानिमित्त आयोजित प्रबोधन शिबिरात ते राष्ट्र संजीवक स्वामी विवेकानंद, मार्शल लॉ या विषयवार मार्गदर्शन करताना बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.बी. एच.दामजी हे होते. यावेळी व्यासपीठावर एफ.पी.ए.आय. सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा.डॉ.एन.बी.तेली, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, दयानंद महाविद्यालय, एन.एस. एस. विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुचित्रा पाटणकर, प्रा. डॉ. सुनीता गाजरे, प्रा. डॉ. साखरे मॅडम, डॉ. राजशेखर शिंदे, प्रा. डॉ. महेश साखरे, प्रा. बेरूणगीकर आदी उपस्थित होते.

प्रा. डॉ. नभा काकडे म्हणाल्या, राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या सुसंस्कारातून छत्रपती शिवाजी महाराज घडले. त्यांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करण्यास प्रेरणा दिली. प्रत्येक स्त्रीने निर्भय होऊन संस्कारक्षम पिढी घडविल्यास बलशाली राष्ट्र निर्माण होऊ शकते. दयानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.एच.दामजी यांनी अध्यक्षीय समारोप केला. मान्यवरांचा परिचय प्रा. डॉ. महेश साखरे यांनी केला. सूत्रसंचालन प्रा. डॉ. दीपाली कसबे यांनी केले. स्वागत प्रा. डॉ. एन. बी. तेली यांनी केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. सुचित्रा पाटणकर यांनी केले. सुगतरत्न गायकवाड यांनी आभार मानले.

# शासकीय रेखाकला परीक्षांमध्ये उमाबाई श्राविकाचे घवघवीत यश



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ जानेवारी -**

सप्टेंबर २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या एलिमेंट्री /इंटरमीडिएट ड्रॉइंग ग्रेड परीक्षा मध्ये उमाबाई श्राविकेने घवघवीत यश संपादन केले.

यामध्ये प्रशालेतील एकूण ७० विद्यार्थ्यांनी एलिमेंट्री ड्रॉईंग ग्रेड परीक्षेत सहभाग घेतला होता त्यामध्ये ग्रेड =१४, इ ग्रेड =३९ उ ग्रेड =१७ तर इंटरमिजिएट ड्रॉइंग परीक्षा मध्ये ४३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता त्यामध्ये ग्रेड =१६, इ ग्रेड =१६, उ ग्रेड =११ याप्रमाणे विद्यार्थ्यांनी यश संपादन केले या परीक्षेसाठी प्रशालेचे कलाशिक्षक प्रवीण कंदले यांनी मार्गदर्शन केले

संस्थेचे सचिव यतीन शहा, विश्वस्त अंजली शहा, देवई शहा, करण शहा व मार्गदर्शिका दीप्ती शहा तसेच प्रशालेचे मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे, उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले

# सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षकास अटकपूर्व जामीन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १५ जानेवारी-**

''लग्नात मेव्हण्यावर 'फायटर'ने हल्ला केलेल्या सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षकास अटकपूर्व जामीन मंजूर'' झाला असल्याची माहिती वकील ॲड. रियाज एन. शेख यांनी दिली.

फिर्यादी हुसेन हजरत पटेल वय ३२, शेतकरी, आचेगाव यांनी दिनांक १३ डिसेंबर २०२५ रोजी अक्कलकोट नॉर्थ पोलीस स्टेशन येथे फिर्याद नोंदवली. फिर्यादीनुसार, दिनांक १२ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी सुमारे ३ वाजता ते अक्कलकोट येथील कोहिनूर मंगल कार्यालयाजवळ मित्रांसोबत मोटारसायकलवर जात असताना, एका चॉकलेटी रंगाच्या कारमधील व्यक्तीने (नंतर आरोपी ओळखले गेले) जाणीवपूर्वक दोनदा कार फिर्यादीच्या अंगावर घालण्याचा प्रयत्न केला. नंतर त्या व्यक्तीने (आरोपी) फिर्यादीला शिवीगाळ करून, ''तू लग्नाला का आलास?'' असे म्हणत लाथा-बुक्के मारले आणि फायटर नावाचे हत्यार काढून फिर्यादीच्या डोक्यावर मारल्याने ते गंभीर जखमी झाले.



आरोपीने फिर्यादीला धमकावून नंतर ठिकाणाठिकाणी पळ काढला. फिर्यादीला प्रथम अक्कलकोट आणि नंतर सोलापूर येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले व १३ डिसेंबर रोजी त्यांना डिस्चार्ज देण्यात आले. त्यानंतर त्यांनी पोलिसांकडे फिर्याद केली. पोलिसांनी आरोपी सिजाउद्दीन निजामुद्दीन आबादीराजे (सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.आरोपी सिजाउद्दीन निजामुद्दीन आबादीराजे यांनी अटकपूर्व जामीन मिळण्यासाठी सोलापूर सत्र न्यायालयात अर्ज दाखल केला होता. सत्र न्यायाधीश सुरज व्ही. केंद्रे यांच्या समोर झालेल्या सुनावणीत फिर्यादीच्या वतीने विरोधातील युक्तिवाद मांडण्यात आला व मारहाणीचे फोटो/व्हिडिओ फुटेज, प्रतिज्ञापत्र इत्यादी कागदपत्रे सादर करण्यात आली. सदर खटल्यात आरोपी पक्षाचे प्रतिनिधित्व ॲड. रियाज एन. शेख यांनी केले तर सरकार पक्षाचे प्रतिनिधित्व दुलंगे लोक अभियोक्ता यांनी केले.

# फसवणूक केल्याप्रकरणी हुंडेकरींना अंतरिम अटकपूर्व जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ जानेवारी-**

नई जिंदगी परिसरातील कस्तुरबा नगर मधील बगीचा करिता आरक्षित असलेली जागा विकत घेऊन सदर आरक्षित असलेल्या जागेचा कच्चा नकाशा तयार करून त्यामध्ये प्लॉटिंग पाडून सदर प्लॉट विक्री करून फसवणूक केल्याप्रकरणी सदर बाजार पोलीस स्टेशन येथे दाखल झालेल्या गुन्ह्यामध्ये माजी नगरसेवक रियाज हुंडेकरी यांना येथील सत्र न्यायाधीश मनोज एस शर्मा यानी अंतरिम अटकपूर्व जामीन मंजूर केला.



शहरातील कॉंग्रेस नेते व सध्या महानगरपालिकेच्या निवडणुकीत प्रभाग क्रमाक २१-ब मधून महाविकासः आघाडीचे उमेदवार असलेले माजी नगरसेवक रियाज अहमद इब्राहिम हुडेकरी यांच्या विरुद्ध सदर बाजार पोलीस स्टेशन येथे १० जानेवारी २०२६ रोजी गुन्हा दाखल झालेला होता.

सदर गुन्हा दाखल झाल्यानंतर रियाज हुंडेकरी यांनी अटकपूर्व जामीन मिळण्याकरिता ॲड. रियाज एन शेख यांच्या वतीने सोलापूर येथील सत्र न्यायालयामध्ये जामीन अर्ज दाखल केला होता. सदर जामीन अर्जाची सुनावणी सोलापूर येथील प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मनोज एस शर्मा साहेब यांच्या कोर्टात झाली.

सदर अंतरिम जामीन अर्जाच्या सुनावणीस ॲड. रियाज एन शेख यांनी युक्तिवाद केला की, रियाज हुंडेकरी यानी सदरची जागा सन २०११ साली बल्ला कुटुंबीयाकडून घेतली व त्यानंतर सदर जागेमध्ये प्लॉट टाकून विक्री केले, फिर्यादीमध्ये नमूद महिला आस्मा मुलतान शेख हिने सन २०१३ साली रियाज हुंडेकरी याच्याकडून सदरचा प्लॉट नांदणीकृत दस्ता अन्वय खरेदी केला व त्यानंतर सदर प्लॉट जागेवर पत्र्याचे कंपाउंड मुद्धा मारले.

सदर कस्तुरबा नगर येथील जागेचा अतिम लेआउटच मजूर झालेला नाही त्यामुळे सदरची जागा ही बगीचा करिता आरक्षित असल्याची कोणतीही अंतिम मजुरी नाही. रियाज हुडेकरी याच्याकडून प्लॉट घेतल्यानंतर व सदर प्लॉट जागेचा कब्जा घेतल्यानंतर सन २०२२ मध्ये जेव्हा आसमा सुलतान शेख याचे कुलमुखत्यार धारक सोलापूरला आले असता सदर प्लॉट जागेवर काही लोकांनी पत्र्याचे कंपाउंड मारून अतिक्रमण केल्याचे दिसले. यानंतर आसमा सुलतान शेख यानी सदर जागेचे खुला कब्जा मिळण्याकरिता सोलापूर येथील दिवाणी न्यायालयामध्ये दिवाणी दावा देखील सन २०२३ साली दाखल केला. वास्तविक पाहता फिर्यादी इस्माईल अलिसाब नाईकवाडी याच्यासोबत रियाज हुंडेकरी यानी कोणताही करार अथवा व्यवहार केलेलाच नाही तसेच जो प्लॉट सन २०१३ साली विक्री केला त्या प्लॉटच्या बाबतीत १० वर्ष उलटून सुद्धा कोणतीही तक्रार न करता ऐन निवडणुकीच्या तोंडावर राजकीय सूडबुद्धीने प्रेरित होऊन खोटा गुन्हा दाखल केल्याचा युक्तिवाद केला. तसेच सदर प्रकरणामधील महिला आसमा सुलतान शेख हिव्या नावानेच सातबारा उतारा, टॅक्स पावती, सहा डःचा उतारा असे सर्व कागदपत्रे आहेत तसेच नगररचना कार्यालयाने दिलेले पत्रावरून सदरचा लेआउट हा अंतिम मान्यता दिला नसल्याचे दिसून येत आहे हा गुन्हा पूर्णतः खोटा व राजकीय सूडबुद्धीतून दाखल करण्यात आलेला आहे. रियाज हुडेकरी यानी कोणत्याही प्रकारे चुकीचे कागदपत्र बनविले किवा कोणाचीही फसवणूक केलेली नाही. २०१३ सालों केलेली विक्री ही पूर्णपणे नोंदणीकृत व पारदर्शी होती. रियाज हुडेकरी यानी फिर्यादीशी कोणताही थेट व्यवहार नाही. फिर्यादीने २०२४ मध्ये तिसऱ्या व्यक्तीकडून जमिनीचा करार केला व २०२५ मध्ये तिचे कुलमुखत्यारपत्र घेतले, परंतु २०२६ मध्ये रियाज हुडेकरी विरुद्ध गुन्हा दाखल केला. हा मोठा उशीर व निवडणुकीचा स्पष्ट साधा हे खटल्यातील राजकीय हेतू सिद्ध करतो, सदरचा युक्तिवाद ग्राह्य धरून सत्र न्यायाधीश यानी रियाज हुंडेकरी याना अंतरीम अटकपूर्व जामीन मंजूर केला.

सत्र न्यायाधीश यांनी रियाज हुंडेकरी यांना रक्कम रुपये ५० हजाराच्या जामीन कदब्यावर तसेच पोलीस स्टेशनला हजेरी देण्याच्या व तपास कामी सहकार्य करण्याच्या अटीवर अंतरिम अटकपूर्व जामीन मंजूर केला.

### 'वर्ल्ड ऑफ वूमेन' च्या वतीने गड्डा यात्रेत फूड स्टॉल

**सोलापूर, दि. १५ जानेवारी-**

वर्ल्ड ऑफ वूमेन या महिला संस्थाच्यावतीने श्री सिद्धेश्वर गड्डा यात्रेमध्ये महिलामार्फत चालविल्या जाणाऱ्या फूड स्टॉलचे उदघाटन खासदार प्रणिती शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. संस्थेच्या अध्यक्ष विद्या लोलगे यांच्या प्रेरणेतून हा स्टॉल सुरु करण्यात आला आहे.

या फूड स्टॉलमध्ये स्वच्छ, ताजे व खमंग, रुचकर खाद्यपदार्थ भाविकाना वाजवी दरात पुरविले जाणार आहेत. तरी गड्डा यात्रेमध्ये येणाऱ्या भाविक भक्तानी गाळा नं. ११ला भेट द्यावी असे आवाहन करण्यात आले. मार्था आसादे, प्रिया कुलकर्णी, सावित्री शिवशरण, गीता मुळे, रेश्मा शेख, कृतिका हुंगुण्ड, साधना भापकर, मनीषा नलावडे, सुनंदा साळुंखे, शोभा गायकवाड, कांचन चौगुले, सारिका लमकाने, स्वाती मुकणार, शबाना शेख, सायरा शेख, लता ढेरे, शारदा मसुदी, उमा चिपन्हाट्टी, ऋतुजा काटकर या महिला याचे संयोजन करीत आहेत.

# अवैध दारू विक्रेत्यांवर धाड; लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ जानेवारी-**

शहरात अवैध मद्य निर्मिती, विक्री आणि वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध गुन्हे शाखेने विशेष मोहीमेत पोलीस आयुक्त एम. राज कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेने गेल्या काही दिवसांत चार वेगवेगळ्या ठिकाणी धाडी टाकून लाखो रुपयांची दारू आणि वाहने जप्त केली.

९ जानेवारीला सलगरवस्ती पोलीस स्टेशनच्या हद्दीत 'कवठे' येथे एका शेतात गुळमिश्रित रसायन वापरून हातभट्टीची दारू गाळली जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. यात पोलिसांनी १२८५ लिटर गुळमिश्रित रसायन आणि ८० लिटर तयार दारू असा ५२ हजार ९७५ रुपयांचा मुद्देमाल जागीच नष्ट केला. याप्रकरणी संजय गोपीचंद राठोड, कुमार उर्फ बाबू पांडुरंग चव्हाण आणि प्रियांका कुमार चव्हाण यांच्यावर गुन्हा दाखल आहे. १२ जानेवारीला हॉटेल ॲम्बेसेडर ते प्रभाकर महाराज मंदिर रोडवर अमोल बाळासाहेब भोसले हा इसम दुचाकीवरून देशी-विदेशी दारूच्या बाटल्या विक्रीसाठी घेऊन जात असताना पकडण्यात आले. त्याच्याकडून १ लाख ३ हजार ६६० रुपये किमतीची दारू आणि एक दुचाकी जप्त करण्यात आली असून, फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविला आहे. तिसऱ्या कारवाईत गांधीनगर, अक्कलकोट रोड परिसरातून रिक्षाद्वारे होणारी दारूची वाहतूक पकडण्यात आली. नरेंद्र रामलू कोंडा याला ताब्यात घेऊन त्याच्याकडून १ लाख ३२ हजार ५०० रुपये किमतीच्या देशी-विदेशी दारूच्या बाटल्या आणि रिक्षा जप्त करण्यात आली. एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशनमध्ये या प्रकरणाची नोंद झाली आहे. चौथी कारवाईत कर्णिक नगर येथील स्वातंत्र्य सैनिक रिक्षा स्टॉपजवळ संदीप विष्णू शिंदे याला विदेशी दारूच्या बाटल्यांसह पकडण्यात आले. तपासात ही दारू अशोक चौकातील गोल्ड वाईन शॉपच्या मालकाशी संबंधित असल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी १ लाख १२ हजार ८८० रुपये किमतीचा माल आणि दुचाकी जप्त केली असून, जेलरोड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल आहे. ही कामगिरी पोलीस आयुक्त एम. राज कुमार, पोलीस उपायुक्त (गुन्हे) डॉ. अश्विनी पाटील, सहायक पोलीस आयुक्त राजन माने यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने, सपोनि शंकर धायगुडे, शैलेश खेडकर, पोसई मुकेश गायकवाड आणि त्यांच्या पथकाने केली.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## डोंगरगाव येथे पानिपत शौर्यदिन संपन्न

**सांगोला, दि.१५ जानेवारी -**

सांगोला तालुक्यातील डोंगरगाव येथे बुधवार दि.१४ जानेवारी रोजी पानिपत शौर्यदिनाच्या निमित्त भजन, समाधीस्थळावर पुष्पृष्टी व वक्ते सुनीलबापू लाड यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. पानिपतच्या युद्धात शौर्य व वीरगती प्राप्त झालेल्या महिपतराव बाबर, लिंबाजी बाबर यांच्यासह या परिसरातील ८० वीरगती प्राप्त झालेल्या शूर योद्धांचा इतिहास आजरामर ठेवणे हे आपले कर्तव्य आहे. आपणही बाबरांच्या इतिहासाची शौर्यगाथा अभ्यासली पाहिजे. जीवनात आपल्या आयुष्याचे सोनं व्हावं असं जगलं पाहिजे. इतिहासातील मराठ्यांचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या कार्याचा आदर्श जगापुढे आहे असे विचार सुनीलबापू लाड यांनी याप्रसंगी व्यक्त केले. यावेळी सिद्धगोंडा पाटील, शिवाजीराव चालुक्य-साळुंखे, सुतार सर यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी प्रमोद बाबर, माजी सैनिक रविकांत मराळ, बाळासाहेब कोकरे, अमोल बाबर, सतीश पाटील, दगडू बाबर, दिगंबर साळुंखे, सुभाष बाबर, माणिकराव बाबर, गजानन बाबर, युवराज बाबर, राजकुमार बाबर, शरद बाबर, महेश बाबर, केशव बाबर, सयाजी बाबर, विठ्ठल बाबर, विजय बाबर, दिपक बाबर, संकेत बाबर, शंभूराजे बाबर, श्री बाबर, जय बाबर, प्रताप बाबर, सुभाष बाबर, रणजीत बाबर, योगेश बाबर, शाम पवार, तानाजी बाबर, विजय भिंगे यांच्यासह विविध गावातील बाबर घराण्यातील वंशज, इतिहासप्रेमी, नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. प्रास्ताविक जगदीश बाबर यांनी केले. आभार विशालदीप बाबर यांनी मानले.

## पंढरपूर येथील सिंहगड कॉलेजचा स्वप्नील मदने सोलापूर विद्यापीठात दहावा



**पिलीव दि १५ जानेवारी -**

पंढरपूर कोर्टी येथील सिंहगड इंजिनियर कॉलेजचा बि ई अभियाञीकी मेर्कॅनिकल इंजिनियर तिसऱ्या वर्षात शिकणारा स्वप्नील दादासाहेब मदने याने ८०.२०(९.४५ लसरि) गुण मिळवित सोलापूर विद्यापीठात दहावा क्रमांक मिळविला याला विभागप्रमुख श्याम कुलकर्णी, प्राचार्य के .जे कारंडे, प्रा.एस एस साळुंखे, प्रा पवार, ठिगळे, बोले सर, कोळी सर, घोडके मॅडम, जाधव सर, कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले .स्वप्नील हा पिलीव येथील पञकार संजय पाटील यांचा पुतण्या आहे.स्वप्नीलच्या ह्या यशाबद्दल पिलीव परीसरातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन व कौतुक होत आहे.

## सुलाखे इंग्लिश मिडीयम स्कूलचा २४ वा वर्धापन दिन उत्साहात

**बार्शी, दि. १५ जानेवारी-**

येथील बार्शी एज्युकेशन सोसायटी संचलित सुलाखे इंग्लिश् मिडीयम स्कूलचा वर्धापन दिन उत्साहात साजरा झाला. प्रमुख पाहुणे म्हणून बालरोगतज्ञ डॉ. साहिल मोरे तसेच प्रकाश दळवी उपस्थित होते. यावेळी सोसायटीचे सचिव अनंत कौठाळे, सुलाख इंग्लिश हायस्कूलचे मुख्याध्यापक स्वामीराव हिरोळीकर, सुलाखे इंग्लिश मीडियमचे मुख्याध्यापक तुषार महाजन, प्री-प्रायमरीच्या मुख्याध्यापिका बेताळे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रस्ताविक बेताळे यांनी केले. यावेळी राष्ट्रीय स्तरावर घेतल्या जाणाऱ्या रंगोत्सव स्पर्धांचे बक्षीस वितरण झाले. यावेळी नर्सरीपासून ते दहावीपर्यंतच्या सुमारे १२५ विद्यार्थ्यांना सिल्वर, गोल्ड, ब्रांझ मेडल तसेच प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाच्या ट्रॉफीज देऊन गौरविण्यात आले. शाळेचे कलाशिक्ष गणेश जोशी यांनी परिश्रम घेतले. शाळेच्या वर्धापन दिनानिमित्त ऐतिहासिक वस्तूचे प्रदर्शन तसेच जुने नाणे व पोस्ट कार्ड तिकिटांचे प्रदर्शनही भरवण्यात आले होते. हे प्रदर्शन शहरातील जवळपास दोन हजार विद्यार्थ्यांनी पाहिले. शाळेच्या विद्यार्थ्यांनी टाकाऊपासून टिकाऊ वस्तूचे प्रदर्शन भरवले होते. सूत्रसंचालन अमोल कुलकर्णी यांनी केले. चव्हाण, गाढवे, गुंड, पवार, कांबळे, जोशी मॅडम, ठोंगे मॅडम, होनराव मॅडम तसेच सर्व महिला शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मच्याऱ्यांनी परिश्रम घेतले.

## युती आघाडी शिवाय निवडणूक लढवा; कार्यकर्त्यांचा संजयमामांना आग्रह

**जेऊर, दि.१५ जानेवारी-**



जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजितदादा पवार गट) कार्यकर्ता मेळावा आज दिनांक १२ जानेवारी रोजी नालबंद मंगल कार्यालय येथे हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. या मेळाव्यामध्ये एड.अजित विघ्ने,एड नितीन राजेभोसले, अण्णासाहेब पवार, सुजित तात्या बागल, रोहिदास सातव, दत्तात्रय अडसूळ दादासाहेब जाधव, विनय ननवरे, रवींद्र वळेकर या कार्यकर्त्यांनी मनोगत व्यक्त करताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित दादा पवार ) गटाने संजयमामा शिंदे यांच्या नेतृत्वाखाली करमाळा जिल्हा परिषद व पंचायत समितीची निवडणूक स्वबळावर लढवावी असा नारा दिला. कुर्डूवाडी नगर परिषदेमध्ये ज्या पद्धतीने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने यश संपादन केलं तसेच यश मतदारांच्या विश्वासाच्या बळावर जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत निश्चितच मिळेल असा ठाम विश्वास या कार्यकर्त्यांनी बोलून दाखविला. यावेळी व्यासपीठावर सुभाष आबा गुळवे, तात्यासाहेब मस्कर ,चंद्रकांत सरडे, राजेंद्रकुमार बारकुंड, नवनाथ भांगे, एड. गिरंजे, विलास दादा पाटील, तानाजी झोळ,विलास राऊत ,अशोक पाटील विवेक येवले,पोपट सरडे, निळकंठ अभंग ,तात्यासाहेब जाधव ,चंद्रहास निमगिरे, सुहास रोकडे ,नानासाहेब निळ, उद्धव दादा माळी, एड. अजित विघ्ने, सुजित बागल, नानासाहेब लोकरे, नानासाहेब मोरे, प्रकाश थोरात, तात्या मामा सरडे, राजेंद्र धांडे ,डॉ. गोरख गुळवे, राजेंद्र बाबर, विनय ननवरे, आर.आर. बापू साखरे, अभिजीत पाटील, शंकर जाधव, सुदाम शेळके, अण्णासाहेब पवार, सुहास आबा साळुंखे, दत्तात्रय अडसूळ, राजाभाऊ देशमुख, सोम नाथ रोकडे, संदीप तळेकर, बाळासाहेब ढेरे ,मयूर पाटील, गौरव झांजुर्णे, गणेश गुंडगिरे, बाळासाहेब पाटील, उमेश इंगळे, महेश गंणगे, अनिल शेजाळ, रवींद्र वळेकर, अशोक तकिक, प्रमोद बदे, रोहिदास सातव, विकास गोंदकर, युवराज गपाट, राहुल कुकडे आदी मान्यवर उपस्थित होते.

# अधिकारी निवडणुकीत असल्याने ठेकेदाराकडून जोमात अवैध वाळू उपसा

**जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज**

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. १५ जानेवारी-**

दक्षिण तालुक्यातील महसूल विभागाचे अधिकारी महानगर पालिका निवडणुकीच्या कामात व्यस्त असल्याने ठेकेदाराकडून शासनाच्या नियमांचे उल्लंघन मोठ्या प्रमाणात वाळू उपसा करण्यात येत आहे. त्यामुळे शासनाच्या कामकाजावर सवाल उपस्थित करण्यात येत आहे.

दक्षिण तालुक्यामधील लवंगी व भंडारकवठे येथील भीमा नदीच्या पात्रातील वाळूचे लिलाव झाले असून ठेकेदाराकडून वाळू उपसा करण्यात येत आहे. मात्र यावेळी महिन्यापासून महसूल विभागातील मंडल अधिकारी व तलाठी निवडणूकीच्या कामात व्यस्त आहे. त्यामुळे ठेकेदाराकडून या संधीचा फायदा घेऊन रॉयल्टी रक्कम वाढवून व वाळू गाड्यांवर कापड न टाकता वाळू वाहतूक सुरू आहे. याबाबत महसूल अधिकाऱ्यांकडे तक्रार केल्यानंतरही कारवाई होत नसल्याने सामाजिक कार्यकर्त्यांकडून आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. वाळू वाहतूक करणार्या वाहनावर वाळू कापड नसल्याने दुचाकीस्वारांच्या डोळ्यांना वाळूचा त्रास होत आहे. शिवाय रस्त्यावर पाणी पडत असल्याने वाहने घसरून अपघात होत आहेत. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

> **तहसीलदारांच्या आदेशाला केराची टोपली**
>
> सोमवारी मंद्रूपचे तहसीलदार विष्णु बुटे यांनी लवंगी व भंडारकवठे येथील वाळू ठेक्याला भेट देऊन शासनाच्या नियमांचे पालन करण्याचे आदेश दिले. मात्र ठेकेदाराकडून या आदेशाला केराची टोपली दाखविल्याचे दिसून येते.





## नगराध्यक्ष कल्याणशेट्टींच्या हस्ते दिनदर्शिका प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि. १५ जानेवारी -**

तालुक्यातील चपळगाव येथील अभिजीत पाटील मित्र परिवार यांच्या वतीने नगराध्यक्ष मिलन दादा कल्याणशेट्टी यांच्या हस्ते २०२६ चे दिनदर्शिका प्रकाशन करण्यात आले.

दिनदर्शिकेमध्ये राष्ट्रीय नेते, महत्त्वाचे सण-उत्सव व सामाजिक संदेशांचा समावेश करण्यात आला आहे.भारतीय जनता पार्टी अक्कलकोट शहर कार्यालयात उत्साहात पार पडले.

यावेळी सागर दादा कल्याणशेट्टी भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

समाजामध्ये सकारात्मक विचारांचा प्रसार व्हावा व संघटन बळकट व्हावे या उद्देशाने ही दिनदर्शिका प्रकाशित करण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अभिजीत पाटील मित्र परिवारच्या सर्व सदस्यांनी सहकार्य केले.

## भोगी सणानिमित्त करकंब येथे श्री चौंडेश्वरी मातेस ६० भाज्यांची आकर्षक आरास

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि.१५ जानेवारी -**

प्रतिवर्षाप्रमाणे भोगी सणानिमित्त करकंब (ता.पंढरपूर) येथील श्री.चौंडेश्वरीदेवी मंदिरामध्ये संजीवकुमार म्हेत्रे व परिवार, कोष्टीसमाज भगिनींकडून श्री.चौंडेश्वरी मातेला ६० प्रकारच्या भाज्या, फळभाज्या व फळे यांची आकर्षक सजावट केली होती. यावेळी कोष्टी समाजातील पुरुष व महिला भगिनींनी शाकंभरी माता की जय, तुळस कोट बदामीचे टाळ वाजे शंभर कोट म्हणत श्री.चौंडेश्वरीमातेचा जयजयकार केला.

> भोगीच्या दिवशी केली जाणारी भोगीची भाजी ही केवळ परंपरेसाठी नाही तर आरोग्यासाठी ही खूप फायदेशीर आहे. हंगामी भाज्या आणि डाळी एकत्र करून बनवलेली ही भाजी शरीराला आवश्यक पोषण देते. हिवाळ्यात शरीरात निर्माण होणारा कफ कमी होतो, पचनशक्ती सुधारते व रोगप्रतिकारक शक्ती वाढते. भोगीच्या दिवशी हंगामी भाज्यांचे सेवन न करणारी व्यक्ती आरोग्यासाठी उपयुक्त गोष्टींपासून वंचित राहते असे मानले जाते. जो न खायेगा भोगी वह सदा रहेगा रोगी अशी म्हणही आपल्यामध्ये प्रचलित आहे.



> भोगी सण शेतात आलेल्या नवीन पिकांसाठी भगवान इंद्रांचा आशीर्वाद मानून साजरा केला जातो. इंद्रदेवांनी धरतीवर पिके ,धनधान्याची भरभराट व्हावी यासाठी प्रार्थना केली होती. वर्षभर पिकांची भरभराट व्हावी म्हणून हा सण साजरा केला जातो. भोगी हा सण फक्त महाराष्ट्रातच मर्यादित नाही तर देशभरात वेगवेगळ्या नावांनी आणि स्थानिक परंपरेनुसार साजरा केला जातो.

## स्वामी विवेकानंद यांचा कर्मयोग जीवनाचा गाभा आहे : डॉ. कमलताई ठकार

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१५ जानेवारी-**

स्वामी विवेकानंद यांचे व्यक्तित्व व कर्तृत्व हे सर्वश्रुत आहे. स्वामी विवेकानंदांच्या कर्मयोगाचा सिद्धांत मांडून कर्मयोग हा जीवनाचा गाभा आहे, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध वक्त्या व विचारवंत डॉ.कमलताई ठकार यांनी केले. स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त विवेकानंद केंद्र कन्याकुमारी, शाखा बार्शी व श्री भगवंत देवस्थान ट्रस्ट बार्शी यांच्यावतीने भगवंत मंदिरात 'स्वामी विवेकानंदः कर्मयोगी संत' या विषयावर त्यांचा व्याख्यान झाले.

पुढे बोलताना डॉ. ठकार म्हणाल्या, स्वामीजींची जीवनयात्रा महान संदेश असून त्यांची भूमिका समजून घेणे काळाची गरज आहे. युवा हे देशाचे आधारस्तंभ असून त्यांनी व्यक्तिगत विकासाबरोबरच समाजहिताचा विचार करणे आवश्यक आहे. युवकांना संबोधून त्या म्हणाल्या, जो अभिजात असतो त्याचा संघर्ष स्वतः शी असतो. हा संघर्ष करताना, सत्याला अभिनिवेश नसतो हे उद्गार त्यांनी काढले. त्याचप्रमाणे हृदय अद्वैताचे अधिष्ठान आहे. ज्ञानसंपन्नतेचा विचार मांडताना त्या म्हणाल्या, जिथे ज्ञानाचे दर्शन घडते तिथे प्रदर्शन नसते. नैतिकता हा दागिना असून नैतिक मूल्यांचा स्पर्श जेव्हा जीवनाला होतो ते जीवन आदर्श असते.जीवनात आचार विचारांची साम्यता असते ते जीवन वंदनीय असते.समाजातील अपप्रवृत्तीचा विचार करताना त्यांनी स्पष्ट केले की, कधी कधी मोठयांचा सत्कार होतो पण माणुसकीचा होत नाही. जेथे माणूस जोडला जातो तेथे देश जोडला जातो. त्याचप्रमाणे त्यांनी संयमावर बोलताना स्पष्ट केले की, जेंव्हा संयमाचे बंधन असते तेंव्हा स्वातंत्र्याचा स्वर उमटतो. विवेकानंदाच्या जीवनातील गोष्टींना उजाळा देत मनाची ताकद जग जिंकण्याचे बळ देते, असे त्या म्हणाल्या.



कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव यांनी स्वामी विवेकानंद यांच्या चरित्रातून युवकांनी बोध घेवून कार्यप्रवण व्हावे, असे सांगितले. प्रास्ताविक प्रा.ज्योती डोळस यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ.अबोली सुलाखे यांनी करुन दिला. प्रार्थना वंदना कुलकर्णी तर विवेकानंद गीत ड. प्रशांत शेटे यांनी प्रस्तुत केले. सूत्रसंचालन प्रा. किर्ती डोळस तर आभार विनोद कबाडे यांनी केले. अमृता रंगदाळ, कोमल कबाडे, मुकुंदशेठ कुलकर्णी, सुरेशभाऊ हालमे, प्रा.डॉ.राहुल पालके, अमोल सुलाखे, मुकुंदराज कुलकर्णी, अॅड.बिरप्पा तुपे, सुधीर माईनकर, वसेकर, केदार बेताळे, संजय निरंजन, यल्लाप्पा कट्टीमनी, विवेक धर्मराव, महेश महामुनी, सुनीत दहिवाले, विजय घुमरे, यशराज कबाडे, विलास शिंदे आदींनी सहकार्य केले.




## पंडीत जवाहरलाल नेहरू विद्यालयामधील दहावीच्या विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी डिजिटल कुपनचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि.१५ जानेवारी -**

रावगाव (ता.करमाळा) येथील पंडीत जवाहरलाल नेहरू विद्यालयाच्या दहावीतील विद्यार्थ्यांसाठीरोटरी क्लब ऑफ कलंबोळी यांच्यावतीने तसेच गावातील सामाजिक कार्यकर्ते गोरख बापू रासकर यांच्या सहकार्यामुळे प्रत्येकी १६०० रुपये किमतीचे इयत्ता दहावीच्या अभ्यासासाठी उपयुक्त कूपन वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी सखाराम आबा पवार, सरपंच संदीप शेळके, भास्करभाऊ पवार, जि.प.शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रशांत शिंदे उपस्थित होते. यावेळी प्रशांत शिंदे यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अभ्यासातील सातत्य, शिस्त, नियोजन आणि उपलब्ध साधनांचा योग्य वापर करण्याचे महत्त्व पटवून दिले. या कूपनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध विषयांचा सखोल अभ्यास, स्वाध्याय, प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका, कृतिपुस्तिका तसेच इतर शैक्षणिक घटकांचा वापर करता येणार आहे.

आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने घरबसल्या अभ्यासाची सुविधा उपलब्ध करून देत विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीस चालना देण्याचा हा एक स्तुत्य उपक्रम असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी दिलेल्या या मोलाच्या योगदानाबद्दल शाळेच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने अभ्यास करता येईल आणि त्यांच्या यशाच्या वाटचालीला निश्चितच बळ मिळेल, असा विश्वास मुख्याध्यापक विजय कोळेकर यांनी व्यक्त केला.

## नृत्याविष्कारांनी भारावले करमाळकर

**सुरताल संगीत महोत्सवात आंतरराष्ट्रीय कलाकारांचे सादरीकरण**

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि.१५ जानेवारी-**

सुरताल संगीत विद्यालयाच्या २८ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजीत ११ व्या आंतरराष्ट्रीय सूरताल संगीत महोत्सवात देशभरातील आंतरराष्ट्रीय किर्तीच्या कलाकारांनी सादर केलेल्या संगीत व नृत्याविष्काराने करमाळा शहरवासीय भारावले.

यामधे प.बंगाल, तेलंगणा, ओरिसा, आसाम, मध्य प्रदेश, गुवाहटी अशा अनेक राज्यातून आलेल्या कलाकारांनी आपली कला सादर केली. या महोत्सवामध्ये सहभागी कलाकारांना संस्थेच्या वतीने विविध पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी प्रा.गणेश करे-पाटील यांनी कलाकारांना यशकल्याणी सेवाभावी संस्थेच्या वतीने महाराष्ट्राची ओळख असलेली पैठणी साडी भेट देऊन सन्मानित केले व आपल्या मनोगतमधून सुर-ताल संस्थेच्या कार्याबद्दल गौरवोद्गार काढले. या कार्यक्रमाला विद्या विकास मंडळाचे सचिव तथा जेष्ठ मार्गदर्शक विलासराव घुमरे, जिल्हा नियोजन समिती सदस्य तथा श्री मकाई सहकारी साखर कारखान्याचे मा.अध्यक्ष दिग्विजय बागल, गिरधरदास देवी प्रतिष्ठानच्या सुनीता देवी, सामाजिक कार्यकर्ते श्रेणीक खाटेर, डॉ. कविता कांबळे, जिल्हा इंग्लिश टीचर्स असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. बाळकृष्ण लावंड, संगीता खाटेर, नगरसेविका स्वातीताई फंड आदी मान्यवर उपस्थित होते.

सर्व उपस्थित मान्यवरांचा सन्मान विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब नरारे यांच्या हस्ते करण्यात आला.कार्यक्रमाचे संयोजन संस्थापक प्राचार्य बाळासाहेब नरारे यांनी केले

तर या आयोजनात यशकल्याणी सेवाभावी संस्था, पुणे. श्री.गिरिधरदास देवी प्रतिष्ठान, करमाळा. गुरु गणेश दिव्यरत्न गो-पालन संस्था, करमाळा, कृष्णा हॉस्पिटल, करमाळा, दिगंबररावजी बागल पेट्रोलियम करमाळा यांनी सहयोगी संस्था म्हणून सहकार्य केले. उपस्थित मान्यवरांचा सन्मान प्राचार्य बाळासाहेब नरारे यांच्या हस्ते करण्यात आला.

सूत्रसंचालन रेशमा जाधव, संध्या शिंदे, प्रा.विष्णु शिंदे तर आभार अर्चना सोनी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ध्यान योग साधना व सेवा केंद्राचे सर्व सदस्य, संगीत विद्यालयातील शिक्षक, विद्यार्थी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. कलाकार आणि विद्यार्थ्यांचे अप्रतिम सादरीकरणामुळे आलेले श्रोते आणी रसिक वर्ग मंत्रमुग्ध होऊन गेले..




> **गौरव करण्यात आलेले कलाकार व पुरस्कार :**
>
> * डॉ. मोनिषा देवी गोस्वामी (गुवाहाटी) - सुरताल नृत्य साधना पुरस्कार, *गुरु इतिश्री पटनायक (पुरी) - सुरताल नृत्य शिरोमणी पुरस्कार, *गुरु श्रुती पंडित (पुणे) - सुरताल नृत्य भूषण पुरस्कार, *गुरु सुचरिता घोष (हैदराबाद)- सुरताल नृत्य कलाश्री पुरस्कार, *दिपनका शर्मा (इंदौर) - सुरताल नृत्य गौरव पुरस्कार, *अभिप्सा नंदी (कोलकाता) - सुरताल कलानिधी पुरस्कार, *प्रकाश शिंदे (पुणे) - सुरताल वाद्य साधना पुरस्कार,
>
> *गितिमा दास (गुवाहाटी)- सुरताल कला गौरव पुरस्कार, *डॉ. विथिका तिक्कु (जम्मू-कश्मीर)- सुरताल कलाभूषण पुरस्कार

> **सुर-ताल विशेष पुरस्काराचे मानकरी**
>
> या महोत्सवाचे औचित्य साधत करमाळा तालुक्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या व्यक्तींना उपस्थित मान्यवरांचे हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.
>
> आंतरराष्ट्रीय योगपटू डॉ. राधिका तांबे-घोलप -आंतरराष्ट्रीय योगाचार्य पुरस्कार, *प्राचार्य मिलिंद फंड सुरताल संगीत रसिक पुरस्कार, *चित्रकार निवास कन्हेरे सुरताल कला गौरव पुरस्कार, पक्षीमित्र कल्याणराव साळुंके - सुरताल संगीत रसिक पुरस्कार, * संतोष जीवनलाल शियाळ -आदर्श व्यापारी सन्मान पुरस्कार

आपला
# जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## पिलीव परिसरात मकर संक्रांत सण उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव,दि.१५जानेवारी-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव परिसरात पवित्र मकर संक्रांतीचा सण महीलांनी मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. यंदा वाणवसा करण्याचा मुहुर्त दुपारी तीननंतर होता. मंदिरात महीलांनी मोठी गर्दी केली होती. दुपारी तीननंतर पिलीव परीसरातील सर्वच रस्त्यावर महीलांची प्रचंड गर्दी दिसुन येत होती. महीला



अलंकार व नवीन साड्या परिधान करुन मंदिरात देवदर्शनासाठी आल्या होत्या. देवदर्शनानंतर महीला एकमेकींना हळदीकुंकू लावुन वाणवसा देत तिळगूळ देत एकमेकींना शुभेच्छा देत होत्या. तर पुरुष वर्ग लहान मोठ्यांना तिळगूळ देऊन एकमेकांना आशीर्वाद देत होते. आजपासून रथसप्तमी पर्यंत महीलांना घरी बोलावुन हळदी_ कुंकू लावुन आपल्या ईच्छेनुसार भेट वस्तु देणयाची परंपरा अनेक वर्षांपासूनची हिंदु संस्कृती आहे .

पिलीवसह कुसमोड, झिंजेवस्ती, सुळेवाडी व आसपासच्या परिसरात हा मकर संक्रांतीचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सोशल मिडीयावरून दिवसभर एकमेकांना शुभेच्छा देत होते.

# पंढरपूर तालुक्यात हालचालींना वेग तर युती, आघाड्याकडे लक्ष; आजपासून अर्ज दाखल सुरु

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर,दि.१५ जानेवारी -**

मागील अनेक दिवसांपासून चर्चेत असलेली मिनी विधानसभा अर्थात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीचा मुहूर्त अखेर निवडणूक आयोगाकडून मंगळवारी (दि.१३) जाहीर करण्यात आला आहे. त्यामुळे गाव खेड्यात निवडणूकीचा धुराळा उडण्यास आता सुरुवात झाली आहे.

### तालुक्यात ८ जिल्हा परिषद गट तर १६ पंचायत समितीचे गण

जिल्हा परिषदेचे ८ गट :- पंढरपूर तालुक्यात करकंब, भोसे, रोपळे, गोपाळपूर, वाखरी, भाळवणी आणि लक्ष्मीटाकळी असे आठ जिल्हा परिषदेचे गट आहेत.

पंचायत समितीचे १६ गण :- पंढरपूर तालुक्यात उंबरे, करकंब, भोसे, गुरसाळे, रोपळे,



सुस्ते, पुळुज, गोपाळपूर, वाखरी, पटवर्धनकुरोली, भाळवणी, पळशी, लक्ष्मीटाकळी, खर्डी, कासेगाव, सरकोली असे पंचायत समितीच्या १६ गणाची रचना करण्यात आली आहे.

### भावी बिरुदावली लावून अगोदरपासूनच अनेक इच्छुक

पंढरपूर तालुक्यातील होत असलेल्या १६ पंचायत समिती गण आणि ८ जिल्हा परिषद गटातून निवडणुका लढवण्यासाठी मागील अनेक महिन्यापासून अनेक उमेदवार तयारीत आहेत. तालुक्यातून यावेळी तरुणांची संख्या लक्षणीय असणार आहे. कारण अनेक इच्छुक तरुणांच्या समर्थकांकडून यापूर्वीच सोशल मिडीयावरुन वाढदिवसाच्या निमित्ताने किंवा शुभेच्छा देण्याच्या निमित्ताने आपआपल्या इच्छुक मित्राच्या नावापुढे भावी पंचायत समितीचे सदस्य, भावी जिल्हा परिषद सदस्य अशा बिरुदावल्या लावण्यास सुरुवात केलेली आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाने दोन दिवसापूर्वी निवडणूकीचा कार्यक्रम जरी जाहीर केलेला असला तरी इच्छुक उमेदवारांची निवडणूकीसाठीची तयारी यापूर्वीपासूनच सुरु होती. त्यामुळे अनेकजण पूर्ण तयारीनिशी उमेदवार म्हणून निवडणूकीच्या रिंगणात असणार असल्याचे निश्चित झाल्याचे चित्र पंढरपूर तालुक्यात पाहावयास मिळत आहे.

### नेते मंडळींचे गावभेट दौरे वाढले

निवडणूकीसाठी प्रत्यक्ष उमेदवारी दाखल करण्यापासून ते मतदाना पर्यंतचा कालावधी तसा कमीच असल्यामुळे मागील अनेक महिन्यापासून निवडणूकीच्या तयारीत असलेल्या उमेदवारांची अखेरच्या क्षणी आता लगीनघाई पहायला मिळत आहे. यामध्येच राजकीय पक्षाचे पदाधिकारी, नेते मंडळींचे गावभेट दौरे सध्या वाढलेले दिसत आहेत.

### उमेदवारी अर्ज आजपासून होणार दाखल

महाराष्ट्र राज्यातील १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समितीच्या निवडणुकीचे पडघम वाजले आहेत. यामध्ये १६ जानेवारीपासून निवडणुकीसाठी थेट उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी सुरुवात होणार आहे. २१ जानेवारी पर्यंत अखेरची मुदत असून, उमेदवारी अर्जाची छाननी २२ जानेवारीला होईल. उमेदवारी मागे घेण्यासाठी २७जानेवारी अखेरची मुदत आहे. मतदान ५ फेब्रुवारी तर मतमोजणी ७ फेब्रुवारी रोजी होईल.

### यापूर्वीच आरक्षण सोडत जाहीर

तालुक्यातील प्रत्येक गट आणि गणा मधून विविध गावांचा समावेश करण्यात आला आहे. प्रत्येक गट आणि गणातून आरक्षण ही जाहीर झाले आहे. त्यानुसार विविध राजकीय पक्ष आणि विविध आघाडीतून नेते मंडळी आणि त्यांच्या समर्थक कार्यकर्त्यांची तयारी सुरू आहे.

### आजवरच्या निवडणुका पांडुरंग आणि विठ्ठल परिवारामध्येच रंगल्या

पंढरपूर तालुक्यातील राजकारणाचा आजवर अभ्यास केला असता, कोणत्याही राजकीय पक्षाची ताकद ही तशी कमी प्रमाणातच दिसत आहे. तालुक्यामध्ये दोनच प्रबळ गट आहेत. यामध्ये परिचारक यांचा पांडुरंग परिवार आणि त्यांच्या विरोधात असलेल्या विठ्ठल परिवार. या दोन गटामधूनच आजवरच्या निवडणुका झाल्याचे पाहावयास मिळाले आहे. त्यामुळे इच्छुक उमेदवारांकडून ही राजकीय पक्षापेक्षा या दोन्ही परिवाराकडूनच उमेदवारीची मागणी केली जात आहे.

### नगरपालिकेच्या यशामुळे विठ्ठल परिवारही मजबूत

नुकत्याच झालेल्या पंढरपूर नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये परिचारकांच्या नेतृत्वाखालील भाजपा आणि आघाडीचे तब्बल २४ नगरसेवक निवडून आले. मात्र लोकनियुक्त नगराध्यक्षपद मिळविण्यात परिचारकांना अपयश आले. याउलट विठ्ठल परिवाराचे नेते भगिरथ भालके यांच्या पत्नी डॉ.प्रणिता भालके यांनी लोकनियुक्त नगराध्यक्षपद प्राप्त केले आहे. मात्र त्यांच्या विठ्ठल परिवाराला केवळ ११ नगरसेवकांवर पालिकेत समाधान मानावे लागलेले आहे. नगरपालिकेतील लोकनियुक्त नगराध्यक्षपद मिळाल्यामुळे मध्यंतरी झालेल्या विधानसभा निवडणूकीतील पराभवामुळे काहीशी मरगळ आलेला विठ्ठल परिवार आता मजबूत झाला आहे. विठ्ठल परिवाराच्या मजबुती मुळे जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणूकीत रंगत येणार हे मात्र निश्चित झाले आहे.

## सांगोला तालुक्यात ७ जि.प.गट व १४ पं.स.गणासाठी २७४ मतदान केंद्र

### सहा.निवडणुक निर्णय अधिकारी बाळुताई भागवत यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१५ जानेवारी -**

सांगोला तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुक २०२६ चा निवडणुक कार्यक्रम जाहीर झाला असून त्यानुषंगाने आदर्श आचार संहिता लागु झालेली आहे. सांगोला तालुक्यात ७ जि.प.गट व १४ पं.स.गणासाठी २७४ मतदान केंद्र असल्याची माहिती जिल्हा परिषद व पंचायत समिती सहा.निवडणुक निर्णय अधिकारी तथा सांगोला तहसिलदार बाळुताई भागवत यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

सांगोला तालुक्यामध्ये महुद बु, एखतपूर, जवळा, कडलास, चोपडी, कोळा, घेरडी हे ७ जिल्हा परिषद गट तसेच महुद बु, चिकमहुद, वाकी शिवणे, एखतपुर, वाढेगाव, जवळा, कडलास, अजनाळे, राजुरी, चोपडी, कोळा, हत्तीद, सोनंद, घेरडी हे १४ पंचायत समिती गण आहेत. गुरुवार दि.१५ जानेवारी रोजी तहसील कार्यालय, सांगोला येथे राजकीय पक्ष व प्रमुख यांची आदर्श आचार संहिता अंमलबजावणी व निवडणुकीबाबत बैठक घेऊन



नामनिर्देशन अर्ज, त्यासोबत जोडावयाचे प्रपत्रे, छाननी, उमेदवार माघार, निवडणुक चिन्ह वाटप, मतदान दिवशी घ्यावयाची खबरदारी, अनामत रक्कम, मतमोजणी आदर्श आचार संहितेचे पालन करणेबाबत माहिती देण्यात आली असल्याची माहिती सहा.निवडणुक निर्णय अधिकारी बाळुताई भागवत यांनी दिली. यावेळी सांगोला निवासी नायब तहसिलदार सोमनाथ साळुंखे उपस्थित होते.

> सांगोला तालुक्यात ७ जि.प.गट व १४ पं.स.गण याची निवडणूक पार पडणार आहे. त्याअनुषंगाने प्रशासन सज्ज असून सर्व निवडणुका पारदर्शक आणि शांततेत पार पाडण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. आचारसंहितेच्या काळात निवडणूक आयोगाने घालून दिलेल्या नियमाप्रमाणे सर्व तपासणी करून विविध परवानगी देण्यात येणार आहेत.
> **- बाळुताई भागवत, सहा.निवडणुक निर्णय अधिकारी**

## ‘दक्षिण’ मध्ये जि.प.व पं.स.निवडणुकीसाठी यंत्रणा सज्ज

### तहसीलदार किरण जमदाडे यांची माहिती

### दक्षिणमध्ये आचारसंहीतेचे पालन करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि.१५ जानेवारी-**

जिल्हा परिषद पंचायत व समिती निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करताना केवळ एका 'सूचक' आवश्यकता असणार आहे. त्यामुळे उमेदवारांची सूचक शोधण्याची कटकट कमी होणार आहे. दक्षिणमध्ये जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी १६ जानेवारीपासून ७ फेब्रुवारी पर्यंत आदर्श आचारसंहितेचे पालन करण्यात येणार आहे. त्यामुळे राजकीय पक्षांनी आचारसंहितेचे पालन करण्याचे आवाहन दक्षिणचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार किरण जमदाडे यांनी केले. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक संदर्भात आयोजित पत्रपरीषदेत तहसीलदार जमदाडे यांनी माहिती दिली.





दक्षिण तालुक्यातील ६ जिल्हा परिषद गट व १२ पंचायत समिती गणासाठी ५ फेब्रुवारीला मतदान होणार आहे. २४७ मतदान केंद्रांमधून २ लाख ६७ हजार २३७ मतदार हक्क बजावणार आहेत. यामध्ये एक लाख १५ हजार २२८ पुरूष, एक लाख ८ हजार १२३ महिला तर १६ तृतीयपंथीय मतदारांचा समावेश आहे. यामध्ये ४ हजार ३७८ दुबार मतदार आहेत. त्यांच्याकडून एकाच ठिकाणी मतदान करण्याचे हमीपत्र घेण्यात आले असून प्रत्येक मतदान केंद्रावर हमीपत्र पोहोच करण्यात येणार आहे. दोन्ही ठिकाणची सहीची खात्री झाल्यानंतर मतदान करण्यास परवानगी देण्यात येणार आहे.

> ✻ सर्व परवानासाठी एक खिडकी योजना ✻ २५ व २६ जानेवारी रोजी अर्ज माघार प्रक्रीया बंद ✻ दुबार मतदारांकडून एकाच ठिकाणी मतदान करण्याचे घेतले हमीपत्र ✻ एसआरपी कँम्प येथे मतमोजणी प्रक्रीया ✻ ३६ विविध पथकाद्वारे आचारसंहितेचे पालन व नियंत्रण ✻ दक्षिणचे सर्व सीमांवर स्थिर सर्वेक्षण पथक नियुक्त ✻ मतदान केंद्रावर सर्व सोईसुविधा देण्यात येणार ✻ आदर्श मतदान केंद्र उभारणी करणार ✻ निर्भय व शांततेत मतदान पार पाडण्यासाठी यंत्रणा सज्ज ✻ दोन हजार कर्मचार्यांना तीन टप्यात प्रशिक्षण

नामनिर्देशन पत्र भरण्याची प्रक्रिया १६ जानेवारी ते २१ जानेवारीपर्यंत असून २२ जानेवारी रोजी अर्जांची छाननी होणार आहे . २३ जानेवारी ते २७ जानेवारी दरम्यान अर्ज माघार घेण्याचा कालावधी आहे. त्यानंतर २७ जानेवारी रोजी उमेदवारांना चिन्ह वाटप करून अंतिम उमेदवारी निश्चित केली जाणार आहे. ५ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत मतदान होणार आहे. ७ फेब्रुवारी रोजी सकाळी दहा वाजल्यापासून मतमोजणी होऊन निकाल जाहीर केला जाणार आहे. निवडणूक पारदर्शक आणि शांततेसाठी दोन हजारपेक्षा जास्त कर्मचारी तैनात आहेत. उमेदवारांना सर्व प्रकारचे परवाना देण्यासाठी एक खिडकी योजना सुरू करण्यात येणार आहे. यावेळी निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शनानुसार आदर्श मतदान केंद्र निर्मितीसाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगण्यात आले.

आचारसंहितेवर लक्ष ठेवण्यासाठी स्थिर सर्वेक्षण पथक १८ ,फिरते सर्वेक्षण पथक १२ ,व्हिडिओ सर्वेक्षण पथक ४ विशेष व्हिडिओ पथक ०२ असणार आहेत. ७ फेब्रुवारी रोजी 'एस.आर.पी. कॅम्प' येथे मतमोजणी प्रक्रीया पार पडणार आहे. निवडणूक निर्णय अधिकारी अंजली मरोड यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण यंत्रणा सज्ज झाली असून, मतदारांनी मोठ्या संख्येने मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## माळशिरस तालुक्यातील १८ गणात ३ लाख १८ हजार २८१ मतदार

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस,दि.१५ जानेवारी-**

तालुक्यात तीन नगरपंचायत झाल्यानंतर ३ गट व ६ गण कमी झाले असून ९ गट व १८ गण असून या १८ गणामध्ये एकूण १८ गणात ३ लाख १८ हजार २८१ मतदार आहेत यामध्ये पुरुष १ लाख ६४ हजार ९५० तर स्त्री मतदार १ लाख ५३ हजार ३१५ मतदार आहेत.

**३७ दहीगाव जिल्हा परिषद गट :** १) ७३ गुरसाळे गण पुरुष ८९११ स्त्री ८३९४ एकूण १७३०५, २) ७४ दहीगाव गण पुरुष ९८१८ स्त्री ९४१४ एकूण १९२३२.

**३८ मांडवे जिल्हा परिषद गट :** १) ७५ मांडवे गण पुरुष ९४८५ स्त्री ८४६१ एकूण १७९४६, २) ७६ कण्हेर गण पुरुष ९७०४ स्त्री ८९०१ एकूण १८६०६

**३९ फोंडशिरस जिल्हा परिषद गट :** १) ७७ भांबूर्डी गण पुरुष ८३३० स्त्री ७७०६ एकूण १६०३७ २) ७८ फोंडशिरस गण पुरुष ९३४३ स्त्री ८६९२ एकूण १८०३६

**४० संग्रामनगर जिल्हा परिषद गट -** १) ७९ मेडद गण पुरुष ९४१८ स्त्री ८६०३ एकूण १८०२१ २) ८० संग्रामनगर गण पुरुष ८८८५ स्त्री ८३२९ एकूण १७२१६

**४१ माळीनगर जिल्हा परिषद गट- १)** ८१ माळीनगर गण पुरुष ८९५४ स्त्री ८५३८ एकूण १७४९३ २) ८२ लवंग गण पुरुष ८७८८ स्त्री ८०५९ एकूण १६८४७

**४२ बोरगाव जिल्हा परिषद गट-** १) ८३ जांभूड गण पुरुष ८४३७ स्त्री ७५९२ एकूण १६०३० २)८४ बोरगाव गण पुरुष ९३८७ स्त्री ८७२१ एकूण १८१०८

**४३ वेळापूर जिल्हा परिषद गट -** १)८५ वेळापूर गण पुरुष ९६७८ स्त्री ९१६८ एकूण १८८४७ २) ८६ यशवंतनगर गण पुरुष ८५९० स्त्री ८२४० एकूण १६८३०

**४४ निमगाव जिल्हा परिषद गट-** १) ८७ निमगाव गण पुरुष ८१७१ स्त्री ७७०९ एकूण १५८८१ २) ८८ गोरडवाडी गण पुरुष ९८६१ स्त्री ८७३५ एकूण १८६०१

**४५ पिलीव जिल्हा परिषद गट-** १) ८९ पिलीव गण पुरुष १०३१३ स्त्री ९६४९ एकूण १९९६४ २)९० तांदुळवाडी गण पुरुष ८८७७ स्त्री ८४०४ एकूण १७२८१

असे १ लाख ६४ हजार ९५० पुरुष तर १ लाख ५३ हजार ३१५ स्त्री असे ३ लाख १८ हजार २८१ मतदार माळशिरस तालुक्यात आहेत .

## कासेगावात अरोग्य उपकेंद्राच्या अर्धवट रस्त्याची पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**कासेगांव, दि.१५ जानेवारी-**

कासेगाव (ता.दक्षिण सोलापूर) येथील प्राथमिक अरोग्य उपकेंद्रात जाण्यासाठी रस्ता नसल्याने होणारी हेळसांड थांबवण्याची व रस्ता करून देण्याची मागमी नुकतीच सरपंच यशपाल वाडकर यांनी केली होती. त्याबाबत शहानिशा करण्यासाठी अर्धवट राहिलेल्या रस्त्याची पाहणी आज तहसीलदार किरण जमदाडे यांनी केली.

संबंधित उपकेंद्राकडे जाणारा रस्ता हा बंद पडला असून यामुळे कासेगावमधील रुग्णांना दवाखान्याकडे ये-जा करताना हेळसांड होत आहे. याबाबतीत कासेगावचे सरपंच वाडकर व



ग्रामपंचायत सदस्यांनी संबंधित रस्त्यावरील अतिक्रमणे काढून उपकेंद्राकडे जाणाऱ्या रुग्णांना तो खुला करून मिळावा याबाबत निवेदन दिले होते. त्याची दखल घेऊन तहसीलदार जमदाडे यांनी पाहणी केली. संबंधित रस्ता आठवडाभरात खुला करण्याचे आश्वासन ग्रामस्थांना त्यांनी यावेळी दिले. संबंधित रस्त्याच्या बाजूला गावठाण असून गावठाणावर काही प्रमाणात अतिक्रमण झाले आहे. तसेच त्या बाजूला संबंधित काही शेतकऱ्यांची बागायत जमीन आहे. त्यामुळे आरोग्य उपकेंद्राकडे जाणारा रस्ता हा पूर्णपणे बंद आहे. या अगोदर तो रस्ता वाडकर गल्लीमधून अज्ञान बाई माळी यांच्या शेताच्या बाजूने आरोग्य उपकेंद्राकडे जात होता. परंतु त्या रस्त्याच्या बाजूला एका घरमालकाने आपल्या घराचे बांधकाम सुरू केल्याने हा रस्ता चालू स्थितीमध्ये बंद झाला आहे. त्यामुळे उपकेंद्राकडे जाणाऱ्या वाहनांना तसेच रुग्णांना मोठ्या प्रमाणात अडचण निर्माण होत आहे. त्यामुळे हा रस्ता खुला करून मिळावा म्हणून तहसीलदार यांच्याकडे केली होती. यावेळी ग्रामपंचायतीचे सदस्य संभाजी चौगुले माजी सरपंच नेताजी पाटील तंटामुक्त समितीचे तत्कालीन अध्यक्ष संजय पवार सामाजिक कार्यकर्ते सुधीर चौगुले ज्ञानेश्वर रोकडे ग्रामपंचायत सदस्य भरत जाधव जालिंदर गायकवाड सत्यपाल वाडकर सौ अनिता हेडे शामराव ईटुकडे ताजुद्दीन शेख बबन कुंभार यांच्या सह ग्रामस्थ उपस्थित होते

## शिवसेना अल्पसंख्याक तालुका प्रमुख पिरजादे तर्फे नगराध्यक्ष म्हेत्रेंचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि १५ जानेवारी**

दुधनी नगराध्यक्षपदी प्रथमेश म्हेत्रे व शिवसेनेचे सर्व नगरसेवक विजयी झा ल्याबद्दल शिवसेना अक्कलकोट अल्पसंख्याक प्रमुख मुजस्सिम पिरजादे यांच्यातर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी शाकिर पटेल, स्वामीराव गायकवाड, नंदकुमार जगदाळे, राजेश जगताप, रमेश भंडारी, सैदप्पा इंगळे, गुरु हबसी, रामा गद्दी



गुलाब खैराट, बसवराज हौदे, उदयकुमार म्हेत्रे, उपनगराध्यक्ष जिलानी नाकेदार, नगरसेवक अश्विनी हरळेकर, श्रीदेवी कोळी, पवार हरिचंद्र, सरूबाई मळेकर, मधुमती म्हेत्रे, सिद्धाराम येगदी, सुषमा धल्लू, राऊफ निंबाळकर, सुनंदा चिंचोळी, बसवराज बसवनकेरी,संगीता पाटील, स्वाती सोळशे, अंजनाबाई, ललिता गद्दी, सातलिंगप्पा परमशेट्टी, जगदेवी कोतली, महांतेश पाटील, संगमेश्वर सिन्नूर, म्हेत्रे चाँद नाकेदार, संगम नाथ म्हेत्रे, राजू परमशेट्टी, श्रीशैल म्हेत्रे, चंद्रकांत येगदी, गुलाब खैराट, इंद्रजीत गद्दी, मल्लिनाथ कोटनूर,राजू माळी, गुरुशांत ढंगे आदि उपस्थित होते .

## पाटील विद्यालयाचे चित्रकला ग्रेड परीक्षेत यश

**पिलीव दि १५जानेवारी**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी चित्रकला ग्रेड परीक्षा२०२५२६ मध्ये झालेल्या एलिमेंटरी व इंटरमिजीएट या परीक्षेत दैदीप्यमान यश संपादन केले .एलिमेंटरी परीक्षेस विद्यालयातील ८२ विद्यार्थी बसले होते त्यामध्ये अ श्रेणीत ८ विद्यार्थी, ब श्रेणीत ९ विद्यार्थी, क श्रेणीत ६३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असुन निकाल ९७.५६ टक्के लागला आहे.तर इंटरमिजीएट परीक्षेस ५० विद्यार्थी बसले होते त्यापैकी श्रेणीत १३ विद्यार्थी, ब श्रेणीत १० विद्यार्थी तर क श्रेणीत २५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असुन शेकडा निकाल ९६ टक्के लागला आहे.सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक बागल सर, पर्यवेक्षक रमेश किरगत सर, वरीष्ठ लेखनिक भोरकडे सर, विभागप्रमुख ऐवळे सर ,सहाय्यक विभागप्रमुख झाडे सर तसेच स्थानिक स्कूल कमिटी, शाळा व्यवस्थापन समीती, तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन व कौतुक होत आहे.

